इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - ७६ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

गुरुवार,ता. १६ जुलै २०२६ | आषाढ शुक्ल २ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००

## मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला पाठिंब्याच्या चर्चा निराधार

मुंबई,ता.१५–

आगामी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार संसदेत मांडणार असल्याची चर्चा असलेल्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पाठिंबा दिला जाणार असल्याच्या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी मुंबईतील पत्रकार परिषदेत सांगितले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, काही वृत्तपत्र, प्रसारमाध्यमांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. मात्र, पक्षाने याबाबत कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही. पण या बातम्यांमुळे कार्यकर्ते आणि महाविकास आघाडीमध्ये गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असल्याने पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आली.

# शेतकऱ्यांची ४८ हजार कोटींची वीज बिल थकबाकी माफ



भाजपा किसान मोर्चातर्फे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व इतर.

### मुख्यमंत्र्यांची घोषणा

■ मुंबई,ता.१५–

**राज्यातील शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंत वीजबिल आकारले जात नाही. मात्र, त्यांची वीज वापराची ४८ हजार कोटींची जुनी थकबाकीही आता माफ केली जाणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईत सत्कार सोहळ्यात बोलताना जाहीर केले. तुतारींच्या गजरात राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेकडो शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेचे उत्स्फूर्त स्वागत केले.**

शेतकऱ्यांची पाटी कोरी व्हावी आणि या पाटीवर त्याला नवा इतिहास लिहिता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात येत आहे, असे श्री. फडणवीस यांनी सांगितले. शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केल्याबद्दल भाजपा किसान मोर्चाने राज्यातील (पान २ वर)

### शेतकऱ्यांच्या नावावर दुकानदारी करणाऱ्यांना टोला

कोणतीही निवडणूक समोर नसताना सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची ग्वाही आम्ही निवडणुकीच्या काळात दिली होती. त्यानंतर झालेल्या सर्व निवडणुकांत भाजपा-महायुतीला महाराष्ट्राने अभूतपूर्व जनादेश दिला.कर्जमाफी किंवा शेतकऱ्यांच्या हिताचे कोणतेही निर्णय घेताना राजकारण केले जाणार नाही, तर केवळ शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करूनच घेतला जाईल. शेतकऱ्यांच्या नावावर आंदोलने आणि दुकानदारी करणाऱ्यांना सरकारची ही भावना कळलीच नाही, असा टोलादेखील मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना उद्देशून मारला.



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन झाल्यानंतर जल्लोषात स्वागत करण्यात आले त्याप्रसंगीचे छायाचित्र.

# माऊलींच्या गजराने सातारा दुमदुमला!

### पालखीचे जिल्ह्यात जल्लोषात स्वागत

■ सातारा,ता.१५(प्रतिनिधी)–

**नीरा नदीतील पारंपरिक स्नानानंतर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन होताच जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या वतीने औपचारिक स्वागत करण्यात आले.**

पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. प्रिया शिंदे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष राजू भोसले तसेच वाईचे प्रांताधिकारी योगेश खरमाटे यांनी पुष्पहार अर्पण करून माऊलींचे दर्शन घेत स्वागत केले. पोलीस बँडच्या सुरेल वादनाने स्वागत सोहळ्याची शोभा अधिक खुलली.

पालखी मार्गावर ठिकठिकाणी वारकऱ्यांनी रांगोळ्या, फुलांची उधळण आणि हरिनामाच्या गजरातून माऊलींचे स्वागत केले. अनेक सामाजिक संस्था, ग्रामस्थ आणि स्वयंसेवी संघटनांनी वारकऱ्यांना पिण्याचे पाणी, फराळ, वैद्यकीय मदत आणि अन्य सेवा उपलब्ध करून दिल्या. माऊलींच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

वारकरी संप्रदायाच्या या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. पालखी मार्गावर पिण्याच्या पाण्याचे टँकर, तात्पुरती आरोग्य केंद्रे, रुग्णवाहिका, स्वच्छतागृहे, स्वच्छता पथके आणि विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे. (पान २ वर)

थोर पुरुषांच्या यादीत

### अजित पवारांच्या जयंतीचा समावेश

■ मुंबई,ता.१५–



**राज्याचे दिवंगत नेते अजित पवारांची जयंती आता सर्व शासकीय कार्यालयात साजरी होणार आहे.**

राज्य सरकारने घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयानुसार, माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीचा समावेश आता शासकीय स्तरावरील अधिकृत राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या जयंती कार्यक्रमांच्या यादीत करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाने १५ जुलै, २०२६ रोजी या (पान २ वर)

# थांबलेल्या डंपरला कारची धडक;चौघे जागीच ठार

### लांजा येथील दुर्घटना

■ सरूड,ता.१५(प्रतिनिधी)–

**मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर लांजा येथील शासकीय विश्रामगृहापासून सुमारे काही मीटर अंतरावर बुधवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. महामार्गाच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या ईगल कंपनीच्या ब्रेकडाउन झालेल्या डंपरला क्रेटा कारने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. या अपघातात कारमधील चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून क्रेटा कारचा** (पान २ वर)



गाडीचा झालेला चक्काचूर

### एफबीआयच्या 'मोस्ट वाँटेड' यादीत नीतीश कौशल

■ नवी दिल्ली,ता.१५–

**अमेरिकेची तपास यंत्रणा एफबीआयने भारतीय नागरिक आणि जग्गू भगवानपुरिया टोळीशी संबंध असलेला गँगस्टर नीतीश कौशल याचा समावेश आपल्या 'मोस्ट वाँटेड' गुन्हेगारांच्या यादीत केला आहे.**

कौशलवर अमेरिकेत खून, अपहरण आणि अंमली पदार्थांच्या तस्करीसह अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागाचा आरोप आहे. तसेच, एफबीआय आता भगवानपुरिया गँगच्या (पान २ वर)

सोनम वांगचुक उपोषण

# दिल्ली उच्च न्यायालयाची केंद्र,दिल्ली सरकारला नोटीस

■ नवी दिल्ली,ता.१५–



**शिक्षण क्षेत्रातील कथित पेपरफुटी आणि अनियमिततेवरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्या सोनम वांगचुक यांनी सुरू केलेले उपोषण थांबवण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र आणि दिल्ली सरकारला नोटीस बजावली आहे. सरन्यायाधीश डी.के.उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणी** (पान २ वर)

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| कोयना | १०५.२५ | ५३.४७ |
| राधानगरी | ८.३६ | ०५.३५ |
| तुळशी | ३.४७ | ०१.९९ |
| वारणा | ३४.४० | २०.९३ |
| काळम्मावाडी | २५.३९ | ०८.२४ |
| कासारी | २.७७ | १.५६ |
| कडवी | २.५२ | १.४६ |
| कुंभी | २.७२ | १.४१ |
| पाटगाव | ३.७२ | १.८० |
| चिकोत्रा | १.५२ | ०.६१ |
| चित्री | १.८९ | १.१३ |
| जंगमहट्टी | १.२२ | ०.८५ |
| घटप्रभा | १.५६ | १.४० |
| जांबरे | ०.८२ | ०.८० |
| आंबेआहोळ | १.२४ | ०.९३ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६० |
| धामणी | १.२९ | ०१.२९ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४२५०० रु. | २२५००० रु. |

अंडी ७८० रुपये शेकडा

# दिल्लीसह अनेक राज्यांतील 'एसआयआर'ला मुदतवाढ

■ नवी दिल्ली,ता.१५–

**भारत निवडणूक आयोगाने दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेच्या वेळापत्रकात बदल केला आहे. सुधारित कार्यक्रमानुसार, दिल्लीची अंतिम मतदार यादी आता १९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यापूर्वी ही यादी ७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होणार होती.**

### मतदार यादी ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

दिल्लीचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी १४ जुलै रोजी अतिरिक्त वेळ देण्याची विनंती केल्यानंतर निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला. त्यानुसार, संपूर्ण एसआयआर प्रक्रियेच्या विविध टप्प्यांच्या तारखांमध्येही बदल करण्यात आला आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) यांच्याकडून घराघरात जाऊन करण्यात येणाऱ्या मतदार पडताळणीची मुदत आता ८ ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी ही प्रक्रिया २९ जुलै पर्यंत पूर्ण होणार होती. त्यामुळे प्रत्यक्ष पडताळणीसाठी (पान २ वर)

# परप्रांतीय युवकाकडून वृध्दाचा खून

### जाब विचारल्याच्या कारणातून गोटखिंडीतील घटना

■ आष्टा,ता.१५(वार्ताहर)–

**महिलेची छेडछाड केल्याप्रकरणाचा जाब विचारल्याच्या कारणावरून परप्रांतीय शेतमजूर कामगाराने लाकडी दांडक्याने मारून वृध्दाचा खून केला. सदरची घटना वाळवा तालुक्यातील गोटखिंडीतील गाताडे मळ्यात घडली आहे. पांडुरंग गोविंद कोकाटे (वय ७०,रा. गोटखिंडी) असे खून झालेल्या वृद्ध व्यक्तीचे नाव आहे.**

याप्रकरणी संशयित हल्लेखोर राजू नामक युवकावर खुनाचा गुन्हा नोंद झाला आहे. याप्रकरणी मंगल पांडुरंग कोकाटे यानी आष्टा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

याबाबतची मिळालेली माहिती अशी, गोटखिंडी येथील गाताडे मळा परिसरात पांडुरंग कोकाटे यांची शेती व पत्र्याचे शेड आहे. (पान २ वर)

# स्थायी समिती सभेत भाजपामध्ये फूट

## कचरा संकलन अंदाजपत्रक विषय ९ मतांनी फेटाळला

■ इचलकरंजी,ता.१५–

**स्थायी समितीच्या बुधवारी झालेल्या सभेत कचरा संकलन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या २२ कोटी १८ हजार ३२२ रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्याच्या विषयावरुन भाजपात म्हणजेच आवाडे-हाळवणकर गटात फुट पडली. या विषयावर झालेल्या मतदानात हा विषय ६ विरुध्द ९ मतांनी फेटाळण्यात आला.**

भाजपातील हाळवणकर गटाच्या बाजूने शिवशाहू विकास आघाडीच्या चार सदस्यांनी मतदान केले. स्थायी समितीच्या सभेत झालेली ही राजकीय घडामोड भविष्यातील मोठी नांदी ठरु शकते असे बोलले जात आहे. भाजपातील अंतर्गत कलह उघड झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

विविध ५ विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी स्थायी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. २२ कोटी रुपये खर्चाच्या कचरा संकलन विषयाच्या अंदाजपत्रकावरुन वाद झाल्याने सोमवारची स्थायीची सभा तहकूब करण्यात आली होती. त्यामुळे या विषयावर आजच्या सभेत काय निर्णय होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. बुधवारी झालेल्या सभेत या विषयावर मतदान घेण्यात आले. त्यामध्ये विषयाच्या बाजूने ६ तर विरोधात ९ मते पडल्याने सदरचा अंदाजपत्रक मंजूर करण्याचा विषय नामंजूर करण्यात आला. त्यामुळे भाजपात मोठी खळबळ उडाली आहे. भाजपामध्येच फुट पडल्याने त्याचा फायदा शिवशाहू विकास आघाडीने घेत भाजपातील एका गटाला साथ दिल्याचे उघडकीस आले. त्यामुळे भविष्यात राजकीय समीकरणे बदलाचे संकेतच यानिमित्ताने मिळाल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, या संदर्भात स्थायी समिती सदस्य तानाजी पोवार, सौ. विजया महाजन यांनी सांगितले की, घरोघरी कचरा संकलन कामाच्या अंदाजपत्रकात चार ते साडेचार कोटी रुपये अतिरिक्त दाखविण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी होणार आहे. तसेच महानगरपालिका प्रशासनाने वेगवेगळी कामे न दाखवता सर्व कामे एकत्र घेऊन नगरसेवकांना अंधारात ठेवले आहे. चुकीची कामे कदापि खपवून घेतली जाणार नाही. त्यामुळे विरोधात मतदान केल्याचे स्पष्ट केले. यावेळी प्रदीप धूत्रे, सुनील महाजन, मारुती पाथरवट, जहांगीर पटेकरी आदी पदाधिकारी उपस्थित होते.





### ठरावाच्या बाजूने सहा तर विरोधात नऊ जणांचे मतदान

ठरावाच्या बाजूने सभापती सतिश मुळीक, रवी रजपुते, सुशांत कलागते, नितेश पोवार, सौ. ध्रुवती दळवाई आणि सौ. किरण खवरे यांनी तर विरोधात तानाजी पोवार, प्रदीप धूत्रे, मनोज हिंगमिरे, सौ. विजया महाजन, सौ. वैशाली मोहिते, सौ. संगिता आलासे, सौ. रुपाली कोकणे, परवेज गैबान व सुनिल तेलनाडे यांनी मतदान केले.

### विरोध करणे दुर्दैवी-महापौर

घरोघरी कचरा संकलनासह घंटागाडी, सफाई कर्मचारी, सारण गटार स्वच्छता, केंदाळ काढणे आदी कामांचे अंदाजपत्रक एकत्र केले आहे. ते काही नगरसेवकांना पटले नाही. त्यामुळे हा निर्णय सर्वच नगरसेवकांना तसेच नेते मंडळींना पटेल असा नाही. तेव्हा नेते मंडळींच्या मार्गदर्शनानुसार आणि शहर स्वच्छतेच्या दृष्टीने हे काम पूर्ण केले जाणारच असे महापौर उदय धातुंडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले

### सतीश मुळीक यांनी राजीनामा द्यावा-पाटील

स्वच्छतेच्या बाबतीत इंदौर शहराची स्वप्ने दाखवून कोट्यवधी रुपयांचा ढपला पाडण्याचा सत्तारुढ गटाचा डाव होता. मात्र सभासदांमधील एका गटाने विरोध दर्शविला. जनतेच्या हितासाठी आम्ही त्यांना पाठींबा देत मतदान केले. भाजपाचे राक्षसी बहुमत असताना स्थायी समिती सभापती सतिश मुळीक यांना साधे अंदाजपत्रक मंजूर करता येत नाही. त्यामुळे ही नैतिकता समजून मुळीक यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधी पक्षनेते उदयसिंग पाटील यांनी केली. यावेळी परवेज गैबान, प्रकाश मोरबाळे, शशांक बावचकर आदी उपस्थित होते.

### हास्यतुषार - सुरेंद्र दास



विरोधक कोणी वर्षावर गेला की लगेच भुकंपाच्या बातम्यांचा वर्षाव सुरू होतोच !

महासत्ता



(पान १ वरून)

## थांबलेल्या डंपरला कारची धडक;चौघे जागीच ठार

चक्काचुर झाला असून आतील तिघांचा मृतदेह देहाच्या चिंधड्या झाल्या होत्या.चालक गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, क्रेटा कार गोव्याहून मुंबईच्या दिशेने जात असताना लांजा शासकीय विश्रामगृहाच्या मागील बाजूस रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या डंपरला पाठीमागून धडकली. धडक इतकी भीषण होती की कारचा समोरील भाग पूर्णपणे चेंदामेंदा झाला. या अपघातात यास्मिन कुरेशी (वय ५४), मुहंमद इरफान कुरेशी (वय १६), फिझा इरफान कुरेशी (वय २७) आणि मुस्तफा खान (वय ३०) यांचा मृत्यू झाला. तर कारचा चालक मोहम्मद अनस कुरेशी (वय ३२) गंभीर जखमी असून त्याला पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आले आहे. अपघातातील सर्वजण मुंबई येथील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे.

अपघाताची माहिती मिळताच महाराष्ट्र पोलीस केंद्र, हातखंबा महामार्ग पोलीस तसेच लांजा पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अपघातस्थळी बॅरिकेडिंग करून महामार्गावरील वाहतूक एका बाजूने वळविण्यात आली. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला हटविण्याचे काम सुरू असून वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या प्रकरणी लांजा पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद झाली असून या घटनेचा अधिक तपास लांजा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निळकंठ बांगळे करत आहेत.

## एफबीआयच्या 'मोस्ट वाँटेड' यादीत नीतीश कौशल

कारवायांपर्यंत पोहोचत असल्याचे मानले जात आहे. तपास यंत्रणेने म्हटले आहे की, नीतीश कौशल हा एका आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी संघटनेशी संबंधित असल्याच्या आरोपाखाली वाँटेड घोषित करण्यात आला आहे. ही संघटना खून, अपहरण, अंमली पदार्थांची तस्करी, खंडणी वसुली, शस्त्रास्त्रांची तस्करी, मनी लॉन्डरिंग आणि मानव तस्करी यासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याचा आरोप आहे.

## दिल्ली उच्च न्यायालयाची केंद्र,दिल्ली सरकारला नोटीस

१६ जुलै रोजी सुनावणी घेण्याचे आदेश दिले आहेत. वकील राकेश कुमार सैनी यांनी ही याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान, सैनी यांनी सांगितले की, एक मानवाधिकार कार्यकर्ता आपल्या निषेधाचा हक्क बजावण्यासाठी संपूर्ण राष्ट्रासमोर आपल्या प्राणांचे बलिदान देण्यास तयार असतो. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, न्यायालयाने १६ जुलै रोजी सुनावणी घेण्याचे आदेश दिले. न्यायालयाने केंद्र आणि दिल्ली सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांना या प्रकरणी त्यांचे निर्देश सादर करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने याचिकाकर्त्याला केंद्र आणि दिल्ली सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांना याचिकेची एक प्रत देण्याचे निर्देश दिले आहेत.

दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केलेल्या एका जनहित याचिकेत सोनम वांगचुक यांचा जीव वाचवण्यासाठी तात्काळ रुग्णालयात दाखल करून आवश्यक वैद्यकीय उपचार देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, गरज पडल्यास त्यांना जबरदस्तीने खाऊ घालण्याची आणि जीवनसत्त्वे व इतर आवश्यक पोषक तत्वे देण्याची मागणीही या याचिकेत करण्यात आली आहे. या याचिकेत म्हटले आहे की, सोनम वांगचुक यांचे वजन अंदाजे ८.५ किलोग्रॅमने कमी झाले आहे. याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की, जर त्यांच्यासोबत काही अनुचित घटना घडली, तर ती देशासाठी आणि जगासाठी अत्यंत दुःखद आणि लज्जास्पद असेल.

वांगचुक हे २८ जूनपासून उपोषणावर आहे. त्यांनी जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पक्षाने आयोजित केलेल्या आंदोलनात भाग घेतला होता आणि तेव्हापासून ते सतत उपोषण करत आहे. नीट पेपरफुटी आणि शिक्षण क्षेत्रातील इतर अनियमिततांवरून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी हे आंदोलन सुरू आहे.

## अजित पवारांच्या जयंतीचा समावेश

संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते हसन मुश्रीफ आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्र्यांकडे तशी मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून, दादांच्या महाराष्ट्राच्या विकासातील अभूतपूर्व योगदानाचा हा मोठा सन्मान मानला जात आहे. स्व.अजितदादा पवार यांची पहिली जयंती २२ जुलै रोजी राज्यभर शासकीय स्तरावर साजरी केली जाणार आहे.

२२ जुलै या दिवशी मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना शासकीय मानवंदना दिली जाईल. हा आदेश राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयांनाही बंधनकारक करण्यात आला आहे.



(माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन झाल्यानंतर मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी वारकरी बनून वारीमध्ये सहभागी झाले. तर दुसऱ्या छायाचित्रात स्वागतासाठी पालकमंत्री शंभूराज देसाई, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील व इतर.)

# माऊलींच्या गजराने सातारा दुमदुमला!

(पान १ वरून)

वाहतूक सुरळीत राहावी यासाठी विशेष नियोजन करण्यात आले असून, संपूर्ण पालखी मार्गावर कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रशासनाच्या नियोजनाबद्दल वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

माऊलींच्या स्वागतासाठी राज्य मंत्रिमंडळातील तीन मंत्र्यांसह जिल्ह्यातील प्रमुख लोकप्रतिनिधी एकाच व्यासपीठावर उपस्थित राहिल्याने या स्वागत सोहळ्याला राजकीय रंगही लाभला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख नेत्यांनी वारकरी संप्रदायाशी संवाद साधत उपस्थिती लावल्याची चर्चा पालखी मार्गावर रंगली. मात्र, राजकीय चर्चांपेक्षा 'माऊली'च्या नामस्मरणात तल्लीन झालेल्या वारकऱ्यांसाठी हा दिवस भक्ती, समता आणि वारकरी परंपरेच्या संस्कारांचा उत्सव ठरला.

पोलिसांच्या सीसीटीव्ही ड्रोन तसेच साध्या वेशातील पोलिसांसह सर्वच सुरक्षा दलातील पोलिसांचा तगडा बंदोबस्त राखण्यात आला आहे.

## सोलापूर-मुंबई विमानसेवा २ ऑगस्टपासून पुन्हा सुरू

■ सोलापूर,ता.१५–

**सोलापूर विमानतळावरून २८ जून पासून बंद असलेली सोलापूर ते मुंबई विमानसेवा स्टार एअरलाईन कंपनीकडून २ ऑगस्ट २०२६ पासून पुन्हा सुरू करण्यात येत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेनंतर कंपनीने हा निर्णय घेतला आहे.**

२८ जून २०२६ पासून स्टार एअरलाईनची सोलापूर-मुंबई विमानसेवा तांत्रिक कारणांमुळे बंद करण्यात आली होती. या मार्गावरील विमानसेवा बंद झाल्याने व्यापारी, उद्योजक, रुग्ण तसेच नोकरदार वर्गाची मोठी गैरसोय होत होती. सोलापूरकरांनी ही सेवा तात्काळ सुरू करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्टार एअरलाइन कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सोलापूर ते मुंबई विमानसेवा तात्काळ सुरू करण्याबाबतचे निर्देश दिले होते. त्याचबरोबर मुख्यमंत्री कार्यालयाकडूनही कंपनीला विमानसेवा सुरू करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. श्री. गोरे यांनी दिल्ली येथे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडेही याबाबत पाठपुरावा केला होता.

या प्रयत्नांना यश आले असून स्टार एअरलाईन कंपनीने २ ऑगस्ट पासून सोलापूर-मुंबई मार्गावर विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीने त्यांचे ऑनलाइन बुकिंग काउंटर सुरू करून २ ऑगस्ट पासूनच्या सोलापूर ते मुंबई प्रवासासाठी बुकिंग घेण्यास सुरुवात केली आहे.

## व्हेनेझुएला भूकंप: मृतांची संख्या ४७००

■ कारकास,ता.१५–

**व्हेनेझुएलामध्ये सुमारे तीन आठवड्यांपूर्वी झालेल्या विनाशकारी भूकंपात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ४,७०० च्या पुढे गेली आहे. तसेच, सुमारे १७ हजार जण जखमी झाले आहेत.नुकताच प्रसिद्ध झालेल्या अधिकृत अहवालात ही माहिती देण्यात आली.**

२४ जून रोजी व्हेनेझुएलामध्ये रिश्टर स्केलवर ७.२ आणि ७.५ तीव्रतेचे दोन भीषण भूकंप झाले होते. हे दोन्ही धक्के अवघ्या एका मिनिटाच्या अंतराने जाणवले, ज्यामुळे किनारपट्टीवरील ला ग्वायरा राज्याचे मोठे नुकसान झाले.

या नैसर्गिक आपत्तीत किमान ४,७३४ जणांचा मृत्यू झाला असून १६,७४० जण जखमी झाले आहेत. या भीषण भूकंपानंतर सुमारे ५० हजार लोक अजूनही बेपत्ता आहेत.

# उद्योगस्नेही महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन-मंत्री सावकारे

## 'भारत टेक्स' प्रदर्शनात महाराष्ट्र दालनाचे उद्‌घाटन

■ नवी दिल्ली,ता.१५(प्रतिनिधी)–

**नवी दिल्लीतील प्रगती मैदान येथील भारत मंडपममध्ये आयोजित करण्यात आलेल्या देशातील सर्वात मोठ्या जागतिक वस्त्रोद्योग प्रदर्शन 'भारत टेक्स २०२६' मध्ये वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या दालनाचे उदघाटन करण्यात आले. यंदा महाराष्ट्राचा भागीदार राज्य (पार्टनर स्टेट) म्हणून या प्रतिष्ठित प्रदर्शनात सहभाग असून, राज्याच्या वस्त्रोद्योग क्षेत्रातील क्षमता, परंपरा आणि आधुनिकतेचा संगमाचे दर्शन या दालनातून होत आहे.**

वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती अंशू सिन्हा, महाराष्ट्र शासनाच्या नवी दिल्लीतील निवासी आयुक्त श्वेता सिंघल, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने, उपसचिव श्रीकृष्ण पवार, रेशीम विभागाचे उपसचिव तुषार पवार, माजी मंत्री प्रकाश आवाडे, वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष अशोक स्वामी यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि विविध उद्योग प्रतिनिधी उपस्थित होते.

उद्‌घाटनानंतर माध्यमांशी संवाद साधताना मंत्री संजय सावकारे यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे दालन हे राज्याच्या समृद्ध वस्त्रोद्योग परंपरेसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणारे आहे. पारंपरिक तंतूपासून अत्याधुनिक तंत्रज्ञानापर्यंतचा संपूर्ण प्रवास या दालनातून प्रभावीपणे साकारण्यात आला असून, महाराष्ट्राचे वस्त्रोद्योग धोरण हे देशातील सर्वाधिक उद्योगस्नेही धोरणांपैकी एक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या दालनात पारंपरिक पैठणी, करवत काठी, हिमरू, खण साड्या, सोलापूरच्या जगप्रसिद्ध चादरी, बांबू टॉवेल्स, टेरी टॉवेल्स तसेच भौगोलिक मानांकन (जीआय टॅग) प्राप्त कोल्हापुरी चपला यांसारख्या महाराष्ट्राच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांचे प्रदर्शन करण्यात आले असून, देश-विदेशातील खरेदीदार, निर्यातदार आणि उद्योग प्रतिनिधींकडून या उत्पादनांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १४ जुलै पासून सुरू झालेल्या भारत टेक्स २०२६ या प्रदर्शनात १३० हून अधिक देशांतील सुमारे सहा हजार आंतरराष्ट्रीय खरेदीदार आणि १.३ लाखांपेक्षा अधिक व्यावसायिक प्रतिनिधी या जागतिक प्रदर्शनात सहभागी झाले आहेत.



महाराष्ट्र दालनाचे दिप प्रज्वलन करून उद्‌घाटन वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, सचिव श्रीमती अंशू सिन्हा, वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष अशोक स्वामी व शेजारी इतर अधिकारी वर्ग.

## विवाहितेचा छळप्रकरणी पतीसह तिघांवर गुन्हा

■ कोल्हापूर ता.१५(प्रतिनिधी)–

**माहेरून रोख रक्कम व सोन्याचे दागिने आणावेत, या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू आणि दीराविरुद्ध कागल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाणीत विवाहितेचा डावा हात दंडातून फ्रॅक्चर झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.**

याप्रकरणी वैष्णवी धैर्यशील मगदूम (वय २५, रा.कागल) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पती धैर्यशील शिवाजीराव मगदूम, सासू नीता शिवाजीराव मगदूम आणि दीर शिवराज शिवाजीराव मगदूम (रा. कागल) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डिसेंबर २०२४ ते ४ जुलै २०२६ या कालावधीत संशयितांनी माहेरून पैसे व सोन्याचे दागिने आणण्यासाठी वैष्णवी यांचा वारंवार शारीरिक व मानसिक छळ केला. त्यांना शिवीगाळ करून क्रूर वागणूक दिल्याचाही आरोप आहे.

४ जुलै रोजी झालेल्या वादात पती आणि सासू यांनी मारहाण केल्याने वैष्णवी यांच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत होऊन दंडाचे हाड फ्रॅक्चर झाले, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. सातत्याने होणाऱ्या छळाला कंटाळून वैष्णवी यांनी १४ जुलै रोजी कागल पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार तिघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून, सहायक फौजदार कोचरगी पुढील तपास करीत आहेत.

# अमेरिका-इराण तणाव शिगेला

## ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर संघर्ष वाढण्याची शक्यता

■ तेहरान,ता.१५–

**अमेरिका ने मंगळवारी रात्री सलग चौथ्या दिवशी इराणवर हवाई हल्ले केले. अमेरिकेच्या सेंट्रल कमांड नुसार, सुमारे ७ तास चाललेल्या या लष्करी मोहिमेत होर्मुज सामुद्रधुनीच्या परिसरातील इराणचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन तळ, नौदल संसाधने तसेच किनारी संरक्षण यंत्रणांना लक्ष्य करण्यात आले.**



इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) दावा केला की, अमेरिकेच्या कारवाईला प्रत्युत्तर देत त्यांनी बहरीन, कुवेत आणि जॉर्डनमधील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले केले आहेत. आयआरजीसीने बहरीनमधील अमेरिकेच्या फिफ्थ फ्लीट बेस आणि जॉर्डनमधील अजराक एअरबेसला लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला इशारा देताना सांगितले की, जर इराणने करारासाठी पुढाकार घेतला नाही, तर पुढील आठवड्यात वीज केंद्रे आणि पूल यांसारख्या पायाभूत सुविधांनाही लक्ष्य केले जाऊ शकते.दुसरीकडे, इराणने अमेरिकेच्या दबावापुढे झुकणार नसल्याचे स्पष्ट केले असून, होर्मुज सामुद्रधुनीबाबत आपली रणनीती कायम ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने बुधवारी सांगितले की, इराणच्या ग्रेटर तुंब बेटावर सुमारे ९० मिनिटे हवाई कारवाई करण्यात आली. या हल्ल्यांमध्ये इराणची संरक्षण यंत्रणा, क्रूझ क्षेपणास्त्र साठवण केंद्रे आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळांना लक्ष्य करण्यात आल्याचा दावा अमेरिकेने केला आहे.अमेरिकेच्या म्हणण्यानुसार, या कारवाईचा उद्देश होर्मुज सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांवर हल्ला करण्यासाठी वापरल्या जाऊ शकणाऱ्या इराणच्या लष्करी क्षमतांना कमकुवत करणे हा आहे.

**इराणचा दावा: २६० हून अधिक जखमी**

इराणच्या आरोग्य मंत्रालयाने दावा केला आहे की, अलीकडील अमेरिकन हल्ल्यांमध्ये २६० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. मंत्रालयाचे प्रवक्ते हुसैन केरमनपौर यांनी ही माहिती दिली.त्यांच्या म्हणण्यानुसार, जखमींमध्ये किमान तीन महिला आणि सहा मुलांचा समावेश आहे. आतापर्यंत २२२ जखमींना उपचारानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.यापूर्वी इराण सरकारच्या प्रवक्त्या फातेमेह मोहाजेरानी यांनी दक्षिण इराणवरील अमेरिकन हल्ल्यांमध्ये ३० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याचा दावा केला होता.

## परप्रांतीय युवकाकडून वृध्दाचा खून

(पान १ वरून)

पांडुरंग कोकाटे हे वृद्धावस्थेत असल्याने तेथेच वास्तवास असतात. कुटुंबीय गावात राहतात. त्यांच्या शेती शेजारीच वकील बाळासो कोळेकर यांची शेत जमीन आहे. तीन महिन्यापासून कोळेकर यांच्याकडे राजू नामक परप्रांतीय युवक शेतमजुरी करण्यास आहे.

बुधवारी सकाळी अकराच्या सुमारास कोकाटे यांच्या कुटुंबातील महिला जनावरांना वैरण पाणी करण्यासाठी शेडमध्ये आल्या होत्या. यावेळी परप्रांतीय राजू याने महिलेची छेडछाड केली. पांडुरंग अपंग असल्याने काही करू शकत नव्हते. त्यांनी महिलेला घराकडे जाऊन कुटुंबीयांना घेऊन येण्यास सांगितले. यावेळी महिला घराकडे पळत आली. दरम्यान यावेळी राजू व पांडुरंग यांच्यात वादावादी झाली. राजू यांनी पांडुरंग यांच्या अंगावर बसून छातीवर, पायावर, हातावर मारहाण केली.

दरम्यान मंगल कोकाटे आणि त्यांची जाऊ कमल या दोघी काही लोकांना घेऊन घटनास्थळी गेल्या. यावेळी शेडमध्ये लाल रंगाचा टी-शर्ट घातलेल्या राजू याच्या हातात दांडके होते. पांडुरंग यांच्या नाका-तोंडातून रक्त येऊन ते व्हिवळत होते. त्यावेळी पांडुरंग यांनी हातवारे करीत राजू यांनी मारले असल्याचे खूणवून सांगितले. दरम्यान, घटनास्थळी त्यांचा मुलगा सचिन व काही नातेवाईक आले. यावेळी राजू याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र गावकऱ्यांनी त्याला पकडले. पोलिसांना घटनेची माहिती दिली.

जखमी अवस्थेत पांडुरंग यांना आष्टा येथील ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. गोटखिंडीत खून झाल्याची बातमी मिळताच आष्टा पोलिसांचे पथक दाखल झाले. अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारावकर, पोलीस उपाधीक्षक अरुण पाटील, पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर जंगम यांनी घटनास्थळी भेट दिली. सांगली फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळची पाहणी केली.

# शेतकऱ्यांची वीज बिल थकबाकी माफ

(पान १ वरून)

शेतकऱ्यांच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात श्री. फडणवीस यांचा सत्कार सोहळा आयोजित केला होता. या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना मख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी क्षेत्राच्या परिवर्तनाचा व्यापक आराखडा राज्यासमोर सादर केला.

आज कर्जमाफी व्यतिरिक्त शेतकऱ्यास ९५ हजार कोटींचे साह्य दिले जात असून शेतीक्षेत्र सक्षम आणि शाश्वत व्हावे यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार हातात हात घालून प्रयत्न करत आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. मात्र, कर्जमाफी हा अंतिम उपाय नाही. शेतकऱ्यांना सातत्याने कर्जमाफी द्यावी लागत असेल, तर शेतीची अवस्था कठीण आहे, असा त्याचा स्पष्ट अर्थ आहे. त्यामुळे शेती फायद्याची व्हावी यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्याखेरीज पर्याय नाही.

शेतीच्या क्षेत्रात नव्या पद्धती, नवे तंत्रज्ञान आणणे ही गरज आहे. त्यासाठी गुंतवणूक ही अडचण असल्याचे ओळखून २०१४ नंतर शेतीक्षेत्रात गुंतवणूक करण्याचा निर्णय सरकारने घेतला. मागेल त्याला शेततळे योजनेतून राज्यातील लाखो शेतकऱ्यांना नव्या संधी दिसल्या, त्याची फळे आता दिसू लागली आहेत. जलयुक्त शिवारमुळे आता शेतकरी तीन तीन पिके घेऊ लागला आहे. शेतमालाला आता जागतिक बाजारपेठ उपलब्ध आहे. त्याचा फायदा घ्यायचा असेल तर उत्पादकता वाढवून उत्पादन खर्च कमी करावा लागेल, त्यामुळे गटशेतीच्या योजनेतून शेतकऱ्यांना त्याचा फायदा घेता येईल. पुढच्या काळात शेतकऱ्यांचे गट तयार केले तर शेतकऱ्यांना पूरक पिके घेता येतील, आणि शेती हा उद्योग फायद्यात आणता येईल, असा विश्वासही देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्याचा शेतीखर्च कमी व्हावा यासाठी दरवर्षी २५ हजार कोटींची वीजबिलमाफी दिली जात असल्याने राज्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात वीज मिळू लागली आहे. सौरपंप आणि सौरकृषीवाहिनी योजनांमुळे ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळू लागली असून वर्षअखेरीपर्यंत शंभर टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जाईल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून या सोहळ्यास उपस्थित राहिलेल्या शेतकऱ्यांचे आभार व्यक्त करताना मुख्यमंत्री भारावून गेले. या निमित्ताने शेतकऱ्यांशी संवाद करण्याची संधी मिळावी म्हणून मी हा सत्कार स्वीकारला, असे सांगून, संपूर्ण मंत्रिमंडळाच्या वतीने मी हा सत्कार स्वीकारत आहे, अशी विनम्र भावनाही त्यांनी व्यक्त केली.

## दिल्लीसह अनेक राज्यांतील 'एसआयआर'ला मुदतवाढ

(पान १ वरून)

सुमारे दहा दिवसांचा अतिरिक्त कालावधी उपलब्ध झाला आहे.

तसेच, मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीखही बदलण्यात आली असून ती आता १७ ऑगस्ट रोजी जाहीर केली जाणार आहे. यापूर्वी हा मसुदा ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार होता.मसुदा यादी प्रसिद्ध झाल्यानंतर मतदारांना दावे आणि हरकती नोंदविण्यासाठी १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत मतदार आपल्या नावातील किंवा तपशीलातील त्रुटींविषयी दावे अथवा हरकती सादर करू शकतील.

नवीन अधिसूचनेनुसार, अंतिम मतदार यादी १९ ऑक्टोबर रोजी प्रकाशित केली जाणार असून संपूर्ण एसआयआर प्रक्रिया सुमारे १२ दिवसांनी पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र, मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील पडताळणीचे काम पूर्ववत सुरू राहणार आहे.

विशेष म्हणजे, दिल्लीमध्ये ३० जूनपासून बूथ लेव्हल अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांच्या तपशीलांची प्रत्यक्ष पडताळणी करीत आहेत. अतिरिक्त मुदतीमुळे निवडणूक यंत्रणेला हे काम अधिक प्रभावीपणे पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे.

## पीओकेमध्ये आंदोलकांवर गोळीबार; ८ जणांचा मृत्यू

इस्लामाबाद,ता.१५–

**पाकव्याप्त काश्मीरमध्ये (पीओके) विधानसभा निवडणुकांपूर्वी परिस्थिती दिवसेंदिवस अधिक तणावपूर्ण होत आहे. आंदोलकांवर पाकिस्तानच्या सुरक्षा दलांकडून गोळीबार करण्यात आला आहे. यामध्ये ८ जणांचा मृत्यू झाल्याचे स्थानिक स्तरावर सांगितले जात आहे.**

निवडणूकविरोधी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रावलकोट आणि सुधनोती दरम्यान आंदोलकांवर गोळीबार झाल्याची माहिती समोर आली आहे. स्थानिकांच्या दाव्यानुसार या घटनेत ८ आंदोलकांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. मात्र, या दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.मोठ्या संख्येने आंदोलक मुजफ्फराबादकडे जाण्यासाठी जमले होते. त्यावेळी रावलकोट बसस्थानक परिसरात सुरक्षा दलांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांना पांगवण्यासाठी अश्रुधूराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या तसेच गोळीबारही करण्यात आल्याचे वृत्त आहे. सरकारविरोधातील या आंदोलनात महिलांचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग असल्याचे सांगितले जात आहे.



दै.महासत्ताचे संपादक वसंतराव दत्तवाडे यांना श्रध्दांजली वाहताना निपाणी तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य.

# निपाणीत दै.महासत्ताचे संपादक वसंतराव दत्तवाडे यांना श्रध्दांजली

निपाणी,ता.१५(प्रतिनिधी)–

**इचलकरंजी येथील दैनिक महासत्ताचे संस्थापक संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांचे शनिवार ता.११ रोजी निधन झाले.त्यांना निपाणी तालुका पत्रकार संघाच्यावतीने बुधवारी श्रध्दांजली वाहण्यात आली.यावेळी पत्रकारितेतील आदर्श व्यक्तीमत्व हरपल्याची भावना उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केली.**

प्रथम राज पठाण यांच्या हस्ते दत्तवाडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी संघाचे अध्यक्ष अमोल नागराळे म्हणाले, वसंतराव दत्तवाडे यांनी पत्रकारितेत अनेक युवकांना संधी देऊन त्यांना घडविले. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी अन्य उद्योग, व्यवसायाच्या माध्यमातून अनेकांना रोजगार दिला.निपाणी भागातील नागरी समस्यांवर त्यांचे विशेष लक्ष होते.त्यांच्या निधनाने पत्रकारीता क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून ती भरून न निघण्यासारखी आहे.

पत्रकार राजेश शेडगे म्हणाले, सर्वांशी आपुलकीने वागणारे वसंतराव दत्तवाडे यांचे निपाणीतील पत्रकारांना नेहमी मार्गदर्शन असायचे.कुठलीही पार्श्वभूमी नसताना नव्याने दैनिक काढून ते यशस्वीपणे चालविण्याचे धाडस दत्तवाडे साहेबांनी केले.पत्रकार विठ्ठल केसरकर यांनी मनोगतातून दत्तवाडे साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला.यावेळी सचिव राहुल पाटील, अमर गुरव, लियाकत शिरकोळी, आश्विन अम्मणगी, सोमनाथ खोत, सुनिल वारके, सिकंदर माळकरी, महेश शिंपुकडे आप्पासाहेब दिंडे यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

# गॅरेज चालकाला लोखंडी घणाने मारहाण

## जर्मनी गॅंगच्या म्होरक्यास अटक

इचलकरंजी ता.१५–

**गॅरेज चालकाला लोखंडी घणाने मारहाण करून त्याच्याकडील मोबाईल हिसकावून घेतला आणि तक्रार केल्यास कुटुंबासह जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी जर्मनी गॅंगचा म्होरक्या रुपेश पंडित नरवाडे (रा. भोने माळ) याला शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली आहे.**

येथील रुपेश नरवाडे याने २६ जून रोजी भोनेमाळमधील सितांजय बाळू भिसे (वय २८, रा. लिगाडे मळा) याच्या गॅरेजमध्ये जाऊन पैसे आणि मोबाईलची मागणी केली. भिसे याने पैसे नसल्याचे सांगताच नरवाडे याने लोखंडी घणाने भिसे याला मारहाण करुन त्याच्या खिशातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला. तसेच पोलीस ठाण्यात तक्रार केल्यास कुटुंबासह जीवे मारण्याची धमकी दिली होती. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा तपास करताना नरवाडे हा नागरिकांचे मोबाईल हिसकावून दहशत दाखवत त्यांचा पासवर्ड मिळवायचा आणि त्यानंतर त्यांच्या बँक खात्यातील रक्कम ऑनलाईन अन्य व्यक्तींच्या खात्यावर वर्ग करून आर्थिक फसवणुक करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी नरवाडे याला अटक केली आहे.

# इचलकरंजीत गोवा बनावटीचा दारू साठा जप्त

## साडेपाच लाखाचा मुद्देमाल हस्तगत

इचलकरंजी,ता.१५–

**विनापरवाना बेकायदेशीरित्या गोवा बनावटीची दारु जवळ बाळगल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी एकास अटक केली आहे. लालूप्रसाद अरविंद यादव (वय २९ रा. कोरोची) असे त्याचे नांव आहे. त्याच्याकडून २ लाख २८ हजाराची गोवा बनावटीची दारु आणि ३ लाखाची स्कोडा गाडी असा ५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, कोरोची परिसरातील अमोल बेकरीच्या पिछाडीस लालुप्रसाद यादव याने विनापरवाना बेकायदेशीरित्या गोवा बनावटीच्या मद्याचा साठा बाळगल्याची माहिती शिवाजीनगर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने त्याठिकाणी छापा टाकला असता स्कोडा (एमएच ०३ बीडब्लू ४७७०) या चारचाकीमध्ये कर चुकविण्याच्या उद्देशाने आणलेला मोठ्या प्रमाणात मद्याचा साठा मिळून आला. त्यामध्ये २ लाख २८ हजाराचा गोवा बनावटीचा मद्याचा साठा, ३ लाखाची स्कोडा कार आणि १२ हजार रुपयांचा मोबाईल असा ५ लाख ४० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस निरिक्षक शरद मेमाणे, सपोनि विजय मस्कर, पोऊनि अनिल चव्हाण, पोलिस अंमलदार सद्दाम सनदी, गणेश सनदी, शिरीष कांबळे, तुषार सुर्यवंशी, प्रमोद चव्हाण आदींच्या पथकाने केली.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील वृध्द ठार, नात जखमी

इचलकरंजी,ता.१५–

**भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील वृध्दाचा मृत्यू झाला. तर युवती जखमी झाली. हा अपघात कबनूर येथे घडला. या प्रकरणी सुपेरा अकबर शेख (वय १९ रा. दत्तनगर कबनूर) हिने फिर्याद दिली असून ट्रकचालक सौरभ शिवाजी चव्हाण (वय २५ रा. शिरगाववाडी ता. चिक्कोडी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, बुधवारी सकाळच्या सुमारास फिर्यादी सुपेरा शेख ही आपले आजोबा रहिमतुल्ला आलम पठाण (वय ६०) हे टिव्हीएस मोपेड (क्र. एमएच ०९ सीक्यु २०४६) वरुन कबनूरकडून इचलकरंजीकडे निघाले होते. कबनूर येथील हॉटेल दुर्गांबानजीक पाठीमागून आलेल्या ट्रक (क्र. एमएच ०९ जीएक्स ८४६९) ने जोराची धडक दिली. त्यामध्ये सुपेरा व रहिमतुल्ला हे दोघेही रस्त्यावर आपटले. त्यामध्ये रहिमतुल्ला पठाण हे गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला तर सुपेरा ही जखमी झाली आहे. तिच्या फिर्यादीवरुन ट्रकचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एसटीच्या धडकेत वृध्दा जखमी

सांगली,ता.१५(प्रतिनिधी)–

**शहरातील राम मंदिर चौकात रस्ता ओंलाडणाऱ्या वृध्द महिलेला वेगात आलेल्या एसटीने धडक दिल्याने वृध्दा गंभीर जखमी झाली. या अपघातात रंजना गोविंद पोपलघट (रा. सिध्देश्वर सोसायटी, जुना कुपवाड रस्ता, सांगली) या जखमी झाल्या आहेत. याप्रकरणी ओंकार पोपलघट यांनी फिर्याद नोंदविली आहे.**

याबाबत मिळालेल्या अधिक माहिती अशी की, फिर्यादी ओंकार यांची आई रंजना पोपलघट या सोमवारी रात्री ८ च्या सुमारास राम मंदिर चौकात असलेल्या स्वराज्य फ्लॉवर्स येथून रस्ता ओलांडत होत्या. त्यावेळी विटा - सांगली ही बस (क्र. एमएच १० डीटी ३२८८) तेथून वेगात जात होती. त्या बसची रंजना यांना धडक बसली. त्या खाली पडल्याने त्यांच्या डाव्या पायाच्या पंज्यावरुन बसचे पाठीमागील चाक गेले. यामध्ये त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान फिर्याद नोंद होताच पोलिसांनी बसचालक वैभव विनायक खरमाटे (रा. वंजारवाडी, ता. तासगाव) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# महिलेवर कोयत्याने हल्ला; चौघांना अटक

इचलकरंजी,ता.१५–

**पैजेच्या पैशांची मागणी करत एकास मारहाण करताना कोयत्याने वार करुन महिलेस जखमी केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.**

सुरज उर्फ चिल्या मारुती माने, निलेश मारुती माने, विशाल गणपती माने व सौरभ दाडमोडे (सर्व रा. जवाहरनगर) अशी त्यांची नांवे असून मुस्ता सिकंदर शेख (वय २७ रा. जयभिमनगर) याने फिर्याद दिली आहे.दरम्यान अटक केलेल्या चौंघांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले.



मारहाण प्रकरणी अटक केलेल्या चौघांना न्यायालयात हजर करताना घेतलेले छायाचित्र. (छाया : मयूर चिंदे)

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, फिर्यादी मुस्ता शेख आणि संशयित यांच्यात क्रिकेटवर पैज लागली होती. ही पैज शेख हा हरल्याने पैजेचे ७० हजार रुपये मागणीसाठी तगादा लावला होता.

त्यातूनच मंगळवारी सायंकाळच्या सुमारास चिल्या माने, निलेश माने, विशाल माने व सौरभ दाडमोडे हे शेख याच्या घरात गेले. त्यांनी पैज हरल्याचे पैसे देण्याची मागणी करत दमदाटी करु लागले. त्यातूनच चिल्या याने कोयत्याने शेख याच्यावर वार केला असता फरजाना चाँद गडकर (वय ४२ रा. इचलकरंजी) या वाचविण्यासाठी आडव्या आल्या. त्यामुळे कोयत्याचा वार त्यांच्या डाव्या हातावर बसल्याने त्या जखमी झाल्या. या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मतदार यादी अद्ययावतीकरण मोहिमेचा बोजवारा ?

## नागरिकांना अद्याप फॉर्मच मिळाले नाहीत

कोल्हापूर, ता. १५ (प्रतिनिधी) –

**निवडणूक आयोगाच्या एसआयआर–२०२६ (विशेष संक्षिप्त पुनरिक्षण मोहीम) अंतर्गत मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम राज्यभर सुरू असले तरी कोल्हापूर जिल्ह्यात या मोहिमेची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने होत असल्याचा आरोप प्रजासत्ताक सामाजिक सेवा संस्थेने केला आहे. मोहिमेची निम्मी मुदत संपली तरी अनेक भागांतील नागरिकांना छापील इन्युमरेशन फॉर्मच मिळाले नसल्याने पात्र मतदार यादीतून वंचित राहण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.**

यासंदर्भात संस्थेचे अध्यक्ष दिलीप देसाई यांनी जिल्हाधिकारी यांना ई–मेलद्वारे निवेदन पाठवून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. तसेच या प्रकरणी राज्य निवडणूक आयोगाचेही लक्ष वेधण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाने ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत विशेष संक्षिप्त पुनरिक्षण मोहीम राबविण्याचे नियोजन केले आहे. या मोहिमेत बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) यांनी घरोघरी जाऊन मतदारांना छापील फॉर्म वितरित करून ते भरून घेणे अपेक्षित आहे. मात्र, जुलैचा अर्धा महिना संपूनही जिल्ह्यातील अनेक ग्रामीण आणि शहरी भागांत फॉर्मचे वितरण सुरू झालेले नाही, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

शहरी भागातील काही ठिकाणी मर्यादित स्वरूपात काम सुरू असले तरी बहुतांश तालुके आणि ग्रामीण भागात फॉर्म नागरिकांपर्यंत पोहोचलेले नाहीत. उर्वरित अवघ्या दोन आठवड्यांत इतके मोठे काम पूर्ण होणार कसे, असा सवाल उपस्थित करत प्रशासनाने मोहिमेला गती द्यावी, अशी मागणी प्रजासत्ताक सामाजिक सेवा संस्थेने केली आहे.

# हुपरीत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरुच

## प्रशासनाने तोडगा काढण्याचे आवाहन

हुपरी, ता. १५(वार्ताहर)–

**हुपरी नगरपरिषदेकडील स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी किमान वेतन आयोगानुसार वेतन मिळावे, या मागणीसाठी सुरू केलेले काम बंद आंदोलन आज दुसऱ्या दिवशीही सुरूच राहिले. ठेकेदाराने यापूर्वीच्या ठेकेदारांनुसार वेतन देण्याची तयारी दर्शवली होती, मात्र कर्मचाऱ्यांनी हा तोडगा फेटाळून लावत आंदोलन सुरूच ठेवले.**

दरम्यान,ठेकेदाराने बाहेरील कर्मचारी आणून काम सुरू केले. याला आंदोलनकर्त्यांनी स्थानिक कर्मचारी असा मुद्दा उपस्थित करत विरोध करण्याचा प्रयत्न केला,यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करीत आंदोलकांना शांत करण्याचा प्रयत्न केला.त्यांनतर ठेकेदाराने काम सुरूच ठेवले. यामुळे आंदोलनकर्ते अधिक आक्रमक झाले असून त्यांनी आंदोलन तीव्र करण्याची भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने तात्काळ मध्यस्थी करून स्वच्छतेचा प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी हुपरी शहरातून होत आहे.

ठेकेदार व कर्मचारी यांनी शहराच्या स्वच्छतेचा आणि नागरिकांच्या आरोग्याचा विचार करावा. दोन्ही बाजूंनी सामोपचाराने या प्रश्नावर मार्ग काढून लवकरात लवकर काम सुरू करावे. शहराच्या विकासाच्या आड येण्याच्या भूमिकेतून सदरच्या आंदोलनाचे कोणीही राजकारण करू नये असे आवाहन नगराध्यक्ष मंगलराव माळगे यांनी केले.

# अनधिकृत पाणी जोडण्या, दुकाने व लॉजिंगवर कठोर कारवाई करा

## आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड

कोल्हापूर ता. १५ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत अतिक्रमण हटविण्यासाठी होत असलेल्या उपाययोजनाबरोबरच शहरातील पार्किंग व्यवस्था सुधारण्यासाठी तसेच अनधिकृत हातगाड्या, केबिन्स, पाणी जोडण्या, परवाना नसलेली दुकाने व लॉजिंग यांच्याविरोधातील कारवाई सातत्याने सुरू ठेवण्याचे निर्देश आयुक्त डॉ.राजेंद्र भारुड त्यांनी दिले. महापालिकेत झालेल्या विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.**

बैठकीत हलसवडे येथील सोलर प्रकल्प, मल्टीलेव्हल कार पार्किंग तसेच हॉकी स्टेडियम परिसरातील महापालिकेच्या ताब्यात आलेल्या इमारतीसाठी तातडीने निविदा प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणीपुरवठा विभागाने गळती दुरुस्तीसोबतच अनधिकृत पाणी जोडण्यांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करावी, पाईपलाईनला जोडलेल्या मोटारी जप्त कराव्यात तसेच शहरातील गळती दुरुस्तीसाठी वार्षिक एजन्सी नियुक्त करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले. परवाना न घेता सुरू असलेली दुकाने, लॉज, मिळकती सील करण्यासाठी घरफाळा व परवाना विभागाने संयुक्त मोहीम राबवावी. अधिकृत फेरीवाल्यांना जीपीएस आधारित क्यूआर ओळखपत्र देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच परवाना व अग्निशमन विभागाने संयुक्तपणे लॉजिंग व खासगी क्लासेसची तपासणी करुन विना परवाना आस्थापनांवर सीलची कारवाई करण्याचे आदेश दिले जेणेकरून कोणतीही संभाव्य दुर्घटना टाळता येतील.

यावेळी अतिरिक्त रविकांत आडसूळ, शिल्पा दरेकर, उप–आयुक्त परितोष कंकाळ, किरणकुमार धनवाडे, सहाय्यक आयुक्त स्वाती दुधाणे, डॉ.विजय पाटील, राम काटकर, कलावती मिसाळ, राजश्री पाटील, रमेश मस्कर, हर्षजीत घाटगे, सुनील बिद्री, डॉ.प्रकाश पावरा, महादेव फुलारी, सुरेश पाटील, निवास पोवार, अरुणकुमार गवळी, सहा.अभियंता नारायण पुजारी, मुख्य जयवंत पवार, प्रशांत पंडत, विधी अधिकारी संदीप तायडे,समीर व्याघ्रांबरे, यशपालसिंह रजपूत, मनीष रणभिसे उपस्थित होते.

# प्लास्टिक वापरावर महापालिकेची धडक कारवाई

## नऊ व्यावसायिकांकडून अकरा हजार चारशेचा दंड वसूल

कोल्हापूर ,ता. १५(प्रतिनिधी)–

**शहरातील स्वच्छतेस बाधा आणणाऱ्या, रस्त्यावर थुंकणारा आणि बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणाऱ्या व्यावसायिक व नागरिकांविरोधात कोल्हापूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. बुधवारी लक्ष्मीपुरी, सोमवार पेठ आणि गंजी गल्ली परिसरात या विशेष उपद्रव शोध पथकाद्वारे मोहीम राबविण्यात आली.**

या कारवाईत अल–अरोमा बेकरी, नागनाथ भिसे, सरताज मलिक, शंकर चौरागे, अभिजीत पिसाळ किराणा स्टोअर, अशोक दवंडी, वासिम मनेर, शाहिद बागवान आणि वहिम बागवान यांच्यावर बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर केल्याप्रकरणी एकूण ११ हजार ४०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांच्या आदेशानुसार उपद्रव शोध पथकाने ही कारवाई केली. महापालिकेच्या या पथकाने गेल्या १५ दिवसांपासून शहरात जनजागृती मोहीम राबवून नागरिक आणि व्यावसायिकांना प्लास्टिकचा वापर टाळण्याचे तसेच शहर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले आहे.

आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन विभागाने नागरिक, व्यावसायिक आणि विक्रेत्यांना दैनंदिन कचरा केवळ महापालिकेच्या अधिकृत घंटागाडीमध्येच देण्याचे आवाहन केले आहे.

सार्वजनिक रस्त्यावर थुंकणे, उघड्यावर कचरा जाळणे किंवा कचरा रस्त्यावर अथवा नाल्यात टाकणे टाळावे, अन्यथा संबंधितांवर महाराष्ट्र प्लास्टिक व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भातील लागू नियम आणि नियंत्रण अधिनियम, १९९८ मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई किंवा गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही महापालिकेने दिला आहे.

# किरकोळ कारणातून एकास रॉडने मारहाण

मिरज,ता.१५(प्रतिनिधी)–

**मिरजेतील सुभाष नगर येथे पाहुण्यांची गाडी घरासमोर वळविल्याने त्या रागातून एका लोखंडी रॉडने मारून जखमी करण्यात आल्याची घटना घडली आहे. याबाबत मिरज ग्रामीण पोलिसात फिर्याद देण्यात आली असून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सुभाष नगर परिसरातील हूळे प्लॉट येथे ही घटना घडली आहे.**

जखमी मुबारक इस्माईल जातकर (वय २४) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी लालासाब जातकर, अमीर सैफन जातकर, उस्मान लालासाब जातकर (सर्व रा. सुभाष नगर) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिरज ग्रामीण पोलिस पुढील तपास करीत आहेत.



भावपूर्ण श्रध्दांजली !

साथ होती जन्मांतरीची..

सुटली कशी अर्ध्यावरी..

अघटीत घडले.. सारे थांबले..

आभाळ कोसळले आम्हावरी...

आमचे बंधू, हुपरी नगरपरिषदेचे नगरसेवक

पैलवान श्री.दिपक मधुकर बेडगे

यांचे मंगळवार दि.१४/७/२०२६ रोजी आकस्मिक दुःखद निधन झाले.

आमच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरःशांती देवो.

शोकाकुल

श्री.सुरज मधुकर बेडगे

मा. उपनगराध्यक्ष, हुपरी नगरपरिषद

संचालक, कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि; हुपरी-यळगूड

•बेडगे तालीम•श्री.अंबाबाई दूध संकलन केंद्र, हुपरी• महात्मा मुष्टीफंड•हनुमान चौक•

•रत्नदिप तरुण मंडळ•तळेवेस पीर मंडळ•बी.एफ.ग्रुप•

रक्षाविसर्जन गुरुवार दि.१६/७/२०२६ रोजी सकाळी ९ वा. वैकुंठभुमी हुपरी येथे.

DIGVIJAY - 9960123408

# जोतिबा डोंगरावर बिबट्याचे दर्शन

## शासकीय विश्रामगृहाजवळ कुत्र्यावर हल्ला

जोतिबा,ता. १५ ( वार्ताहर ) –

**जोतिबा डोंगर धार्मिक क्षेत्र असलेल्या प्रसिद्ध जोतिबा डोंगर (वाडी रत्नागिरी) परिसरात मंगळवारी मध्यरात्री बिबट्याचे दर्शन झाल्याने खळबळ उडाली आहे. डोंगर परिसरातील शासकीय विश्रामधाम (विश्रामगृह) जवळ एका कुत्र्यावर हल्ला करताना हा बिबट्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.**

मंगळवारी रात्री साधारण २ वाजण्याच्या सुमारास, जोतिबा डोंगरावरील शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात पूर्ण शांतता असताना एका बिबट्याने तेथे प्रवेश केला. विश्रामगृहाबाहेर असणाऱ्या एका कुत्र्यावर या बिबट्याने दबा धरून थेट हल्ला चढवला. हा थरारक प्रकार तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे रेकॉर्ड झाला आहे.

### नागरिक आणि भाविकांमध्ये भीतीचे वातावरण

जोतिबा डोंगरावर दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. तसेच डोंगराच्या पायथ्याशी आणि परिसरात मोठी लोकवस्ती आहे. मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने थेट शासकीय इमारतीच्या परिसरात येऊन हल्ला केल्यामुळे स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि भाविकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याच्या या वावरामुळे रात्रीच्या वेळी डोंगरावर फिरणे धोक्याचे बनले आहे.



वन विभागाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन परिसरात गस्त वाढवावी आणि बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी तात्काळ पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात आहे.

सुविचार :- 'आपले हात रथाची दोरी धरतील, तेव्हा देव तुमच्या जीवनाची खरी दोरी धरेल. तुमचे हात प्रयत्न करतील, आणि देव तुमच्या मार्गातील सर्व अडथळे दूर करेल.'

■ संपादकीय ■

# सरकारी कात्री !

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत ज्या लाडक्या बहिणींसाठी सरकारी तिजोरीचे दरवाजे सताड उघडे करण्यात आले होते, त्याच बहिणींच्या पदरात आता अपात्रतेचे दान पडू लागले आहे. ई-केवायसी व अन्य सबबींखाली तब्बल ९२ लाख बहिणींना योजनेबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. निवडणूक संपली, मतांचे दान पदरात पडले, आणि आता सरकारी मायेचा झरा सुकू लागला आहे असाच यातून बोध घेता येतो. शासकीय व्यवस्थेचा हा यू-टर्न थक्क करणारा तर आहेच, पण तितकाच संतापजनकही आहे. गमतीचा भाग म्हणजे असा यू-टर्न केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर इतरही राज्यांत वेगवेगळ्या प्रकरणांत घेतला जातो आहे. निवडणुकांच्या तोंडावर आमिषांची बरसात करायची आणि नंतर त्याचीच बोळवण करायची हाच खेळ सुरू आहे. मधल्या काळात ही मंडळी आपली खुर्ची घट्ट करून घेतात. लाडकी बहीण प्रकरणात सरकारकडून दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, सुरुवातीला २.६३ कोटी नोंदणी झाली आणि तब्बल २.४७ कोटी बहिणींना दरमहा १५०० रुपये वाटण्यात आले. पण जेव्हा केवायसीची चाळणी लावली, तेव्हा हा आकडा थेट १.६७ कोटींवर येऊन ठेपला. या संपूर्ण प्रक्रियेत प्रशासनाच्याच गलथानपणाची लक्तरे वेशीवर टांगली गेली. मते मिळवण्याच्या घाईत प्रशासनाने कागदपत्रांची प्राथमिक तपासणी का केली नाही, हा सगळ्यांत महत्त्वाचा प्रश्न. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, सुमारे १४ लाख पुरूषांनीही या योजनेत घुसखोरी केली आहे. अगोदरही सरकारी कर्मचाऱ्यांनी व सधन महिलांनी या योजनेत हात धुऊन घेतले होते. पुरुषांना लाडकी बहीण बनवून सरकारी अर्थात सर्वसामान्यांचा कररूपी पैसा वाटणारा हा कोणता महाराष्ट्र आहे असा सवालही विचारायची सोय नाही कारण चुकांकडे बोट दाखवणे म्हणजे एकतर सरकारविरोधी अथवा थेट जनविरोधीच ठरवले जाण्याचा धोका दिवसेंदिवस बळावतो आहे. आता अपात्र ठरलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांकडून पैसे वसूल केले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. पण मूळ प्रश्न हाच आहे की, आधी सरकारी तिजोरी उधळताना डोळे मिटून बसलेली यंत्रणा आता कोणत्या तोंडाने नियमांचे गुणगान गात आहे ? विरोधी पक्षांनी टीका सुरू केल्यानंतर सरकारी पक्षाकडूनही प्रत्यारोपांच्या फैरी सुरू झाल्या आहेत. लाडक्या बहिणींच्या यादीत जी पुरूषांची नावे आहेत ती विरोधी पक्षांनीच घुसवली आहेत असा आरोप सरकार पक्षाच्या प्रवक्त्यांनी केला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, सरकारने योजना सुरू केली तेव्हापासूनच विरोधकांना पोटदुखी सुरू झाली होती. त्यामुळेच ते न्यायालयातही गेले होते. यांनी म्हणजे विरोधकांनी यांच्या सत्तेच्या काळात गरजू माता-भगिनींना साधी फुटकी कवडीही कधी दिली नाही, याउलट आम्ही दिले तर त्याला विरोध केला जातो आहे. योजना बंद केली जाणार नाही, मात्र काही बोगस नावे वगळावीच लागणार आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. याचा अर्थ अजून काही महिला यातून बाहेर गेल्या तर आश्चर्य वाटायला नको. महिला कल्याणासाठी बजेट थेट ३३ हजार कोटींवर नेले, ही स्वागतार्ह बाब मानली तरी, त्यासाठी इतर महत्त्वाच्या आणि पायाभूत योजनांचा बळी दिला गेला, त्याचे काय? राज्याचा गृहनिर्माण विभागाचा खर्च ५४ टक्क्यांनी आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा खर्च ३१.८१ टक्क्यांनी कमी करण्यात आला असे सांगितले जाते. म्हणजे एका हाताने बहिणीला १५०० रुपये द्यायचे आणि दुसऱ्या हाताने तिच्या हक्काच्या घराचे स्वप्न आणि पिण्याच्या पाण्याचा अधिकार हिरावून घ्यायचा, हा कसला समतोल ? कॅगने देखील बजेटपेक्षा ३, ५४१ कोटी रुपयांच्या अतिरिक्त आणि अनधिकृत खर्चावर बोट ठेवले आहे. या अतिरिक्त पैशांचा कोणताही अधिकृत हिशेब न ठेवणे हे केवळ प्रशासकीय ढिसाळपणाचे लक्षण नाही, तर करदात्यांच्या पैशांची क्रूर थट्टा आहे. निवडणुकीपूर्वी ज्या बहिणी लाडक्या होत्या त्यातील तब्बल ९२ लाख निवडणुकीनंतर अचानक अपात्र कशा झाल्या? हा आकडा फार मोठा आहे, याचा अर्थ योजना सुरू केल्यानंतर आजपर्यंत जे झाले ते सगळे रामभरोसेच होते असे म्हणायला हवे. अगोदरच नियम कठोर का करण्यात आले नाहीत? निवडणुकांचे निकाल लागेपर्यंत सर्व काही आलबेल होते आणि आता राज्याला अचानक आर्थिक शिस्तीचे महत्त्व पटू लागले आहे, हा निव्वळ योगायोग नक्कीच नाही. निवडणुकीत मोफत योजनांची खैरात करायची आणि सत्तेची गणिते जुळल्यावर नियमांची कात्री चालवून हात वर करायचे, हा आजवरचा राजकीय प्रघात आहे. सुजाण महिला आणि नागरिकांनीही आता असले लोकानुनयाचे राजकारण ओळखायला हवे व त्याला थारा देऊ नये. दुसरे म्हणजे योजनांमध्ये पारदर्शकता हवी, पण ही पारदर्शकता आणि नियमांची आठवण निवडणुकीच्या आधी का येत नाहीत, या प्रश्नाचे उत्तर जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत अशा योजनांना कल्याणकारी म्हणायचे की निवडणुकीचा जुमला, हे जनतेने आता स्वतःच ठरवलेले बरे!

# पूर्ण राज्याच्या दर्जाची गुंतागुंत

**पाच ऑगस्ट २०१९ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० अंतर्गत असलेला विशेष दर्जा रद्द करण्याची आणि राज्याचे विभाजन करून जम्मू-काश्मीर व लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्याची घोषणा केली. त्याच वेळी त्यांनी संसदेत स्पष्ट आश्वासन दिले होते की, योग्य वेळी जम्मू-काश्मीरला पुन्हा पूर्ण राज्याचा दर्जा दिला जाईल. हा शब्द त्यांनी लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांत विरोधकांच्या तीव्र टीकेनंतर दिला होता.**

स्वातंत्र्यानंतर प्रथमच एखाद्या राज्याचा दर्जा वाढविण्याऐवजी कमी करण्यात येत असल्याचा आरोप काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी केला होता. राज्यसभेत तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी या निर्णयावर कठोर टीका करत, भारतीय संघराज्याच्या इतिहासात हा अभूतपूर्व निर्णय असल्याचे म्हटले होते. जम्मू-काश्मीरचे पाकिस्तानशी लागून असलेले भौगोलिक स्थान, तसेच भारतात विलीन होताना देण्यात आलेले विशेष अधिकार यांचा संदर्भ देत केंद्र सरकारने कलम ३७० हटविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राज्याचा विशेष दर्जा संपुष्टात आला आणि त्याचबरोबर पूर्ण राज्याचाही दर्जा काढून घेण्यात आला. काँग्रेसने त्यावेळी कलम ३७० हटविण्यालाही विरोध केला होता. मात्र राज्यसभेत भाजपकडे आवश्यक संख्याबळ नसतानाही अनेक प्रादेशिक पक्षांनी सरकारच्या बाजूने मतदान केल्याने हा घटनादुरुस्तीचा प्रस्ताव मंजूर झाला. यानंतर देशातील राजकीय वातावरणातही बदल झाला. कालांतराने काँग्रेसमधील काही नेत्यांनीही कलम ३७० हटविण्याच्या निर्णयाला अप्रत्यक्ष समर्थन देण्यास सुरुवात केली. काही मोजक्या प्रादेशिक पक्षांचा अपवाद वगळता या मुद्यावर देशात व्यापक सहमती निर्माण झाल्याचे चित्र दिसू लागले. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. मात्र न्यायालयानेही केंद्र सरकारच्या भूमिकेला मान्यता दिली. त्यामुळे कलम ३७० हटविण्याच्या निर्णयाला घटनात्मक वैधता मिळाली. तथापि, जम्मू-काश्मीरचा पूर्ण राज्याचा दर्जा काढून घेण्याबाबत मात्र अनेकांच्या मनात प्रश्न कायम राहिले. राज्याचे क्षेत्रफळ कमी करून त्याला केंद्रशासित प्रदेशाचा



दर्जा देण्याची गरज होती का, याबाबत मतभेद कायम होते. याच पार्श्वभूमीवर अमित शहा यांनी संसदेत पूर्ण राज्याचा दर्जा योग्य वेळी परत दिला जाईल, असे आश्वासन दिले होते. आता त्या घोषणेला जवळपास सहा वर्षे पूर्ण होत आली आहेत. या काळात जम्मू-काश्मीरमध्ये अनेक महत्त्वाचे राजकीय बदल झाले. पंचायत निवडणुका,स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच मर्यादित अधिकार असलेल्या विधानसभेच्या निवडणुकाही पार पडल्या.राज्यपालांऐवजी उप राज्यपालांच्या माध्यमातून प्रशासन चालविण्याची व्यवस्थाही स्थिर झाली. २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस यांनी आघाडी करून निवडणूक लढवली. या आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले आणि फारूक अब्दुल्ला यांचे पुत्र उमर अब्दुल्ला यांनी मुख्यमंत्रीपदाची सुत्रे स्वीकारली.मात्र काँग्रेसने सरकारला पाठिंबा देऊनही मंत्रिमंडळात सहभागी होण्यास नकार दिला. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळेपर्यंत मंत्रिमंडळात सहभागी होणार नसल्याची भूमिका काँग्रेसने घेतली. मुख्यमंत्री झाल्यानंतर उमर अब्दुल्ला यांनी सातत्याने जम्मू-काश्मीरला इतर राज्यांप्रमाणे समान घटनात्मक अधिकार मिळावेत, अशी मागणी लावून धरली. नॅशनल कॉन्फरन्सबरोबरच पीडीपी आणि काँग्रेस यांनीही या मागणीला पूर्ण पाठिंबा दिला आहे. विशेष म्हणजे भारतीय जनता पक्षानेही या मागणीला तत्त्वत: विरोध केलेला नाही. मात्र सुरक्षा आणि प्रशासकीय परिस्थिती पूर्णपणे अनुकूल झाल्यानंतरच योग्य वेळी पूर्ण राज्याचा दर्जा दिला जाईल, अशी भूमिका केंद्र सरकारने कायम ठेवली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून नॅशनल कॉन्फरन्सचे कार्यकर्ते दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करत आहेत. या आंदोलनातून केंद्र सरकारने दिलेले आश्वासन तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात येत आहे. दुसरीकडे उमर अब्दुल्ला यांनी केंद्र सरकार त्यांच्या सरकारला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे पूर्ण राज्याच्या दर्जाच्या प्रश्नावर केंद्र आणि जम्मू-काश्मीर सरकार यांच्यातील मतभेद अधिक तीव्र झाल्याचे दिसून येत आहे. उमर अब्दुल्ला यांचा दावा आहे की, मुख्यमंत्री झाल्यापासून ते सातत्याने ही मागणी करत आहेत, मात्र केंद्र सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. विशेष म्हणजे २०२४ मध्ये विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा काही प्रादेशिक पक्षांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतली होती. अशा वेळी नॅशनल कॉन्फरन्सने निवडणुकीत सहभागी होण्याचा निर्णय घेत भारतीय संविधान आणि लोकशाही प्रक्रियेवर आपला विश्वास व्यक्त केला होता. त्यामुळे आता केंद्र सरकारनेही दिलेले आश्वासन पाळण्याची वेळ आली असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. याशिवाय २० जुलैपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान दिल्लीत आंदोलनाचे नवे मार्ग अवलंबण्याचाही इशारा त्यांनी दिला आहे.

**दैनंदिनी**

प्रत्यक्षात पाहता, जम्मू-काश्मीरला भविष्यात पूर्ण राज्याचा दर्जा देण्याबाबत केंद्र सरकारने संसदेतच वचन दिलेले आहे. त्यामुळे या प्रश्नावर दीर्घकाळ अनिश्चितता कायम ठेवण्यापेक्षा केंद्र आणि जम्मू-काश्मीर सरकारने परस्पर संवादातून स्पष्ट, वेळबद्ध आणि सर्वमान्य आराखडा तयार करणे अधिक योग्य ठरेल.त्यामुळे राजकीय वाद कमी होण्यास मदत होईल,लोकशाही संस्थांवरील विश्वासही अधिक दृढ होईल. अशा संवेदनशील विषयात संघर्षापेक्षा संवाद आणि आश्वासनांपेक्षा निश्चित कृती यांनाच अधिक महत्त्व आहे.

**“ हृदयविकारानंतर जगभरात सर्वाधिक जीव घेणारा आजार म्हणून कर्करोगाने पुन्हा एकदा धोक्याची घंटा वाजवली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या ताज्या अहवालानुसार दरवर्षी जगभरात जवळपास एक कोटी लोकांचा कर्करोगामुळे मृत्यू होतो, तर दोन कोटींहून अधिक नवीन रुग्णांचे निदान होते. दररोज २६ हजारांहून अधिक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळतो. ही केवळ आरोग्य क्षेत्रातील आकडेवारी नाही; ती जगासमोरील गंभीर सामाजिक, आर्थिक आणि मानवी संकटाची नोंद आहे. अधिक चिंतेची बाब म्हणजे २०५० पर्यंत कर्करोगाच्या नवीन रुग्णसंख्येत ६७ ते ७७ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हा इशारा दुर्लक्षित करण्याची चूक मानवजातीला परवडणारी नाही. ”**

# वाढणाऱ्या कर्करोगाच्या धोक्याची घंटा

## वैद्यकीय उपचारांसोबत जनजागृती गरजेची

भारताची परिस्थितीही तितकीच गंभीर आहे. प्रत्येक नऊ भारतीयांपैकी एका व्यक्तीला आयुष्यात कधीतरी कर्करोग होण्याचा धोका आहे. चीन आणि अमेरिकेनंतर भारताचा कर्करुग्णांच्या संख्येत तिसरा क्रमांक लागतो. २०२६ मध्ये देशातील कर्करुग्णांची संख्या २० लाखांच्या घरात जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आपली लोकसंख्या मोठी असल्याने हा प्रश्न केवळ वैद्यकीय राहत नाही; तो राष्ट्रीय उत्पादकता, अर्थव्यवस्था, सामाजिक सुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा विषय बनतो. एका कुटुंबातील कमावती व्यक्तीला कर्करोग झाल्यास संपूर्ण कुटुंब आर्थिक, मानसिक आणि सामाजिक संकटात सापडते.

आजचा कर्करोग हा केवळ नशिबाचा खेळ राहिलेला नाही. त्यामागे बदलती जीवनशैली मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत आहे. तंबाखूचे सेवन, धूम्रपान, गुटखा, मावा, मद्यपान, लठ्ठपणा, व्यायामाचा अभाव, प्रक्रिया केलेले अन्न, प्रदूषण आणि वाढता ताण या सर्वांचा थेट संबंध कर्करोगाशी जोडला जात आहे. विशेषतः फुफ्फुसाचा कर्करोग हा जगातील सर्वाधिक मृत्यू घडवणारा कर्करोग ठरत आहे. भारतात मुखाचा कर्करोगही मोठ्या प्रमाणात आढळतो आणि त्यामागे तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसन हे प्रमुख कारण आहे. स्त्रियांमध्ये स्तनाचा आणि गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग वाढत आहे. यातील अनेक प्रकार योग्य वेळी निदान झाले तर पूर्णपणे बरे होऊ शकतात, ही वस्तुस्थिती अनेकदा दुर्लक्षित राहते.

कर्करोगाविषयीचा सर्वात मोठा गैरसमज म्हणजे तो मृत्यूचे निश्चित निमंत्रण. प्रत्यक्षात अनेक प्रकारचे कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यात ओळखले गेले तर उपचार यशस्वी होण्याची शक्यता खूप जास्त असते. लवकर निदान म्हणजे कमी खर्च आणि अधिक आयुष्य; उशिरा निदान म्हणजे प्रचंड खर्च आणि कमी शक्यता हे सूत्र आता प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचले पाहिजे. दुर्दैवाने भारतात प्रतिबंधात्मक तपासणीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. १००० महिलांपैकी केवळ एक महिला नियमित कर्करोग तपासणी करून घेते, ही बाब धक्कादायक आहे. मॅमोग्राफी, पॅप स्मिअर, मुख तपासणी आणि इतर स्क्रीनिंग सुविधा उपलब्ध असूनही जागरूकतेअभावी त्यांचा पुरेसा वापर होत नाही.

कर्करोगाविरुद्धची लढाई ही केवळ वैद्यकीय उपचारांची लढाई नाही; ती जागरूकता, प्रतिबंध, वेळेवर निदान, परवडणारे उपचार, संशोधन, सामाजिक सुरक्षा आणि सामूहिक जबाबदारी यांची लढाई आहे. आज आपण योग्य दिशा निवडली तर उद्याची लाखो आयुष्ये वाचू शकतात. कर्करोगाला घाबरण्याची गरज नाही, पण त्याकडे दुर्लक्ष करण्याची चूकही परवडणारी नाही. कारण वेळेवर घेतलेली एक तपासणी, सोडलेले एक व्यसन आणि बदललेली एक जीवनशैली एखाद्या व्यक्तीचेच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचे भविष्य बदलू शकते. जगाने दिलेला हा इशारा भारतासाठीही तितकाच महत्त्वाचा आहे. आता कृतीची वेळ आली आहे.

■ मच्छिंद्र ऐनापुरे,जत

# एकतरी वारी अनुभवावी

**अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।। असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच अवघी दुमदुमली पंढरी। भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी।, असे म्हटले जाते.**

संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी आहे. श्रीक्षेत्र आळंदी आणि देहू येथून निघणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अन् जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या म्हणजे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव. ऊन-पावसाची तमा न बाळगता टाळ-मृदुंगाचा गजर करत चालणारे वारकरी म्हणजे भावभक्तीचेच प्रतीक. कोणाच्याही तोंडवळ्यावर चिंता नाही कि मुक्कामाच्या ठिकाणी सोयीसुविधांची अपेक्षा नाही. वारकऱ्यांना प्रतिदिन १० ते २० किलोमीटरचा टप्पा चालत पार करावा लागतो. सकाळी लवकर मार्गस्थ व्हावे लागते. सायंकाळी विलंबाने



मुक्कामाच्या ठिकाणी पोहचल्यानंतर भजन-कीर्तन होऊन दिवसाची समाप्ती होते. विठुमाऊली तू माऊली जगाची। माऊलीच मूर्ती विठ्ठलाची, विठ्ठला मायबापा ।। असा वारकऱ्यांचा पंढरीच्या विठुरायाप्रती असलेला भाव जगात सुविख्यात आहे. विठ्ठल विठ्ठल, जय हरि विठ्ठल, असे विठ्ठलाला आळवत वारकरी प्रतिवर्षी वारीला जातात आणि विठ्ठलाची उपासना करतात. वर्षभर प्रपंचात म्हणजेच मायेत गुंतलेल्या जीवाला वारीमार्गात येणारे अनुभव आणि अनुभूती जीवनाचे सार सांगून जातात. वारीच्या अंतिम चरणी जेव्हा पांडुरंगाचे दर्शन घडते तेव्हा तो अनुपम्य सोहळा कधीच संपू नये असे वाटते. ज्या क्षणी जीव शिवाचे मिलन घडते तो क्षण स्वर्गीय आनंदाचा अनुभव देतो. एरव्ही आरामदायक चारचाकीतून प्रवास करून पंढरपूरला जाणे आणि वारीत सहभागी होऊन माऊलीला भेटणे यातील भेद वारकरीच सांगू शकत. या भेटीला कोणत्याही ऐहिक सुखाची सर नाही. हा आनंद जीवनात एकदा तरी घ्यावा. प्रत्येकाने आयुष्यात एक तरी वारी अनुभवावी.

■ जगन घाणेकर

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




गुरूवार,ता.१६.७.२०२६,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, ग्रीष्म ऋतो,आषाढ मासे,शुक्ल पक्षे,द्वितीया तिथी, ०८.५४ नंतर तृतीया तिथी, आश्लेषा नक्षत्र, १९.५३ नंतर मघा नक्षत्र, कर्क रास, १९.५३ नंतर सिंह रास, सिद्धी योग, २५.२३ नंतर व्यतिपात योग, कौलव करण ०८.५४ नंतर, तैतिल करण १९.३७ पर्यंत, दिनमान १२.५४, सुर्योदय ०६.१२, सुर्यास्त १९.०६, (काल्हापूरचे), राहूकाळ दुपारी १.३० ते ३, रवि कर्क राशीत प्रवेश २३.४० वाजता. मु. सफ्फर मासारंभ, पुण्यकाळ स. ११.०४ ते सुर्यास्त.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**-दिवसाची सुरवात तुम्ही योग साधनेने करू शकता.असे करणे तुमच्यासाठी फायदेशीर असेल आणि पूर्ण दिवस तुमच्यात ऊर्जा राहील. अचानक प्रवास घडेल.

**वृषभ**- एखाद्या धार्मिक स्थळी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा विचार पुढे येईल. आज तुम्ही मेहनत केलीत तर यश निश्चित मिळेल कारण आजचा दिवस तुमचाच आहे.

**मिथून**-सामाजिक आयुष्यापेक्षा आरोग्याला प्राथमिकता द्यावी लागेल.नव्या तंत्राचा आणि कौशल्यांचा वापर करीअरमधील प्रगतीसाठी गरजेचा आहे.

**कर्क**- देणगी आणि धर्मादाय कामामध्ये स्वत:ला गुंतवा, त्यातून तुम्हाला मन:शांती लाभेल.सातत्याने सकारात्मक विचार करण्याची प्रवृत्ती फलदायी ठरेल.

**सिंह**- काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल.आजच्या दिवशी मुलं आणि कुटुंबावर लक्ष केंद्रीत करा.

**कन्या**-कलात्मक आनंद देणाऱ्या कामात स्वत:ला गुंतवून घ्याल. तुमच्याजवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मन शांती असेल.

**तुळ**- व्यावसायिक आज अनुभवी लोकांसोबत व्यवसायाला पुढे वाढवण्याचा सल्ला घेऊ शकतात. सरकारी कामात वडिलधाऱ्यांचा सल्ला घ्या.

**वृश्चिक**- तुमची देण्याची वृत्ती म्हणजे अप्रत्यक्ष मदत करण्याची वृत्ती होय.त्यामुळे शंका, निरुत्साह, मत्सर, हेवा, गर्व यापासून तुम्ही मुक्त व्हाल.

**धनु**- दिवस उत्तम आहे. आजच्या दिवशी स्वतः साठी वेळ काढा आणि आपल्या कमतरता आणि गुण याचे आत्मचिंतन करा.नातेवाईकांच्या येण्याने आनंदी वातावरण राहील.

**मकर**-आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. आरोग्याची काळजी घ्या. रागावर नियंत्रण ठेवा.

**कुंभ**- स्वत:मध्ये प्रगती करणारे प्रकल्प हाती घेतले तर त्याचा दुहेरी फायदा होईल. तुम्हाला चांगले वाटेल आणि तुम्ही अधिक आत्मविश्वास बाळगू शकाल.

**मीन**- निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.तुमच्या नवीन योजना तुमच्या पालकांना विश्वासात घेऊन सांगण्यासाठी काळ उत्तम आहे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

# महान गायिकेला मुकलो

भारताच्या सुप्रसिद्ध पार्श्वगायिका ,संगितकार एस.जानकी उर्फ सिस्टला श्रीराममूर्ती जानकी यांनी ११ जुलै २०२६ रोजी



वयाच्या ८८व्या वर्षी म्हैसूर येथे अखेरचा श्वास घेतला.दक्षिणेच्या गानकोकीळा, तसेच जानकी अम्मा, म्हणून त्या सर्वांना परीचीत होत्या. त्यांचा जन्म २३ एप्रिल १९३८ रोजी पल्लापटल (रेपल्ले) गुंटूर , आंध्रप्रदेश येथे झाला.

लहानपणापासूनच त्यांनी संगिताची विशेष आवड जोपासली.वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी रंगमंचावर गायन सादर केले.१९५७ मध्ये विधीयिन विळयाट्ट या तामिळ चित्रपटातून त्यांनी पार्श्वगायिका म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरवात केली.हिंदी चित्रपट साहब,मधील प्यार बिना चैन कहा रे,हे गाणे अफाट गाजले.मेरी जंग मधील बोल बेबी बोल ,आखरी रास्ता चित्रपटातील गोरी का साजन साजन की गोरी ,हे गाणे खुपच गाजले.जवळपास सहा दशके त्यांनी आपल्या कारकीर्दीत तामिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम, तसेच हिंदीसह २० हून अधिक परदेशी भाषांमध्ये ४८ हजाराहून अधिक गाणी गायली आहे. भारतीय संगीत विश्वात त्यांनी अनमोल योगदान दिले आहे. त्यांना चार राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार,३३ विविध राज्य पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले.

२०१३ मध्ये त्यांना पद्मभूषण सन्मान जाहीर झाला होता.परंतू त्यांनी तो नम्रपणे नाकारला.तब्बल सहा दशके आपल्या गोड आवाजाने रसिकांच्या ह्दयावर अधिराज्य गाजविले.अशा या महान गायिकेला आपण मुकलो आहोत.एस.जानकी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

■ संतोष शिंदे

# राज्यात १ हजार २७४ एक शिक्षकी शाळा

युडायस प्लस २०२५-२६ च्या आकडेवारीनुसार राज्यात तब्बल १ हजार २७४ एकशिक्षकी शाळा असून पुणे जिल्ह्यात ५०४ एक शिक्षकी शाळा आहेत. एक शिक्षकी शाळांमध्ये पुणे जिल्ह्याचा राज्यात आठवा क्रमांक आहे. राज्यात एक शिक्षकी शाळांत एकूण एक लाख ७९ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेत शिक्षकांच्यावर अध्यापन याबरोबरच मुख्याध्यापकांची जबाबदारी, राज्यातील प्रशासकीय जबाबदारी, अनेक शासकीय कामांचा भार आहे. विशेष म्हणजे राज्यातील जवळपास निम्म्या एकशिक्षकी या केवळ आठ जिल्ह्यात आहेत. सरकारी शाळांचे हे विदारक चित्र अतिशय चिंतनीय आहे. राज्य सरकारकडून शिक्षक भरती, शैक्षणिक सुधारणा, गुणवत्ता शिक्षणाचे दावे केले जात असताना वेगळेच चित्र समोर आले आहे. एक शिक्षकी शाळेत शिक्षक कसे शिकवत असतील ? हा प्रश्न अनेक लोकांच्या समोर आहे. या शाळातून शिकणारे विद्यार्थी कसे अभ्यासू होणार? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

■ शांताराम वाघ

# कुपवाड ड्रेनेज,लोकप्रतिनिधींचे अपयश

कुपवाडमधील ड्रेनेज योजनेमुळे जनतेच्या पैशाचा अपव्यय झाल्याची भावना जनतेमध्ये पसरल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. २५० कोटी रुपयांच्या ड्रेनेज योजनेचा फायदा जनतेला होणेऐवजी उलट आज मनस्तापच भोगावा लागत आहे.जवळजवळ ३०० किलोमीटरच्या ड्रेनेज लाईनसाठी खर्च करूनही एकही लाईन चालू झालेली नाही. ड्रेनेजसाठी खोदलेल्या रस्त्यामुळे आज नागरिकांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.याचे सोयरसुतक ना सांगली मिरज कुपवाड महापालिका प्रशासनाला, ना कारभाऱ्यांना. नुकत्याच झालेल्या पावसाने वारणाली परिसरातील प्रभाग आठमधील रस्त्यांची अवस्था अत्यंत चिखलमय झाली तसेच इतर प्रभागातील नागरिकांना देखील ड्रेनेज सुविधा उपलब्ध न होता नागरिकांना रस्ते खोदल्याचा त्रास भोगावा लागत आहे. वास्तविक हा ड्रेनेजचा प्रकल्प उपलब्ध निधीनुसार टप्प्याटप्प्याने करणे आवश्यक होते परंतु नियोजनशुन्य प्रशासकीय धोरण याला कारणीभूत आहे. लोकप्रतिनिधींनीही या कामाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. अतिरिक्त निधीसाठी त्यांनी शासनाकडे सचोटीने प्रयत्न करून ही ड्रेनेज योजना लवकर पूर्ण करावी.

■ शशिकांत गायकवाड

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१.
टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# राज्यात मान्सूनची पुन्हा दडी

## पावसाने पाठ फिरवल्याने जलाशयातील पाण्याची आवक घटू लागली

बेंगळुरू,ता.१५(प्रतिनिधी)–

**राज्यात मान्सूनने पुन्हा एकदा दडी मारल्याने दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गडद होत चालले आहे.जुलैच्या पहिल्या आठवड्यात किनारपट्टी आणि मलनाड भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रमुख धरणांमधील पाणीसाठ्यात काहीशी वाढ झाली होती. मात्र, त्यानंतर पावसाने अचानक पाठ फिरवल्याने जलाशयांमध्ये होणारी पाण्याची आवक झपाट्याने घटू लागली असून राज्यातील अंतर्गत भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.**



पावसाच्या कमतरतेचा सर्वाधिक फटका खरीप हंगामाला बसला आहे.उत्तर अंतर्गत कर्नाटकातील बहुतांश जिल्हे आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकातील अनेक भागांमध्ये पेरण्या खोळंबल्या असून उगवलेली पिके ही पाण्याअभावी करपण्याच्या मार्गावर आहेत.शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले असून जुलै महिन्यातच दुष्काळाची चाहूल स्पष्टपणे जाणवू लागली आहे.

कर्नाटक राज्य नैसर्गिक आपत्ती निरीक्षण केंद्राच्या आकडेवारीनुसार, १ ते १० जुलै या कालावधीत राज्यात सरासरी ८४ मिमी पावसाच्या तुलनेत ८५ मिमी पाऊस झाला असला,तरी हा पाऊस प्रामुख्याने किनारपट्टी आणि मलनाड भागातच केंद्रित राहिला. दुसरीकडे, दक्षिण अंतर्गत भागात तब्बल ५८ टक्के तर उत्तर अंतर्गत भागात ६० टक्के पर्जन्यतूट नोंदविण्यात आली आहे.दक्षिण अंतर्गत भागात अपेक्षित २१ मिमी पावसाऐवजी केवळ ९ मिमी पाऊस झाल्याने तीव्र पर्जन्यतुटीची परिस्थिती निर्माण झाली आहे.

१ जून ते १० जुलै या कालावधीत राज्यात सरासरी २८४ मिमी पावसाऐवजी केवळ २०१ मिमी पाऊस झाला असून एकूण २९ टक्के पर्जन्यतूट नोंदली गेली आहे.

जानेवारी ते १० जुलै या सहा महिन्यांच्या कालावधीतही राज्यात सरासरीपेक्षा १८ टक्के कमी पाऊस झाला आहे. उत्तर अंतर्गत भाग वगळता राज्यातील बहुतांश प्रदेशात पावसाची मोठी तूट कायम आहे. हवामान तज्ज्ञांनी पुढील पंधरवडा अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले आहे.या कालावधीत मान्सूनने जोरदार पुनरागमन केले नाही,तर पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याबरोबरच खरीप हंगामावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिणामी, राज्याला यंदा दुष्काळाच्या कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागू शकते.

# मुरगूडात रस्ता पूर्ततेसाठी ठेकेदारांकडून तारीख पे तारीख

## नगरसेवकांनी प्रकल्प अधिकाऱ्यांना धरले धारेवर

## रस्ता पूर्ततेबाबत ठेकेदाराचा नव्याने अल्टिमेटम

मुरगूड,ता.१५(प्रतिनिधी)–

**मुरगूड येथे नव्याने तयार करण्यात येत असलेले रस्ता काम गेल्या चार महिन्यापासून रखडले आहे.ठेकेदार काम पूर्ततेची केवळ तारीख पे तारीख देऊन वेळकाढूपणा करीत आहेत याबाबत शहर वासियांच्यात प्रचंड नाराजी आहे.**

रस्ते कामामध्ये होत असलेल्या दिरंगाई बाबत आज नगरसेवकांनी रस्ते प्रकल्प अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. केवळ २ कि.मी. अंतराच्या शहरातील या कामासाठी तब्बल साडेचार महिन्याहून अधिक काळ उलटल्यामुळे नगरसेवक संतापले होते.मागील अल्टिमेटम संपून महिना उलटला तरी अजून काम अपुरेच असल्यामुळे अधिकाऱ्यांकडून नगरसेवकांनी कामाच्या पूर्ततेबाबतचा पुन्हा नवा लेखी अल्टिमेटम घेतला आणि कामाची गती वाढविण्याबाबत आग्रह धरला.नगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात रस्ता प्रकल्प अधिकाऱ्यांशी चर्चेसाठी बैठक झाली. यावेळी येत्या २ ऑगस्ट पर्यंत हुतात्मा तुकाराम चौक ते सर पिराजीराव तलाव दरम्यानच्या रस्त्याचे फायनल काँक्रीटीकरण पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन रस्ता प्रकल्प विभागाचे अथॉरिटी इंजिनियर प्रदीप तिवारी यांनी दिले.कागल–गडहिंग्लज रस्त्यांपैकी मुरगूड मधील सर पिराजीराव तलाव कापशी रोड – हुतात्मा तुकाराम चौक ते नाका नंबर १ हा मार्ग मुरगूड शहरांतर्गत येतो. या रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने चालले असल्याचा आरोप करत मुरगूडच्या सत्ताधारी नगरसेवकांनी रस्ता प्रकल्प विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावेळी रस्ता प्रकल्प विभागाकडून अथॉरिटी इंजिनियर प्रदीप तिवारी, सतीश चौगले, विजय चौगले, शरीफ महम्मद, अभियंता एम.एम.कुंभार, मुख्याधिकारी अतिश वाळुंज,सुहास खराडे, नगरसेवक शिवाजी चौगले, दत्तात्रय मंडलिक, दीपक शिंदे, विक्रम गोधडे, राजू कांबळे, प्रदीप देसाई,रोहित आतवाडकर, तुषार कांबळे, शशी पाटील यांनी चर्चेत भाग घेतला.



नगरसेवकांकडे नव्याने लेखी अल्टिमेटम देताना रस्ता प्रकल्पाचे अथॉरिटी इंजिनियर प्रदीप तिवारी व अन्य प्रकल्पाधिकारी.

**नवा अल्टिमेटम**

२ ऑगस्टपर्यंत तुकाराम चौक ते सर पिराजीराव तलाव रस्ता फायनल काँक्रीटीकरण करणे, पावसाळ्यानंतर तुकाराम चौक ते बस स्टँड रस्ता करणे., बस स्टँड समोरील रस्त्यावरच्या खोलगट भाग कच्चे काँक्रीट टाकून भरून घेणे.,गटर्स व पाईप लाईनच्या पाठवण्यात आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करणे.

### संकेश्वर-पंढरपूर आषाढी पायी दिंडीचे प्रस्थान

संकेश्वर,ता.१५(प्रतिनिधी)–

**येथील वारकरी सांप्रदयातर्फे आषाढी वारीचे आयोजन करण्यात आले आहे. येथील श्री शंकराचार्य संस्थान मठ येथून सकाळी ८ वाजता श्रीक्षेत्र पंढरपूरकडे पायी दिंडीचे प्रस्थान झाले.**

या पायी दिंडीत ४० वारकरी सहभागी झाले आहेत.संकेश्वर आषाढी पायी दिंडीचे हे ४९ वर्ष असून पायी दिंडीला श्री सच्चिदानंद अभिनव विद्यानृसिंह भारती महास्वामीजींनी चालना दिली. विठ्ठलाच्या नाम गजरात अन् टाळ मृदुंगाच्या निनादात दिंडी संकेश्वरातून मार्गस्थ झाली.पायी दिंडीतील वारकरींना संकेश्वर पायी दिंडी व्यवस्थापक मंडळाचे सिध्दापण्णा हेब्बाळे, सुरेश रावण, सुरेश हेब्बाळे, गणेश हेब्बाळे,सागर एक्संबी, सुरेश जाधव,संतोष भरमण्णावर व भक्तगणांनी निरोप दिला.

# बेळगाव जिल्ह्यास तीन मंत्रीपदासाठी मुख्यमंत्र्यावर दबाव

## सहा आमदारांपैकी कुणाला मंत्रीपद मिळणार याकडे जिल्ह्याचे लक्ष

निपाणी,ता.१५(प्रतिनिधी)–

**राजकीय दिशादर्शक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सीमावर्ती जिल्ह्यातील बेळगावच्या सहा काँग्रेस आमदारांनी पक्षश्रेष्ठी आणि राज्य नेत्यांवर दबाव आणण्यासाठी एक नवीन राजकीय युद्ध सुरू केले आहे. तसेच, काही मतदारसंघाच्या आमदारांनी मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांची भेट घेऊन बेळगाव जिल्ह्याला केवळ दोनच नव्हे, तर किमान तीन मंत्रीपदे देण्याची मागणी केली आहे.**

जर लक्ष्मण सवदी यांना पक्षश्रेष्ठी स्तरावर किंवा जातीय समीकरणांमुळे मंत्रीपद मिळाले नाही, तर डी.के. शिवकुमार यांच्या जवळच्या वर्तुळातील लक्ष्मी हेब्बाळकर यांना दुसरी संधी देण्याचा एक मास्टर प्लॅन आहे. जेव्हा जिल्ह्याला तीन पदे मिळण्याची चर्चा सुरू झाली, तेव्हा अशोक पट्टन, महांतेश कौजलगी, गणेश हुक्केरी आणि आसिफ सेठ यांनी लॉबिंग सुरू केले आहे.

मागील भाजप सरकारच्या काळात बेळगाव जिल्ह्याला चार मंत्रिपदे देण्यात आली होती. मात्र, या गटाच्या नेत्यांचा ठाम युक्तिवाद आहे की, सध्याच्या काँग्रेस सरकारमध्येही आम्हाला किमान तीन जागा दिल्या पाहिजेत. वरवर पाहता ही प्रतिनिधित्वाची मागणी वाटत असली तरी, या तीन मंत्रिपदांच्या मागणीमागे बेळगाव काँग्रेस नेत्यांची एक मोठी राजकीय रणनीती आहे. ३ जून रोजी डी. के. शिवकुमार यांनी १३ मंत्र्यांसह मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. सध्याच्या राज्य मंत्रिमंडळात २० मंत्रिपदे रिक्त असून, ती भरण्याची प्रक्रिया लांबली आहे. सूत्रांनुसार, डी.के. शिवकुमार, सिद्धरामय्या आणि बी.के. हरिप्रसाद यांनी आपल्या समर्थक आमदारांची यादी तयार केली असून, त्यांना मंत्रिपदासाठी हायकमांडकडे प्रस्ताव देण्यास ते तयार असल्याचे वृत्त आहे.दुसरीकडे, एआयसीसी अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह काँग्रेस हायकमांडने, २०२८ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून, आपल्या पसंतीच्या नेत्यांना मंत्रिपद देण्याबाबत स्वतंत्रपणे विचार केल्याचे म्हटले जाते.आषाढ महिना सुरू होण्यापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार होईल की नाही,याबद्दल काँग्रेस आमदारांमध्ये उत्सुकता वाढत आहे. एकूणच,बेळगाव जिल्ह्यातील ज्येष्ठ आणि कनिष्ठ नेत्यांमधील ही अंतर्गत स्पर्धा आता तीव्र झाली आहे आणि सहा काँग्रेस आमदारांपैकी कोणाला मंत्रिपद मिळेल हे पाहण्यासाठी आपल्याला प्रतीक्षा करावी लागेल.बेळगाव हा राज्यातील सर्वात मोठा जिल्हा असल्याने येथे अधिक मंत्रिपद मिळाल्यास जिल्ह्याच्या विकासाला मदत होईल. २०२८ च्या विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन, पक्षश्रेष्ठी संबंधित आमदारांच्या मंत्रिपदाचा निर्णय त्यांची जात आणि इतर घटकांच्या आधारे घेतील.

# काँग्रेस सिद्धरामय्यांच्या नेतृत्वाखाली आगामी विधानसभा निवडणुका लढवेल-ना.जारकीहोळी

बेळगाव,ता.१५(प्रतिनिधी)–

**आगामी २०२८ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुका काँग्रेस पक्ष ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालीच लढवेल, अशी स्पष्ट भूमिका सार्वजनिक बांधकाम मंत्री सतीश जारकीहोळी यांनी मांडली.**



बेळगाव जिल्हा परिषद कार्यालयात प्रसारमाध्यमांशी बोलताना जारकीहोळी म्हणाले की, सिद्धरामय्या यांना डावलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.त्यांच्या नेतृत्वाखालीच काँग्रेस पुढील विधानसभा निवडणूक लढवेल. सध्या अहिंदा (अल्पसंख्याक, मागासवर्गीय आणि दलित) नेतृत्वाबाबत कोणतीही चर्चा करण्याची आवश्यकता नसून, या समाजघटकांचे अधिक प्रभावी संघटन करणे हेच पक्षाचे प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले. मंत्रिमंडळ विस्तार आणि नव्या मंत्र्यांच्या नियुक्तीबाबत विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले की, कोणाला मंत्रीपद द्यायचे याचा अंतिम निर्णय पक्षाचे केंद्रीय नेतृत्व घेईल. आगामी निवडणुकीत पक्षाला जास्तीत जास्त फायदा होईल, अशा सर्व बाबींचा विचार करूनच निर्णय घेतला जाईल.

दूध दरवाढीच्या मागणीबाबत बोलताना जारकीहोळी म्हणाले की, यासंदर्भातील निर्णय संबंधित मंत्री आणि विभाग घेतील. सरकार परिस्थितीचा आढावा घेऊन योग्य वेळी आवश्यक निर्णय करेल. पावसाअभावी पिकांच्या नुकसानीबाबत त्यांनी सांगितले की,सध्या जिल्ह्यात नागरिक आणि जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई नाही. पेरणीची कामे पूर्ण झाली असून, पुढे वेळेवर पाऊस न झाल्यास तातडीने संयुक्त पाहणी करून शेतकऱ्यांना योग्य मदत देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.

अयोध्या राम मंदिरातील चोरीच्या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना जारकीहोळी म्हणाले की, या प्रकरणाची केंद्र सरकारने गांभीर्याने दखल घ्यावी. मंदिरांमध्ये भाविकांकडून जमा होणारा निधी हा संबंधित मंदिरांच्या विकासासाठीच वापरला गेला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

## थोडक्यात



निपाणीः येथे संतवाणी कार्यक्रमप्रसंगी उपस्थित कलाकार.

### निपाणीत डॉ.संजय गरुड यांचा संतवाणीचा कार्यक्रम संपन्न

निपाणी,ता.१५(प्रतिनिधी)–

**व्यंकटेश मंदिर, निपाणी येथे प्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायक डॉ. संजय गरुड यांचा 'संतवाणी' हा भजन,भक्तीगीताचा कार्यक्रम पार पडला.**

सुरूवातीस अकादमीच्या अध्यक्षा डॉ.मीना ससे यांनी गायक कलाकारांचे पुष्पगुछ देऊन स्वागत केले.त्यानंतर कलाकारांचा हस्ते व रमेश.पै यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उपाध्यक्ष अरुण हळदीकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ.सुहास शहा यांनी पाहुण्या कलाकारांची ओळख करून दिली.त्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. पंचपादीचे काही अभंग सादर केले.रूप पाहता लोचनी, इत्यादी 'बाजे मुरालिया बाजे',तर 'तिर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल',लक्ष्मी बाराम्मा, ही गाणी सादर केली. कार्यक्रमाची सांगता 'अगा पंढरीच्या राया 'ह्या भैरवीने केली. दोन अडीच तास भक्तीरसात श्रोते दंग होऊन गेले. सूत्रसंचालन उदय यरनाळकर यांनी केले.सुजय शहा यांनी आभार मानले.

### ऋतुराज येजरे शिष्यवृत्ती परिक्षेत राज्यात चौथा

गडहिंग्लज,ता.१५(वार्ताहर)–

**अठरा विश्व दारिद्र्याच्या परिस्थितीत वाढलेल्या गडहिंग्लजच्या ऋतुराज प्रकाश येजरे याने आपल्या कष्टाच्या व जिद्दीच्या जोरावर इयत्ता आठवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेत राज्यात चौथा क्रमांक मिळवत शिष्यवृत्तीधारक ठरला.**

तसेच उतुंग तेज फाउंडेशनच्या 'मला शास्त्रज्ञ व्हायचं आहे' या राज्यस्तरीय बालवैज्ञानिक स्पर्धेतही उल्लेखनीय यश मिळवत गुजरात मधील अहमदाबाद येथे आयआयटी आणि सायन्स सेंटर मध्ये शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली.वडील प्रकाश रोजंदारीवर सेंट्रींगचे काम तर आई मनीषा मोजमजुरी करून संसाराला हातभार लावते.मोठी बहीण श्रुती बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहे. आई–वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगले असून तो सध्या जागृती हायस्कूल गडहिंग्लज येथे इयत्ता नववी मध्ये शिक्षण घेत आहे.गरिबी माणसाची स्वप्ने हिरावून घेऊ शकत नाही; उलट स्वप्नांना अधिक बळ देते.कष्ट,चिकाटी, जिद्द आणि शिक्षणावर असलेली निष्ठा यांच्या बळावर त्यांनी यशाचा दीप प्रज्वलित केला आहे.त्याची वाटचाल अनेक होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरणारी आहे.

# सीमाभागात भेसळयुक्त दूध विक्री करणारी टोळी कार्यरत

## अनेकांच्या जीवाशी खेळ; नागरिकांतून कारवाईची मागणी

अथणी,ता.१५(प्रतिनिधी)

**महाराष्ट्रामध्ये अन्न व भेसळ आयुक्त तुकाराम मुंढे धडक कारवाई करत असल्याने महाराष्ट्रामध्ये भेसळला ब्रेक बसला आहे.आता दुधात भेसळयुक्त पावडर मिसळणारी टोळी सीमाभागांमध्ये सक्रिय असून अनेकांच्या जीवाशी खेळ करत आहेत त्यामुळे पावडर विकणाऱ्या टोळीला लवकरच गजाआड करावे,अशी मागणी सीमा भागातून होत आहे.**





महाराष्ट्र सरकारने तुकाराम मुंढे यांना अन्न व भेसळ प्रशासन आयुक्त केल्यापासून सीमा भागातील सांगली, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी धाडी घालून भेसळ दुधावर कारवाई केली आहे.आता हळूहळू भेसळ मिक्स दूध पावडर विकणारी टोळी सीमाभागामध्ये दिसून येत आहे. सीमाभागात विना नंबरप्लेटची मोटरसायकल,कार या वाहनातून भेसळ पावडर गुप्तपणे विक्री करत आहे. परंतु त्यांना कशाचीच भीती नसून अनेक ठिकाणी भेसळ पावडर विक्री करून ते कोट्याधीश बनले आहेत.त्यामुळे अनेकांच्या जीवाशी खेळ करून लहान मुले कॅन्सर सारख्या महाभयंकर रोगाला बळी पडण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रामध्ये धडक मोहीम राबवल्यामुळे सर्व भेसळ धारकांचे धाबे दणाणले आहे.

भेसळ विकणारी टोळी आता सीमाभागामध्ये अनेक गावात कार्यरत आहेत. तेथे अनेक ठिकाणी मोटरसायकलवरून फिरून भेसळ दूधाची विक्री करत आहे त्यामुळे त्यांच्यावर दाट संशय दिसून येत आहे.विशेष करून सीमा भागातील दूध सांगली, कोल्हापूर, पुणे,मुंबई या ठिकाणी जात आहे त्यामुळे अनेकांच्या जिवाशी खेळ करत भेसळधारक कोट्यवधींची माया गोळा करत आहेत. विजापूर,बेळगाव, बागलकोट जिल्ह्यातील लाखो लिटर दूध महाराष्ट्रात जात आहे त्यामुळे सीमाभागातून जाणाऱ्या दुधाची सीमेवर तपासणी केल्यास या भेसळधारकांचा पर्दाफाश होऊन सत्य उजेडात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.



### कापशीत एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रम

से.कापशी,ता.१५(वार्ताहर)–

**महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने राबविण्यात येणारा माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी हा उपक्रम सेनापती कापशी येथे उत्साहात पार पडला.प्रगतशील शेतकरी शंकर गणपती कुमठेकर यांच्या शेतावर आयोजित कार्यक्रमात सोयाबीन पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापनाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.**

कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्षा सौ.शिल्पा खोत,पंचायत समिती सदस्या श्रीमती सुनीता माळी,सरपंच सौ.उज्वला कांबळे, गावातील पदाधिकारी तसेच सुमारे ३० प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. यावेळी सोयाबीन पिकामध्ये पक्षी थांबे उभारणे, पिवळे व निळे चिकट सापळे बसविणे, कामगंध सापळे लावणे तसेच वृक्षारोपण करण्यात आले. या प्रात्यक्षिकांद्वारे रासायनिक कीडनाशकांचा वापर कमी करून एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.दरम्यान मंडळ कृषीअधिकारी नितीन भांडवले, पंचायत समिती कृषी अधिकारी अप्पासाहेब माळी, कृषी अधिकारी गौरी मठपती उपस्थित होत्या.स्वागत व प्रास्ताविक राजेंद्र कोरे यांनी केले. संताजी पाटील यांनी आभार मानले.

# दुर्गंधीयुक्त पाण्याचा प्रश्न लवकरच मिटणार

## तहसीलदार,तालुका पंचायतकडून पाहणी;रयत संघटनेच्या प्रयत्नांना यश

कोगनोळी,ता.१५(प्रतिनिधी)–

**बेनाडी (ता.निपाणी) येथील समुदाय भवनापासून येणारे गटारीचे पाणी रस्त्यावरुन वाहत आहे. त्याची विल्हेवाट मुख्य गटारीत न केल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत वारंवार निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांनी अखेर कर्नाटक राज्य रयत संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष राजू पोवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन समस्या सोडविण्याची मागणी केली होती.**

त्यानुसार मंगळवार ता. १४ रोजी दुपारी तहसीलदार सुरेश मुंजे, तालुका पंचायत अधिकारी प्रविण कट्टी, मंडल पोलीस निरीक्षक बी.एस.तळवार यांच्यासह पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



बेनाडी येथील सांडपाण्याची पाहणी करुन चर्चा करताना कर्नाटक राज्य रयत संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष राजू पोवार, तहसीलदार सुरेश मुंजे, मंडल पोलीस निरीक्षक बी.एस.तळवार, पीडीओ जावेद पटेल,दयानंद तोडकर व मान्यवर

आठवड्याभरात सांडपाण्यासह हुन्नरगी रोडवरील कॅनॉलजवळील पाण्याला वाट करुन देण्याची ग्वाही दिली आहे. त्यामुळे कर्नाटक राज्य रयत संघटनेच्या आंदोलनाला यश मिळाले आहे.यावेळी कर्नाटक राज्य रयत संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष राजू पोवार यांचीही उपस्थिती होती. ग्रामपंचायतीने बेनाडी गावातील मुख्य रस्त्यावर मांग वाड्यातील गटारीचे पाणी पुढे वाहून जाण्यासाठी मार्ग तयार केला नाही. त्यामुळे पाणी मुख्य रस्त्यावर येते. शेजारीच शाळा असून रस्त्यावरही वाहनांच्या वाहतुकीची वर्दळ आहे. त्यामुळे आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. याबाबत गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी पंचायतीला कळविले होते. पर्यावरणासह आरोग्याचा धोका आहे. ग्रामस्थांनी पंचायतीला लेखी स्वरुपात कळवूनही त्याकडे दुर्लक्ष झाले होते. परंतु त्याची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे काम न झाल्यास धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

काहींनी कालवा अडविल्याने पावसाळ्यात कालव्याचे पाणी ओढ्यात न जाता मागासवर्गीय नागरिकांच्या शेतात जाऊन नुकसान झाले. याबद्दल सिंचन विभागाकडे चौकशी केली असता गावातील गटारीचे पाणी कालव्यात येते. या पाण्याचाही निचरा करुन देण्याचे आश्वासन पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांसह पीडीओ, तलाठी आणि सेक्रेटरी यांनी दिली आहे.

यावेळी अशोक क्षीरसागर, कलगोंडा कोटगे, आनंदा गायकवाड, सुरेश चंदूरे, मल्लेश बन्ने,सचिन कोटगे, महेश क्षीरसागर, मयुर पाटील, सिद्धाप्पा मिरजे, महेश जनवाडे,काशिनाथ सांगावे, आप्पासाहेब मिरजे, सागर पाटील, प्रकाश नुले, तिपान्ना कॉनगे,आप्पासाहेब पाटील, आनंदा देशिंगे, बाबासाहेब पाटील, गुरुनाथ तेली, पीडीओ जावेद पटेल, तलाठी दयानंद तोडकर,पाटबंधारे खात्याचे अभियंते सी.एस.कुलकर्णी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

## * खरेदी विक्री *

**एनए प्लॉट** (१७०० स्क्वे.फूट) विकणे आहे. सांगली नाका, शहापूर रोड, उदगांवे स्कूल मागे, मो. ९९२१६९५९६३.

**मान्सून धमाका** किचन ट्रॉली लेटेस्ट असंख्य व्हरायटीज, बेडरूम, वार्डरोब फर्निचर, जुन्या ट्रॉली रिप्लेसमेंट दिवसे एकाच छताखाली. किचन सम्राट, इचलकरंजी. मो. ९८२२२४३६९३

**प्लॉट विकणे** रूई, मानेनगर येथील सव्वा सहा गुंठेचा एनए प्लॉट ४ खोल्यासह बोअर, लाईट, सर्व सोईनीयुक्त. मो. ९४२२०३२०९९.

**बापू कोळी ५८ इंची** १ लुम चालू स्थितीत विकणे आहे. मो. ९४४५५७३००१.

**१०० बाय १००** लांबी रूंदीचा डांबरी रोड टच, प्लॉट अर्जंट विकणे आहे.९५११९८६५९३

**१० गुंठे शेती** पाईपलाईनसह विकणे आहे. लाटवाडी-पाच मैल. डांबरी रोड टच,९९२२२३६९२०

**गाळा विकणे आहे.** महालक्ष्मी नगर, सी-विंग सांगली रोड, इचलकरंजी. फोन-९८२३९८१४४८

**कबनूर येथे** दिड गुंठा १६ मागाची रिकामी आरसीसी शेड ५८ बाय २६ एनए प्लॉट व १ बीएचके राहणेस विकणे आहे. ८७८८०३३७९२

**जुने व नवीन** पॉवरलूम देवू व घेवू तसेच फवारा, कांडी मशिन, डक्टींग घेवू व देऊ. मो. ८३७९२७९००८.

**फार्म हाऊस विकणे आहे.** जागा साडे दहा गुंठा, पूर्ण डेव्हलप-२ बीएचके स्विमिंग पुल, लॉन, गार्डन. पत्ता- राजमाने हायस्कूलमागे, रूई. फोन-९८६०४०५७०४

**७४ गुंठे जमीन विकणे आहे.** बस स्टॅन्डजवळ, चिकोडी रोडलगत, बोरगाव कर्नाटक. संपर्क- ७०२०६०६३९९

**रोज कपडे वाळत** घालण्याचे हॅगिंग स्टॅन्ड, डासांची जाळी, किचन ट्रॉली, कबुतर जाळी, राहुल एंटरप्राईजेस-७५०७७१६६६४, ७७५९९३४१६५

**१ बीएचके** आरसीसी घर विकणे आहे, कबनूर, जागा ८९० स्क्वे.फूट, बांधकाम ८०० स्क्वे. मो. ९८६०४९११८०. वेळ १० ते १, दु. ४ ते ७.

**शिरदवाड पेट्रोल** पंप्च्या मागे ३४..२५ बाय ४० (चौरस फुट १३७०) चा बिगरशेती (उत्तरेस ३० फुट रस्ता असलेला) टीपी मंजूर ले आऊट मधील प्लॉट नं. १३ विकणे आहे. मो. ९४२३९८४६९३.

**विकणे आहे** Pc Open End खरड विकणे आहे. संपर्क - ९७६६५५९२३४.

**डेक्कन मिल** उत्तर बाजूस वा. नं. २२/आंबेडकर नगर गल्ली - ११ मधील १२००/-चौ.फूटाचा प्लॉट देणे आहे. मो. ९८८१९८२८१०, शहापूरकर.

**कर्नाटक हद्दीमध्ये** ६ एकर शेती विकणे. शेतीला तीन बाजूने मोठा रस्ता, बोअर+नदी स्कीम पाणी, प्लॉट, फ्लॅट मोकळी २३०० स्क्वे.फूट गोडावून भाड्याने मिळेल. विकत भाड्याने इ. कामे. ७०२८४१००२७.

## * आरोग्य विषयक *

**मानसिक आजार**- व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचळेपणा. इ. मानसिक आजारासाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता,विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क-८०८३६०८०८३, ९९२२६९६५६६

## छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहिरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

## * नोकरी विषयक *

**सेवा भारती** संचलित सेवा भारती औषधालय युनिट नंबर २ या मेडिकल करिता डी.फार्मा, बी. फार्मा या जागा भरावयाच्या आहेत. वेळ सकाळी ९ ते रात्री ९ असेल. तरी इच्छुकांनी आपले अर्ज ४/ १८५, नाटयगृह चौक येथे दि. २० जुलैपर्यंत जमा करावेत.

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. दु. ३ ते रात्री ११. कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. पार्ट टाईम सुपरवायझर पाहिजे. सेवानिवृत्त चालेल.मो.९९२१०२३०६८.

**१० वी/१२ वी,** आयटीआय/ डिप्लोमा/पदवीधर झालेल्या मुलांना सुवर्णसंधी. सीएनसी/ व्हीएमसी चे प्रशिक्षणासहीत १३००० ते २०००० पर्यंत सॅलरी मिळवा. सोबत पीएफ/ईएसआयसी. इचलकरंजी. मो. ८९५६९६९६९६, ९७७५९६७७६७.

**नेमणे आहे** एनएम/जीएनएम रिसेप्शनिष्ट पाहिजेत. फुलटाईम-१, अर्जासहीत समक्ष भेटा. श्री स्क्रिन केअर क्लिनिक. ९०२२००२१८१, ०२३०-२४२०३०५.

**पाहिजे हार्डवेअर** दुकानात कामासाठी बिलींगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर. जेन्टस् पाहिजे. उमिया हार्डवेअर मार्ट, वखार भाग, इचलकरंजी. मो. ९९६०९१५९१९.

**घरी येऊन** शिकविणारे शिक्षक पाहिजे. इयत्ता ६ वी (सीबीएई अभ्यासक्रम) शिकणाऱ्या विद्यार्थ्यासाठी अनुभवी आणि समर्पित घरगुती शिक्षक पाहिजे आहे. मो. ९६०४०३८८९८.

**ऑफिस कामासाठी** मुलगी किंवा महिला पाहिजे. इंग्रजी संभाषण कौशल्य आवश्यक. तसेच ११ वी, १२ वी करीता इंग्रजी व इतर विषयाकरीता शिक्षक आवश्यक. संपर्क- चंद्रशिला, इचलकरंजी. मो. ८६०५०७६५५५.

**ऑफिसमध्ये कामासाठी** अकौंटंट पाहिजे. (जेन्टस् किंवा लेडीज), इचलकरंजी. मो. ७३८५२४८२९०.

**मिल स्टोअर्स** दुकानात अनुभवी शिकाऊ कामगार पाहिजे. नारायण पेठ, इचलकरंजी. मो. ९७६२२६८९९३, ९४२२०४३७४३.

**टेक्स्टाईल युनिटमध्ये** सुपरवायझर या पदासाठी उमेदवार पाहिजेत. पगार- १५००० ते २५००० रूपये. पुढील नंबरवर फोन करून त्वरीत भेटावे. मो. ९८०१२९०४२. पत्ता- १) प्राईड इंडिया टेक्स. पार्क, तारदाळ २) रूई फाट्याजवळ, रूई.

**सिक्युरिटी गार्ड** पाहिजेत. आकर्षक पगारासह डे/नाईट फिक्स ड्युटी, कोरोची, शाहू पुतळा, शहापूर-इचलकरंजी परिसर. मो. ९६८९५६४००४, ९३२६६३३४४५.

**दातांच्या दवाखान्यात** कामासाठी मुले/मुली पाहिजेत. श्री दत्तकृपा दातांचा दवाखाना, जय सांगली नाका, शरद कॉलेज जवळ, जवळील व्यक्तींना प्राधान्य. ०२३०-२४२६६६६, ८९४९२३८९५७.

**रिटेल मेडिकल** दुकानासाठी फार्मासिस्ट मुलगा/मुलगी पाहिजे. संपर्क- ८४९५८८७९४९.

**पतसंस्थेमध्ये विवाहित** महिलांची अकौंटंट म्हणून नेमणूक करणेचे आहे. टॅली व कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. मो. ७४४७४४५३८१, ७४४७४४५५६१.

**ऑफिस कामासाठी** अर्जंट लेडीज भरती करून घेणेचे आहे. शिक्षण १२ वीच्या पुढे चालेल. वेळ ११ ते ५, जांभळी. संपर्क- ९२७०५८१४५२.

**एका नामांकित** शिक्षण संस्थेमध्ये इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी, ८ वी या वर्गासाठी भुगोल, इंग्रजी शिकविण्यासाठी शिक्षक हवे आहेत. पात्रता- एमए बीएड, बीए बीएड. संपर्क - ९९६०८७५०८, ९५२७५३५३६३.

**ऑफिस कामासाठी** १२ वी शिकलेली व कॉम्प्युटरची माहिती असलेली लेडीज पाहिजे. संपर्क- वर्धमान हौसिंग सोसायटी, महावीर जैन मंदिरसमोर, रॉक्का सदन, इचल. भेटण्याची वेळ- दुपारी ३ ते सायं. ७.

**छोटा हत्ती** (टाटा एस) गाडी चालविणेकरीता ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- तुषार इलेक्ट्रीकल्स, मो. ९५७९५५५८०९, ७०२०९५१४५५.

**केतन वाईन्स** हुपरी येथे खालील पदासाठी भरती सुरू आहे. कौंटर बॉईज ३ पदे, गोडाऊन बॉईज ३ पदे. संपर्क- ९८२२२४३२५६. संपर्क करण्याची वेळ- सकाळी ११ ते सायंकाळी ७.

**पाहिजेत मेडिकल** (औषध दुकान) मध्ये काम करणेसाठी शिकाऊ व अनुभवी फार्मासिस्टची नेमणूक करणेची आहे. मो. ९३५६९८८५१०, ९८५८७११११७.

**मेकॅनिक पाहिजेत** टु व्हिलर गाड्यांच्या शोरूमकरीता मेकॅनिक पाहिजेत. अनुभवी किंवा शिकाऊ चालेल. संपर्क- बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**कामगार पाहिजेत** टु व्हिलर गाड्यांच्या शोरूमकरीता वॉशिंगसाठी कामगार पाहिजेत. संपर्क- बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**अर्जंट पाहिजेत** अनुभवी २ व्हिलर मेकॅनिक फुल/पार्ट टाईम, पगार फिक्स १२ हजार+इतर भत्ते. संपर्क- दिपक ई बाईक, इचलकरंजी. ९५४४६९६१९६.

**मार्केटिंग एक्झीकेटीव्ह** नेमणे, स्वतःची २ व्हिलर असणे आवश्यक. मो. ९९२३७०८१२३.

**गारमेंटमध्ये लेडीज** व जेन्टस् हेल्पर पाहिजेत. संपर्क- ९९२३७०८१२३.

**इलेक्ट्रॉनिक्स दुकानात** कामाकरिता सेल्समन/कामगार पाहिजेत. अनुभवी/शिकाऊ, मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स, सम्राट अशोकनगर, आवळे मैदानशेजारी, इचलकरंजी. मो. ९८९०५४७०७८.

**राधाकृष्ण चित्रमंदिर,** इचलकरंजी येथे तातडीने कर्मचारी हवे आहेत. कॅन्के व किचन विभागासाठी कर्मचारी व सुपरवायझर पदासाठीही कर्मचारी आवश्यक. इच्छुक उमेदवारांनी आपल्या बायोडाटासह संपर्क करावा. संपर्क- ७४४७४४००७० (भेटण्याची वेळ ३ ते ५)

**Urgently Hiring**-MBA. Experienced Candidates HR,Sales, Telecalling Software Company- Jawaharnager, Ichalkaranji 9579801138.

**जेन्टस् कामगार** पाहिजेत- ऑफिस व इतर कामासाठी. संपर्क- ९६३१२१६०३०.

**टेलीकॉलर पाहिजे** किमान बारावी पास, कॉम्प्युटर ज्ञान असलेली फ्रेशर अथवा अनुभवी लेडीज/ जेन्टस्, टेली कॉलर पाहिजे. (शिवणक्लास झालेल्यांना प्राधान्य) मो. ९४०५०४१४१५.

**पाहिजे लेडीज** ऑफिस स्टाफ. एक्सल, टॅली व अकौंटस् ज्ञान असणारी व व्हीएमसी ऑपरेटर अनुभवी. संपर्क- प्रिनवेल इको प्रोडक्ट्स प्रा.लि. प्रेम सागर, कापड मार्केट, इचलकरंजी. मो. ९३७०४१०४४९.

**पाहिजेत.** एका नामांकित शैक्षणिक संस्थेच्या अधिपत्याखाली असलेल्या हॉस्टेलवर (स्त्री/पुरुष) नेमणे आहेत. अनुभवी व गरजू उमेदवारांनी त्वरीत संपर्क साधावा. संपर्क क्रमांक-८८३०८२०२१२

**सेवासदन निरायम प्रा. लि.** इचलकरंजी येथे खालील पदांसाठी पात्र व अनुभवी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. रिक्त पदे- १) फार्मासिस्ट (महिला)- ०१, २) एक्झीक्युटिव्ह-ब्रॅंडिंग व जाहिरात (महिला) -०१, ३) मार्केटिंग ऑफिसर-०२ (तात्काळ रूजू होणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य) ४) Manager on Duty (पुरुष-रात्रीसाठी)-१ (कोणत्याही शाखेतील पदवीधर), ५) Optometrist-01. पत्ता- ६९/ १, रिंग रोड, तांबे माळ, इचलकरंजी. संपर्क- ८९७९९६६०५५

**ड्रायव्हर पाहिजे.** फोर व्हीलर कार, ॲटो गाडी चालवणेस निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. पगार २६ दिवसाला १६०००/- संपर्क- ७५१०४००६८९, ९८८१९८७४८८, इचलकरंजी.

**चप्पल दुकानात** शिकाऊ किंवा अनुभवी कामगार पाहिजे. न्यू बालाजी शु वर्ल्ड. गांधी पुतळा, इचलकरंजी. संपर्क- ९०७५७४२९१७, ७८८६४०५६०

**Wanted Teachers**- Gudakesh English Academy. Shahapur Std, 1st to 4 th Class teachers Std 5th to 10th Hindi teacher. Eligibility. Graduation with D.ed or B.ed. Contact-7020441745

**अर्जंट सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** पार्वती इंडस्ट्रिज यड्राव व कोल्हापूर रोड, रूई फाट्याजवळ, ड्युटी १२ तास, आकर्षक पगार, वयोमर्यादा २५ ते ५०, संपर्क-९८५०९७४५८५

**रंगाच्या दुकानात** कामासाठी कामगार पाहिजे. संपर्क- नवभारत पेंटस, बंगला रोड, इचलकरंजी. फोन-९८२३९८१४४८

### ड्रायव्हर पाहिजेत

**स्कुल बस चालविणेकरीता बॅच-बिल्ला व लायसन्स असणारे अनुभवी ड्रायव्हर पाहिजेत**

------: संपर्क :------

**श्री बालाजी इंग्लिश मेडियम स्कूल, इचलकरंजी**

**मोबा. 9075999171**

**कामगार पाहिजे.** हार बुकेच्या दुकानात कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- ८८८८२३७७३५, ९१२०९१७१७७, इचलकरंजी.

**अर्जंट सिक्युरीटी भरती**- ८ तास ड्युटी सर्व सुविधा उपलब्ध. सांगली रोड, कोष्टि करीता. संपर्क- ९६०४६३९१०३

**ऑफिस कामासाठी** मुलगी किंवा महिला पाहिजे. संभाषण कौशल्य आवश्यक. संपर्क-८१७७८४१४७७, ९२७०२०५६१०, वर्धमान चौक, इचलकरंजी.

**सीएनसी ऑपरेटर पाहिजेत.** शिकाऊ/अनुभवी पार्टटाईम जेंटस/लेडीज, मणेरे हायस्कूलजवळ, इचलकरंजी. मो. ९५२७४९१७००, ९७६६२९३३६२

**साध्या सायझिंगमध्ये** वार्पर पाहिजेत. संपर्क- ९०११७३५३८४, इचलकरंजी.

**होलसेल किराणा दुकानात** कामगार पाहिजे. संपर्क- संस्कार ट्रेडर्स. ९८६०८०७५५८, ९७५७२३६५११

**आणाजा फॅशन शॉपमध्ये** बिलींगसाठी पाहिजेत. (जेंटस/ लेडीज) बेसिक कॉम्प्युटर आवश्यक. (पगार- ८ ते १० हजार) संपर्क-९५६१७१४२६२

**इचलकरंजी येथे** बियर बार मध्ये कामासाठी वेटर+हेल्पर पाहिजे. राहण्याची सोय आहे. संपर्क- ८८३०९८३४०१

**इचलकरंजी जनता बँकेजवळ** ऑफिस कामासाठी १००/- जागा अर्जंट भरती, वय, शिक्षणाची अट नाही. मुली/महिलांना सुवर्णसंधी. संपर्क-७२११६०४४५४, ९९२१७३५१०४

**कामगार पाहिजे.** इस्त्री आणि ड्रायक्लिनिंगसाठी अत्याधुनिक स्टीम प्रेस आणि सर्व प्रकारच्या कापडांचे ड्रायक्लिनिंग करण्याची क्षमता. संपर्क-९३५८३०५९२

**कॉम्प्युटर हार्डवेअर** इंजिनिअर पाहिजेत. आकर्षक पगार+भत्ता. पत्ता- श्री कॉम एंटरप्राईजेस, धान्य ओळ, फेडरल बँकेजवळ, इचलकरंजी. फोन- ८३७८९८११०४, ९३२५८११९०४

**अर्जंट पाहिजेत.** होलसेल किराणा दुकानात कॉम्प्युटरवर बिलींगसाठी २ जेंटस पाहिजेत. विवाहीत प्राधान्य. आकर्षक पगार. ९७६७०३०९०६

**पाहिजेत.** पावडर कोटींगसाठी हेल्पर लेडीज/जेंटस, सोओर वेल्डर, ऑरगन वेल्डर. संपर्क- विशाल इंडस्ट्रिज, खोतवाडी. ९१४६७६९६५६

**डेंटल हॉस्पिटलमधील** लॅब कामासाठी अनुभवी/हुशार मुलगा/ मुलगी पाहिजे. तसेच हॉस्पिटलच्या कामासाठी मुलगा पाहिजे. टू व्हीलर लायसन आवश्यक. संपर्क-निर्वी डेंटल केअर, इचलकरंजी. फोन- ७३५७४३७५११

**ऑफिस कामासाठी** ऑफिसबॉय, टेलीकॉलर व अनुभवी इलेक्ट्रीशियन पाहिजे. संपर्क-मिशु प्लास्टोव्हिजन एलएलपी, जांभळी. ७८८८००४०६६

**अनुभवी किंवा शिकाऊ** व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत. लिंबू चौक, संतमळा, इचलकरंजी. संपर्क- ८२०८९६७९०८

**पेटीएम मध्ये** वडगाव व हातकणंगले तालुकाकरिता फिल्ड सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. पगार- १८,५००+इन्सेंटिव्ह. संपर्क- ऑकारसर- ७५०७७०६९३०, स्वप्निल-८७९२२२३०२३

**सीएनसी/व्हीएमसी,** एचएमसी मशिनवर सेटर पाहिजेत. ४ जागा व प्रोग्रॅमर-१ जागा. स्वस्तिक इंजिनिअर्स (न्यु मॅनेजमेंट) संपर्क- ८३२९४९४९१३

**URGENT REQUIREMENT** CNC,VMC,HMC,VTL OPERATOR. Line Inspector-M/C Shop, Final Inspector M/C Shop, CMM Operator, Data Entry Operator, Pattern Maker, Electrician&Fitter Maintenance (Foundry) Riddhi Casting Pvt.Ltd., K.A.P.T. Tardal-Hatkanangale, mo. 7743830120/7066970074.

**फूल टाईम कामासाठी** हुशार व अनुभवी वेटर पाहिजेत. पगार १२ हजार (राहण्याची व जेवणाची सोय) हॉटेल प्रतिनिधी, इचलकरंजी. ९३७५९८७७७७

**लोटस पार्कमधील** नवीन सायझिंग युनिटकरीता दिवाणजी पाहिजे. संपर्क- ओंकार ७७५९८०७८४५.

**फॅब्रिकेशन व हॉस्पिटल** फर्निचर तयार करणेसाठी हेल्पर, Co2 वेल्डर, ऑरगन वेल्डर भरती सुरू आहे. संपर्क-९०२१२०२७३१

**कोरोचीमधील** नामांकित अकॅडमीमध्ये १ ली ते ४ थी आणि ५ वी ते ८ वी वर्गासाठी शिक्षक भरणेचे आहे. ७०२०४६९०२५

**शिक्षिका पाहिजे** प्री प्राइमरी अनुभवी शिक्षिका पाहिजे. पत्ता- आभार फाटा, चंदूर. संपर्क- ९६२३९९८८३८.

**पाहिजेत** - पद ज्युनिअर अकौंटंट, अनुभव- २+ वर्षे (टॅली), शैक्षणिक पात्रता- बी.कॉम./एम.कॉम. लेडीज/ जेन्टस्, पगार- १५००० ते २०,००० जीएसटी, इन्कमटॅक्स, ऑडिट, बुक किपिंग, कामाचे ठिकाण,इचलकरंजी. मो. ७०९०९६९८०२.

**चार चाकी** गाडी शिकविण्यासाठी ड्रायव्हर (प्रशिक्षक) पाहिजे. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इन शेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**१२ वी टायपिंग** ३० व संगणक ज्ञान असणारी ऑफिस कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क- श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इन शेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**पीयुसी करिता** फुल टाईम संगणक ज्ञान असणारा कामगार (मुलगा) पाहिजे. संपर्क- श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इन शेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**ऑफिससाठी मॅनेजर** पाहिजे. अनुभव व चार चाकी गाडी येणे आवश्यक. श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इन शेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**सिक्युरिटी गार्ड** १५०००+पगार, ८ तास ड्युटी. कामाल एमआयडीसी व अंबपवाडी फाटा. ७४४७४०१८६७, ७४४७४०१८६२.

**लेडीज कामगार** पाहिजे. घराच्या साफसफाईसाठी व इतर कामासाठी सकाळी ९ ते सायं. ६ पर्यंत. संपर्क- ८७७०२३१६२५.

**इचलकरंजी येथे** कंपनीमध्ये/ प्रोसेसमध्ये साफसफाईसाठी पुरुष कामगार पाहिजेत. आकर्षक पगार. मो. ८७९६५०९६३१, ८८५७९४०१९५.

**कायझन व्हिल्स** या नामांकित शोरूममध्ये स्पेअर पार्ट एक्झीक्युटीव्ह व सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. अनुभवींना प्राधान्य. ईएसआय/पीएफ सोय. मो. ९८८१५५१९९६.

**इचलकरंजीत फॉर्च्युन** फ्लाझाजवळ लहान मुलगी सांभाळण्यासाठी महिला पाहिजे. पगार २५०० रूपये महिना. कामाची वेळ सकाळी ७.३० ते सकाळी १० वाजेपर्यंत. मो. ७३५०७५८७८७.

**अनुभवी व निर्व्यसनी** ड्रायव्हर पाहिजे. मो. ७७२००१८४०६.

**ऑफिस कामासाठी** कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. मो. ७७०९०२१५४७.

**यशराज ऑटो** केअर. ऑफिस बॉय पाहिजे. महालक्ष्मी नगर, गल्ली नं. ५, गैबान पेट्रोल पंप जवळ, शहापूर रोड, मो. ९८२०९०६४२८.

**कपड्याच्या शोरूममध्ये** अनुभवी कामगार पाहिजे. पुरूष किंवा लेडीज. आकर्षक पगार व सोयी. पत्ता- गांधी पुतळ्याजवळ, इचलकरंजी. मो. ८६६०९४५३५५.

**खाद्यतेल दुकानात** पार्ट टाईम कामासाठी ड्रायव्हर कम कामगार पाहिजे. वेळ ४ ते ८. मो. ७३८५९०००९

## * भाड्याने देणे/घेणे *

**सर्वसोईनीयुक्त सिंगल** रूम भाड्याने देणे. सर्व्हिसवाल्यांना प्राधान्य. फॉर्च्युन प्लाझासमोर, बालाजी कॉलनी, गल्ली नं. २, इचलकरंजी. मो. ९६०४४७३६२३.

**सर्व सोईनीयुक्त** प्रशस्त बंगला भाड्याने देणे. ३ मास्टर बेडरूम, २ कारसाठी पार्किंग, २४ तास पाणी, स्टारनगर, यड्राव फाटा, शहापूर. मो. ९८२४९८७५७६, ८०५५१६१४४५.

**पहिल्या मजल्यावर** ६०० स्क्वे.फूट हॉल भाड्याने देणे आहे. नारायण पेठ, इचलकरंजी. मो. ९७६२२६८९९३, ९४२२०४३७४३.

**रूम भाड्याने** देणे आहे. ऑफिस भाड्याने देणे आहे. धान्य ओळ, फेडरल बँकेसमोर, इचलकरंजी. मो. ९४२२४२४००७, ९४०४२५९७०१.

**गाळा भाड्याने** देणे. १०० स्क्वे.फूट आरसीसी गाळा, साखरपे हॉस्पिटल रोड, शाहू कॉर्नर, इचलकरंजी. मो. ९३२२९००१०४.

**सर्वसोईनीयुक्त** २ बीएचके बंगला भाड्याने देणे आहे. इंदिरा हौसिंग सोसायटी, इचलकरंजी. मो. ९८८१२२२२४३.

**५००० स्क्वे.**फूट शेड ऑफिससह भाड्याने देणे आहे. भारत गॅस गोडावून पाठीमागे, चंदूर रोड, इचलकरंजी. मो. ९३७३४७७१६४.

**डी मार्टजवळ,** संभाजी चौक येथे पहिल्या मजल्यावरील ९ बाय १७ गाळा ॲटॅच टॉयलेट बाथरूमसहीत ऑफिस, पेढी,ओपीडी साठी भाड्याने देण्याचे आहे. मो. ८८०५९०३८७८, ८८८८४४०००६.

**यशवंत कॉलनीमध्ये** २ बीएचके चौथ्या मजल्यावर सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. २४ तास पाणी. संपर्क-८६०५७०२९९३

**ग्राऊंड फ्लोअर २ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे. फक्त शाकाहारीसाठी भाडे १२ हजार, (एजंट क्षमस्व) जमदाडे मळा, नोबल हॉस्पिटलसमोर, इचलकरंजी. संपर्क-८८३०७४१०४३

**१ बीएचके व २ रूम** किचन सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. नवीन महानगरपालिके समोर, इचलकरंजी. फोन-९१७५६२८८३५

**गोडाऊन भाड्याने देणे.** ३००० स्क्वे. फूट शांतीनगर, थोरात चौक, इचलकरंजी. मो. ९९६०२५४८०१

**१ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे आहे. जनता बँकेजवळ, अडत पेठ, इचलकरंजी. फोन-९८६०८२८८२८

**गांधी कॅम्पमध्ये** २५० फुटाचा फूल्ल फर्निश गाळा भाड्याने देणे आहे. २ लाख डिपॉझिट १७ हजार भाडे. संपर्क-७२७२८०३३३३

**स्वतंत्र २ बीएचके** बंगला भाड्याने देणे आहे. यशवंत रेसिडेन्सी, नवचैतन्य अनाथालयमागे, इस्कॉन मंदिरजवळ, तोरणानगर, शहापूर. फोन-९५८४८९१६९१

**मुलांसाठी किंवा** मुलींसाठी ५० बेडचे ६००० स्क्वे. फूट जागेमध्ये पूर्ण तयार वस्तीगृह भाड्याने देणे आहे. मो. ७४९८९८४१३७.

**वा.नं. २२,** डेक्कन उत्तर बाजूस आंबेडकरनगर गल्ली ११- दोन खोल्या सर्व सोईच्या भाड्याने/ गहाणवट देणे. मो. ९८८१९८२८१०, शहापूरकर.

## * व्यवसाय विषयक *

**महिलांसाठी सुवर्णसंधी** घरबसल्या अश्वगंधा बिया पॅकींग करा. फक्त एकदाच. ६०० रूपये भांडवलात दररोज १०००/- रूपये मिळवा. जांभळी. संपर्क ९२७०५८१४५२.

## * कर्ज विषयक *

**वाहन कर्ज,** जुन्या २०१४ मॉडेल पुढील कार, टेम्पो, ट्रक, जेसीबी, क्रेन, (ट्रॅक्टर २००८ मॉडेल पुढील) कर्ज उपलब्ध. ७०३८८१५८५४

**होमलोन**-फ्लॅट, बंगला, प्लॉट, दुकानगाळा खरेदीसाठी लोन. हॉटेल, लॉज, हॉस्पिटल, शाळा, कॉलेज, इंडस्ट्रियल. प्रॉपर्टी मॉरगेज लोन. ७७९६१०९५५५

**पर्सनल लोन**- बिझनेस लोन, डॉक्टर लोन, कमीत कमी कागदपत्रे, जास्ती मुदत, जलद कर्ज मंजुरी. ९६३७१५५५९९

**जागा घेवून** बांधकाम करण्यासाठी तसेच असेसमेंट उतारा व घरफाळा पावतीवर होमलोन किंवा तारण कर्ज मिळेल. पत्ता- रजिस्टर ऑफिस समोर, गाळा नं. ८. संपर्क- ९१४५७५३८१०.

## * बोअर विषयक *

**राज बोअरवेल** आमचेकडे ४।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिकची कामे माफक दरात करून मिळेल. मो. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७.

## * विवाह विषयक *

**वर पाहिजे** गरीब घरची मुलगी १२ वी , २८, घरगुती पॅकींग १२०००/ - आई, वडील नाही. आजी, बाबाकडे रहाते. आजीची प्रकृती ठिक नाही. त्वरीत विवाह. अपेक्षा- कष्टाळू, समजूतदार मुलगा हवा, जातीची, शिक्षणाची अट नाही. मो. ७३५०५९२९२४

## विहिरीवरील मोटार चोऱ्यांचा छडा

■ **कोरेगाव.ता.१५ (वार्ताहर)**–

**कोरेगाव तालुक्यात शेतकऱ्यांच्या विहिरीवरील विद्युत मोटारी चोरी करणाऱ्या टोळीचा कोरेगाव पोलिसांनी पर्दाफाश करत तिघांना अटक केली आहे.**

गुन्हे प्रकटीकरण शाखेने केलेल्या या कारवाईत चोरीस गेलेल्या मोटारींसह गुन्ह्यात वापरलेले वाहन असा एकूण १ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. .गेल्या काही दिवसांपासून कोरेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत विहिरीवरील विद्युत मोटारी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत होता. गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली.चौकशीत त्यांनी मोटार चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. ३ मोटार हस्तगत केली. याशिवाय चोरीसाठी वापरण्यात आलेले वाहनही जप्त करण्यात आले. दोन्ही गुन्ह्यांतील चोरीस गेलेला १०० टक्के मुद्देमाल पोलिसांनी परत मिळविण्यात यश मिळविले आहे.

## आषाढी साठी जि.प. कडून टँकर रवाना

■ **कोल्हापूर,ता.१५ (प्रतिनिधी)**–

**आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने कोल्हापूर जिल्हा परिषदेने वारी आनंदाची हमी शुद्ध पाणी पुरवठ्याची हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत १० हजार लिटर क्षमतेचा पिण्याच्या पाण्याचा टँकर बुधवारी पंढरपूरकडे रवाना करण्यात आला.**

जिल्हा परिषद मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात जिल्हा परिषद अध्यक्षा शिल्पा शशिकांत खोत आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन यांच्या हस्ते टँकरचे पूजन करण्यात आले. यावेळी बांधकाम समिती सभापती सारिका नादेकर, शिक्षण समिती सभापती शितल यादव, जि. प. सदस्य अभिजीत तायशेटे, अर्जुन गोळे, डॉ. अनिरुद्ध पिंपळे, संतोष ओतारी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षा शिल्पा खोत यांनी, वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही जिल्हा परिषदेची सामाजिक जबाबदारी असून त्याच भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे सांगितले.

## कोगनोळीतील दिंडीचे पंढरीकडे प्रस्थान

■ **कोगनोळी,ता.१५ (प्रतिनिधी)**–

**श्री क्षेत्र कोगनोळी ते श्री क्षेत्र पंढरपूर आषाढी पायीवारी दिंडी सोहळ्याचे दुसरे वर्ष असून वै.श्रीगुरु सोपानकाका महाराज देहूकर सांप्रदायिक दिंडीचे बुधवार दि. १५ रोजी सकाळी १० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत श्री सद्गुरु पूर्णानंद महाराज मठापासून पंढरी क्षेत्राकडे प्रस्थान झाले.**

माजी ऊर्जामंत्री वीरकुमार पाटील यांच्या हस्ते पालखी पूजन व श्रीफळ वाढवून या दिंडीचा शुभारंभ करण्यात आला. वै.श्रीगुरु पांडुरंग काजवे महाराज, वै.श्रीगुरु शंकर डांगरे महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व श्रीगुरु पूर्णानंद काजवे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिंडी सोहळा होत आहे. बुधवार दि. १५ रोजी



रेंदाळ, गुरुवार दि. १६ रोजी नृसिंहवाडी, शुक्रवार दि. १७ रोजी मालगाव, शनिवार दि. १८ रोजी बोरगाव, रविवार दि. १९ रोजी विठ्ठलवाडी, सोमवार दि. २० रोजी उदनवाडी, मंगळवार दि. २१ रोजी बेळेवाडी तर बुधवार दि. २२ रोजी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. गुरुवार दि. २३ रोजी सकाळी दिंडी, चंद्रभागा स्नान, प्रदक्षिणा व देहूकर वाड्यामध्ये आरती करून मुक्कामाच्या ठिकाणी येणार आहे. शुक्रवार दि. २४ आणि शनिवार दि. २५ रोजी पंढरपूर येथे मुक्काम असून रविवार दि. २६ रोजी सकाळी किर्तन झाल्यावर महाप्रसाद घेऊन दिंडी कोगनोळी गावाकडे परतणार आहे.

## निपाणीतील नूतन काँग्रेस कार्यालय सर्वसामान्य जनतेसाठी-खास. जारकीहोळी

■ **निपाणी,ता.१५(प्रतिनिधी)**–

**काँग्रेस सरकारने राज्यात जनहिताच्या पंचहमी योजनांसह अनेक योजना यशस्वीपणे राबविल्या आहेत. सर्वस्तरातील जनतेपर्यंत पोहचून त्यांना शासकीय लाभ मिळवून देण्याचे काम केले आहे.**

काँग्रेस कार्यकर्त्यांच्या आणि सर्वसामान्य जनतेच्या सोयीसाठी नूतन काँग्रेस कार्यालयाची सुरवात केली असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन खास. प्रियांका जारकीहोळी यांनी केले.त्या निपाणी बीएसएनएल कार्यालया समोरील नूतन काँग्रेस कार्यालयाच्या शुभारंभाप्रसंगी बोलत होत्या.यावेळी खास. जारकीहोळी यांच्या हस्ते फित कापून कार्यालयाचे उद्घाटन



**निपाणी; काँग्रेस कार्यालय उद्घाटनप्रसंगी खासदार प्रियांका जारकीहोळी, लक्ष्मणराव चिंगळे,रोहन साळवे, सुप्रिया पाटील, निकु पाटील,राजेंद्र वड्डर यांच्यासह इतर.**

करण्यात आले.यावेळी बुडा अध्यक्ष, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे म्हणाले,आता काँग्रेस कार्यालय निश्चित ठिकाणी झाले असल्याने संपर्क साधणे सहज शक्य होणार आहे.पक्षाच्या योजनांचा लाभ घ्यावा असे सांगितले. स्वागत जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष रोहन साळवे, राजेश कदम यांनी केले. यावेळी आण्णासाहेब हावले, पंकज पाटील, सुजय पाटील, सुप्रिया पाटील, नगर नियोजन समिती अध्यक्ष निकु पाटील, राजेंद्र पवार-वड्डर, राजेंद्र चव्हाण, विजय शेटके,अरुण आवळेकर, रविंद्र श्रीखंडे, ॲड. चव्हाण, अस्लम शिकलगार, प्रतिक शहा, संजय कांबळे, वर्षा चव्हाण यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# केशवराव भोसले नाट्यगृहाची भरत जाधव यांच्याकडून पाहणी

■ कोल्हापूर,ता.१५(प्रतिनिधी)–



**केशवराव भोसले नाट्यगृहाच्या सुरू असलेल्या पुनर्बांधणीच्या कामाची ज्येष्ठ अभिनेते भरत जाधव यांनी बुधवारी सकाळी प्रत्यक्ष पाहणी केली.नाट्यगृहातील सुरू असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधान व्यक्त करत आधुनिक सुविधा,सुरक्षितता आणि प्रेक्षकांच्या सोयींना प्राधान्य देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.**

पाहणीदरम्यान भरत जाधव यांनी नाट्यगृहातील स्टेजची रचना, अत्याधुनिक ध्वनी व्यवस्था, प्रकाश योजना, आसन व्यवस्था तसेच इतर तांत्रिक सुविधांची माहिती घेतली. भविष्यात कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच प्रेक्षकांच्या प्रवेश आणि निर्गमनासाठी स्वतंत्र व सुरक्षित मार्गाची व्यवस्था असावी, असे त्यांनी सांगितले. नाट्यगृहाचे काम युद्धपातळीवर सुरू असून दर्जेदार पद्धतीने त्याची अंमलबजावणी होत असल्याचे पाहून समाधान वाटत असल्याची भावना भरत जाधव यांनी व्यक्त केली.

त्यानंतर त्यांनी कोल्हापूर महानगरपालिकेत आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी आयुक्तांनी पुस्तक भेट देऊन त्यांचे स्वागत केले. या भेटीत केशवराव भोसले नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीच्या कामाच्या प्रगतीबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, शहर अभियंता रमेश मस्कर, सहाय्यक आयुक्त संजय सरनाईक, सहाय्यक अभियंता सुरेश पाटील, कनिष्ठ अभियंता अनुराधा पांढरे, व्यवस्थापक समीर महाब्री तसेच स्ट्रकवेल कंपनीचे सल्लागार राजेश यादव उपस्थित होते.

# निपाणीत एक कोटी निधीतून रस्ता कामाचा प्रारंभ

■ निपाणी,ता.१५(प्रतिनिधी)–

**येथील जत्राटवेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते सोमनाथ मंदिरासह लखनापूर रोडपर्यंत रस्ता कामासाठी खासदार निधीतून १ कोटीचा निधी मंजूर झाला आहे.या कामाचा शुभारंभ खासदार प्रियांका जारकीहोळी यांच्या हस्ते करण्यात आला. लोकेश घस्ते यांनी स्वागत केले.**



**रस्ता कामाच्या शुभारंभप्रसंगी खासदार प्रियांका जारकीहोळी, शेजारी लक्ष्मणराव चिंगळे, सुप्रिया पाटील, निकु पाटील यांच्यासह इतर.**

यावेळी बोलताना खासदार जारकीहोळी म्हणाल्या, राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री सतीश जारकीहोळी यांच्या मार्गदर्शनाखाली निपाणी मतदारसंघात खासदार निधीतून अनेक कामे सुरू आहेत.सदरचे रस्ता काम दर्जेदार पद्धतीने केले जाणार असून या भागातील नागरिकांची चांगली सोय होणार आहे.येत्या काळातही मतदारसंघात विविध विकासकामे राबविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढविल्यांनंतर खासदारांनी टीकाव मारून रस्ता कामाचा शुभारंभ केला.यावेळी बुडा अध्यक्ष लक्ष्मणराव चिगळे, कर्नाटक महिला काँग्रेस सेक्रेटरी सुप्रिया पाटील, माजी जिल्हा पंचायत सदस्य राजेंद्र वडर, युवा नेते पंकज पाटील,सुजय पाटील, टाऊन प्लॅनिंग अध्यक्ष निकू पाटील, वर्षा चव्हाण, रवींद्र श्रीखंडे, दिलीप पठाडे, अनिता पठाडे, जीवन घस्ते, युवराज पोळ,आयुक्त गणपती पाटील यांच्यासह दलित समाज बांधव उपस्थित होते.

दरम्यान रस्ताकामाच्या उदघाटन कार्यक्रमांनतर खास.जारकीहोळी यांनी शासकीय विश्रामगृह येथे विविध संघ संघटनाकडून आलेल्या निवेदनांचा स्विकार केला.निवेदन स्विकारल्यानंतर जारकीहोळी यांनी सदर निवेदनांचा पाठपुरावा करून नागरीकाना न्याय दिला जाईल असे आश्वासन दिले.यावेळी निपाणी शहरासह तालुक्यांतील विविध नेतेमंडळी उपस्थित होते.

# चिक्कोडीत आज मोफत थायरॉईड तपासणी शिबिर

■ चिक्कोडी,ता.१५(प्रतिनिधी)–

येथील केएलई आयुर्वेदिक रुग्णालय बसव सर्कल येथे गुरुवारी (ता.१६) रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मोफत थायरॉईड तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात मानेवर सूज येणे, सतत थकवा व अशक्तपणा जाणवणे, वजन वाढणे किंवा कमी होणे, केस गळणे, त्वचा कोरडी पडणे, झोपेच्या तक्रारी, विस्मरण, एकाग्रतेचा अभाव तसेच महिलांमधील मासिक पाळीतील अनियमितता आदी थायरॉईडशी संबंधित समस्यांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची आयुर्वेद तज्ज्ञांकडून मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

तसेच याशिवाय आयुर्वेद पंचकर्म उपचारांवर २० टक्के सवलत देण्यात येणार असल्याची माहिती रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. किरणकुमार मुत्नाळी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

चिकोडी परिसरातील नागरिकांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहनही करण्यात आले आहे.

# नागरिकांचा शासनावरील विश्वास सेवांच्या गुणवत्तेवर ठरतो

## राज्य आयुक्त सुधाकर तेलंग

■ कोल्हापूर,ता. १५ (प्रतिनिधी)–

**शासनाविषयी नागरिकांच्या मनात निर्माण होणारी प्रतिमा ही प्रशासनाकडून मिळणाऱ्या सेवांवर अवलंबून असते. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सर्व सेवा विहित मुदतीत नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक सजगपणे काम करावे, असे निर्देश राज्य सेवा हक्क आयोगाचे पुणे विभागाचे राज्य आयुक्त सुधाकर तेलंग यांनी दिले.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांच्या अंमलबजावणीचा जिल्हास्तरीय आढावा त्यांनी घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, आयोगाच्या उपसचिव अनुराधा खानविलकर तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तालुकास्तरावरील प्रांताधिकारी आणि तहसीलदार ऑनलाइन सहभागी झाले होते.

तेलंग यांनी जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रे नियमित सुरू राहावीत, बंद असलेल्या केंद्रांची कारणे शोधून ती तातडीने कार्यान्वित करावीत, असे निर्देश दिले. अर्ज भरताना नागरिकांना आवश्यक मदत मिळावी, तसेच अर्जावरील आक्षेप साध्या आणि समजण्यास सोप्या भाषेत नोंदवावेत, असेही त्यांनी सांगितले. प्रत्येक कार्यालयातील जास्तीत जास्त सेवा ऑनलाइन उपलब्ध करून नागरिकांना सरकारी कार्यालयात येण्याची गरज कमी करण्यावर भर देण्याची सूचनाही त्यांनी केली.

पासपोर्ट सेवा केंद्रांच्या धर्तीवर आपले सरकार सेवा केंद्रे अधिक आधुनिक आणि सुसज्ज करण्याची गरज व्यक्त करत, त्यांना कॉर्पोरेट दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे तेलंग म्हणाले. यावर जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी १५ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यात १०० आदर्श सेवा केंद्रे उभारण्याचा संकल्प असल्याची माहिती दिली.

यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून कोल्हापूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या सेवा हक्काच्या पथदर्शी प्रकल्पाचे राज्य आयुक्तांनी विशेष कौतुक केले. कोल्हापूर जिल्हा सेवा वितरणाच्या बाबतीत राज्यातील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये कायम राहावा, अशी अपेक्षा व्यक्त करत चांगल्या कामगिरीसाठी ९० टक्के सेवा वितरणाचा निकष ठेवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

### रायगड जिल्ह्यातील ५० हजार लाडक्या बहिणी अपात्र

**रायगड,ता.१५**–मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून रायगड जिल्ह्यातील सुमारे ५० हजार महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत. ई-केवायसी अपूर्ण राहणे, वयोमर्यादेच्या निकषात न बसणे तसेच अन्य शासकीय योजनांचा लाभ घेत असल्याने या महिलांना अपात्र ठरविण्यात आले आहे.

# कोल्हापूरात अतिक्रमणावर मनपाची धडक कारवाई

■ कोल्हापूर,ता.१५ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने शहरातील माळकर तिकटी, मटण मार्केट, गंजी गल्ली ते बिंदू चौक परिसरात धडक कारवाई करत दोन विनापरवाना लॉजिंग सील केली.**



या कारवाईत बिंदू चौक येथील प्राईम रेसीडन्सी व हिंद लॉजिंग यांचे व्यवसाय परवाने सील करण्यात आले. तसेच परिसरातील अनधिकृत होर्डिंग्ज सायंकाळपर्यंत हटविण्याच्या सूचना संबंधित इमारत मालकांना देण्यात आल्या आहेत. कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेले साहित्य कायमस्वरूपी जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई आयुक्त डॉ.राजेंद्र भारुड यांच्या आदेशानुसार करण्यात आली. उपआयुक्त किरणकुमार धनवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत सहाय्यक आयुक्त स्वाती दुधाणे, उपशहर अभियंता सुरेश पाटील तसेच विभागीय कार्यालयाकडील, इस्टेट, अग्निशमन व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, तसेच लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्याचे ३० पोलिस कर्मचारी सहभागी झाले.

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून शहरातील अनधिकृत फेरीवाले, विनापरवाना व्यवसाय, रस्त्यांवरील अनधिकृत शेड्स व इतर अतिक्रमणा विरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. संबंधितांनी स्वतःहून अतिक्रमण हटवावे, अन्यथा जप्त करण्यात आलेले साहित्य कोणत्याही परिस्थितीत परत दिले जाणार नसल्याचा इशाराही महापालिकेने दिला आहे.

# माणकापूरात १० वी १२ वी विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन

■ माणकापूर,ता.१५ (वार्ताहर)–

**माणकापूर (ता.निपाणी) येथील निसर्गराजा ग्रुपच्यावतीने दरवर्षी प्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी पास झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ रविवार दि. १९ जुलै २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता श्री मलकारसिध्द मंदिर येथे (हुडा चौक, महादेव मंदिर जवळ) आयोजित करण्यात आला आहे.**

यावेळी साहित्यिक, पत्रकार, कलाकार अशा विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तरी गावातील महाराष्ट्र व कर्नाटक मधून १० वी, १२ वी पास झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी निसर्गराजाग्रुपचे अध्यक्ष- शिवाजी येडवान-पत्रकार किंवा मलकारी शंकर पुजारी यांचेकडे रविवार दि. १९ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत आपल्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत देवून नाव नोंदणी करून आपल्या पालकांसोबत मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६७९ पैकी प्लॉट नं. ४७/२ चे क्षेत्र–१७७.६९ चौ. मी. खुली मिळकत संपुर्ण. यासी चतुःसिमा पुर्वेस–२० फुट रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. ४६ ची मिळकत, दक्षिणेस–प्लॉट नं. ४७–१ तलरेजा यांची मिळकत, उत्तरेस – मंत्री व सोमाणी यांची मिळकत. येणे प्रमाणे चतुःसिमेतील मिळकत हि दशरथ विलास खुणे रा. तारदाळ यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणून दिली नोटीस.
सही ता.१५/०७/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**
**पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो. ७८२०९०९७०५**

## जाहीर नोटीस

**मौजे खोतवाडी** येथील गट नंबर ९६ पैकी प्लॉट नंबर ६४ पैकी क्षेत्र **१५०० चौरस** फुट ची जागा व या वरील घर मिळकत यासी चतु:सिमा **पुर्वेस** – श्री दाडमोडे यांची मिळकत, **पश्चिमेस**–श्री पाटोळे यांची मिळकत, **दक्षिणेस**– १८ फुट रुंदीचा रस्ता, **उत्तरेस** – खोतवाडी हायस्कुलची मिळकत. सदरची मिळकत **श्री मनोज भगवान बोधले रा. सांगली** यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.म्हणून दिली नोटीस सही
ता. १३/०७/२०१६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

आमचे आशील मुख्य प्रबंधक बँक ऑफ बडोदा शा. इचलकरंजी रा. ताराचंद बोहरा मेंशन, मेन रोड, इचलकरंजी यांनी दिलेल्या माहीतीवरून व दाखवीलेल्या कागदपत्रावरून सर्वांचे खास करून बँक व वित्तीय संस्थांचे माहीतीकरीता जाहीर नोटीस देणेत येते की –

१. मिळकतीचे वर्णन– जि. कोल्हापुर ता. शिरोळ पैकी अब्दुललाट पैकी क. ग. नं. २५१७, २५१८, २५३०, २५३२, २५३३ व २५३४ पैकी क्षेत्र ७ हे. ९६.५ आर ची जागा यापैकी मे. सत्यराज इंटीग्रेटेड टेक्सटाईल पार्क प्रा. लि. मधील गट नं. २५३३ पैकी प्लॉट नं. १/ क याचे क्षेत्र २८४८. ३१ चौ. मी. व त्यावरील बांधकाम सुरू असलेली फॅक्टरी इमारत यासी चतु:सिमा – पुर्वेस गट नं. २५३६ ची मिळकत, पश्चिमेस – १८ मी. रूंदीचा रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नं. २ व ३ ची मिळकत, उत्तरेस – प्लॉट नं. १/ ब ची मिळकत .

२ . वर वर्णन केलेली क. ग. नं. २५१७, २५१८, २५३०, २५३२, २५३३ व २५३४ पैकी क्षेत्र ७ हे. ९६.५ आर ची जागा ही १. श्री. शौकत अल्लाबक्ष बागवान व २.सौ.शेहनाज, ३.श्री.अरिष व ४ . श्री. कैश शौकत बागवान यांनी रजि.करारपत्र नं. १६७७ ता.१३.३.२०१४ प्रमाणे मे.सत्यराज इंटीग्रेटेड टेक्सटाईल पार्क प्रा. लि. यांना विक्रीचा करार केलेला होता. त्यानंतर कै. श्री. शौकत अल्लाबक्ष बागवान यांचे निधनानंतर १. शौकत अल्लाबक्ष बागवान मयत वारस नात्याने अ. सौ. शेहनाज, ब.श्री.अरिष व क.श्री.कैश शौकत बागवान व ड. सौ. अंजुम जावेद तांबोळी तसेच २. सौ. शेहनाज, ३. श्री. अरिष व ४. श्री. कैश शौकत बागवान यांचेकडून नों.नं.७६०१ ता. ८.१२.२०१४ चे रजिस्टर खरेदीपत्राने मे. सत्यराज इंटीग्रेटेड टेक्सटाईल पार्क प्रा. लि. यांनी खरेदी घेतलेले असुन त्यांनी बिगरशेती करून नों.नं.२८३० ता.२.८.२०२१ चे रजिस्टर भाडेपट्टयाने वर वर्णन केलेला प्लॉट नं.१/ क याचे क्षेत्र २८४८.३१ चौ.मी.ची जागा श्रीमती भगवतीदेवी शिवप्रकाश बांगड वगैरे ६ यांना ९९ वर्षाच्या मुदतीने भाडेकराराने दिलेली आहे.

३. सदर श्रीमती भगवतीदेवी शिवप्रकाश बांगड वगैरे ६ यांनी सदर प्लॉट नं. १/क निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन त्याचे तारणावर आमचे आशील बँकेकडुन त्यांचे व्यवसायवाढीसाठी कर्ज मागणी केलेली आहे. सबब सदर मिळकतीबाबत व वर वर्णन केलेल्या व्यवहाराबाबत कुणाचाही कसलाही वाद, वारसाहक्क, वाटणी, अग्रहक्क. तारणगहाण, लिज, न्यायालयीन वाद अथवा अन्य तत्सम हक्कसंबंध असलेस अगर आमचे आशीलांचे लाभातील प्लॉट नं.१/क चे तारणगहाण व्यवहाराबाबत कुणाचीही तक्रार अगर हरकत असलेस आजपासुन १५ दिवसांचे आत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी स्वरूपात कळवावे. सदर मुदतीत कुणाचीही हरकत न आलेस सदर वर वर्णन केलेल्या व्यवहाराबाबत व नियोजीत तारण व्यवहाराबाबत कुणाचीही तक्रार नाही असे समजतील तसेच भविष्यातही आमचे आशील तसे समजुन तारणगहान व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही म्हणुन दिली नोटीस.
ता. १३.७.२०२६

**ॲड. विवेक अशोक तांबे**
**११ / २०६, स्टेशन रोड, इचलकरंजी .**
**मो.नं. ९८२२६६७९९९**

## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. आनंदा शंकर काकडे, सदाशिव शंकर काकडे व श्री. विष्णू शंकर काकडे, रा. यड्राव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी प्रत्यक्ष सांगितले माहितीवरुन दाखवले कागदपत्रावरुन व दिले अधिकारावरुन सर्व तमाम लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन –जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी तालुका शिरोळ पैकी मौजे यड्राव येथील ग्रामपंचायत यड्राव गावच्या हद्दीतील गट नं. २१ ( सर्व्हे नं. १४१ / ३) क्षेत्र हे ०.७८ आर, आकार रु.३.१९ पैसे ची शेतमिळकत यासी चतुः सिमा : – पूर्वेस – अशोक रेंदाळे यांची मिळकत, पश्चिमेस–रस्ता, दक्षिणेस श्री. राजाराम रेंदाळे यांची मिळकत, उत्तरेस–गट नं.२४ ची मिळकत

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही मुळची दत्तू काकडे यांच्या मालकी वहिवाटीची होती. दत्तू काकडे यांच्या पश्चात त्यांची मुले बापू काकडे शंकर काकडे व बाळू काकडे यांनी सोईनुसार गट नं.२१ मध्ये वहिवाटी सुरु केल्या. गट नं. २१ मध्ये अद्याप तुटक वाटप झालेले नाही. गट नं.२१ मध्ये आमच्या अशिलांची तसेच जालींदर बाळू काकडे, स्वप्नील अर्जुन काकडे यांच्या सोईनुसार वहिवाटी सुरु आहेत. सदर गटात आमचे अशिलांनी राहण्यासाठी आर.सी.सी. घर व जनावरांसाठी गोठा बांधला आहे.

३) आमचे अशिलांनी कलम १ मधील गट नं. २१ बाबत मे. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, जयसिंगपूर यांचे कोर्टात रे.क.नं. १४५/२०२४ चा श्री. जालींदर बाळू काकडे यांच्या विरुध्द कायम मनाई ताकीदीचा दावा दाखल केला असून सदरचा दावा प्रलंबीत आहे. तसेच आमच्या अशिलांनी मे. जिल्हा न्यायाधिश, जयसिंगपूर यांचे कोर्टात किरकोळ दिवाणी अपील नं. १६/२०२५ श्री. जालींदर बाळू काकडे यांचे विरुध्द दाखल केले आहे तेही प्रलंबीत आहे. अशी परिस्थिती असताना श्री. जालींदर बाळू काकडे हा गट नं. २१ मध्ये तुटक वाटप झालेले नसताना गट नं. २१ मधील काही क्षेत्र विकण्याचे प्रयत्न सुरु केला आहे. तथापि जालींदर काकडे यांचेकडून गट नं. २१ मधील मिळकत विकत घेण्याचा आमच्या अशिलांना अग्रहक्क आहे.

४) सबब सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की.

कोणीही वर कलम १ मधील मिळकतीबाबत श्री. जालींदर बाळू काकडे, रा. यड्राव यांचेशी खरेदी विक्री अगर अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नयेत. याउपरही कोणी वर कलम १ मधील मिळकती बाबत श्री. जालींदर बाळू काकडे यांचेशी व्यवहार केलेस तो आमचे अशिलांच्या हक्कावर बंधनकारक राहणार नाही.येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
ता. १५/७/२०२६

**ॲड.एम.एन.माने**
**प्लॉट नं.२०, यशवंत हौसिंग कॉलनी, जयसिंगपूर,**
**मोबा.नं. ९४२०९२९८३४**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांचे माहितीसाठी प्रसिध्द करणेत येते की,

मिळकतीचे वर्णन– मौजे तारदाळ ग्रामपंचायत हद्दीतील क. ग.नं. २९८ हे. १.६१ आर आकार रु.५=७५ पैसे यापैकी बिगरशेती प्लॉट नं. ३१ याची प्रत्यक्ष जागेवरील मोजमापे पुर्व व पश्चिम बाजू ३१ फूट ६ इंच, दक्षिण व उत्तर बाजू ५४ फूट याची एकुण चौ. फू.१८०९.०० याचे चौ. .मी. १६८.०६ ची खुली मिळकत याचे ऑनलाईन ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे.०.०१.६८ आर ची खुली मिळकत यासी चतु: सिमा– पूर्वेस –१५ फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस – सदर गट नंबर पैकी मिळकत, दक्षिणेस – प्लॉट नं. ३२ ची मिळकत, उत्तरेस – सदर गट नंबर पैकी मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील बिगरशेती खुली जागा मिळकत.

वर नमूद मिळकत ही श्री . १ ) दिपक रविंद्र रेंदाळकर २) संदिप रमेश कुरणावळ, रा.दोघेही इचलकरंजी, यांचे मालकी कब्जेवहिवाटीची असून, त्यांनी सदरची मिळकत निर्वेध,निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून, मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून साक्षीदार समक्ष खरेदीपुर्व करारपत्र लिहून दिले आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, तारणगहाण, दान, हिस्सा इजमेंट ॲटचमेंट, कोर्ट हुकूम, वाटणी, कर्जबोजा वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत सर्व अस्सल कागदपत्रासह खालील पत्त्यावर लेखी कळवावा. मुदतीत कोणाची तक्रार अगर हरकत न आलेस सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीपत्राचा व्यवहार पुरा करतील. मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारींचा व हरकतींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही
ता.१५/०७/२०२६

**ॲड.राजकुमार पांडुरंग निर्मळ**
**ॲड.व नोटरी भारत सरकार**
**३/३११/१, अवधुत आखाडा, इचलकरंजी**
**मोबा. नं. ९८६०४४११५२**

**मे. धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेसमोर,**

चौ.अर्ज क्र. ०४/२०२६ कलम ४७
ट्रस्टचे नांव : **विद्यार्थी युवक संघटना, चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर**
नोंदणी क्रमांक : ई–८२७/ कोल्हापूर

**श्री. रावसाहेब जगोंडा पाटील व इ.५** ....**अर्जदार**
*विरुध्द*
**कोणी नाही** ....**वि.प.**

## जाहीर नोटीस

प्रकरण–महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४७ प्रमाणे नविन ट्रस्टी नेमणेकरीता.....

ज्याअर्थी अर्जदार यांनी **विद्यार्थी युवक संघटना, चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, नोंदणी क्रमांक ई–८२७ (कोल्हापूर)** या ट्रस्टकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४७ प्रमाणे अर्जात नमुद व्यक्तींची न्यासाचे विश्वस्त पदी नियुक्ती करणेकरीता या कार्यालयात अर्ज दाखल केलेला आहे, त्याअर्थी संदर्भीय ट्रस्टशी संबधीत इसमांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदाराच्या विनंतीवरुन संदर्भीय ट्रस्टकरीता अर्जात नमूद व्यक्तींची ट्रस्टी म्हणून नेमणूक करणेबाबत कोणाची काही तक्रार, हरकत वगैरे असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयात १०७९/ख–२, वसंत प्लाझा, तिसरा मजला, बागल चौक, राजाराम रोड, कोल्हापूर येथे दाखल करावी. या प्रकरणी **पुढील तारीख २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** नेमली आहे. सदर दिवशी हरकतदार किंवा हितसंबंधितांनी स्वतः अगर ज्यांना अधिकार दिलेले आहेत अशा वकील यांच्यामार्फत कागदोपत्री पुराव्यासह हजर राहून तक्रार, हरकत अर्ज वगैरे सादर करावा. अशा प्रकारे कोणाची तक्रार, हरकत अर्ज वगैरे मुदतीत उपस्थित न झाल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे अर्जाची चौकशी करुन योग्य तो निर्णय घेणेत येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

म्हणून जाहीर नोटीस आज दिनांक १८/०६/२०२६ रोजी मा. धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या आदेशाप्रमाणे, आमच्या सहीने व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिली.

(शिक्का)

**अ.बा.भुईंबर**
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

**(अ.स. खोमणे)**
**निरीक्षक**



आदर्श विद्यामंदिर व जगताप हायस्कूलमधील विद्यार्थीनींना सायकल वाटप करताना निवेद धंधानिया,रमेश मर्दा व इतर.

## एकमेकांच्या सहकार्याने यशाकडे वाटचाल-धंधानिया

इचलकरंजी,ता.१५-

.....................

**आदर्श शिक्षण मंडळ संचलित आदर्श विद्या मंदिर व रामभाऊ जगताप हायस्कूलमध्ये रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी हेरीटेज यांच्या सहकार्याने शाळेतील १० विद्यार्थीनीना सायकल वाटप करण्यात आल्या.**

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी हेरीटेजचे अध्यक्ष निवेद धंधानिया,संस्थेचे कार्याध्यक्ष रमेश मर्दा,संस्थेच्या कार्यवाह सौ.मीनाक्षी तंगडी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून झाली.स्वागत व प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.गीता खोचरे यांनी केले.निवेद धंधानिया यांनी विद्यार्थ्यांनी खूप शिकावे, मेहनतीचे महत्व तसेच एकमेकांच्या सहकार्याने यशाकडे वाटचाल कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. रमेश मर्दा यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे महत्व सांगून शुभेच्छा दिल्या.अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. गीता साळुंखे यांनी केले.आभार रामभाऊ जगताप हायस्कूलचे मुख्या.अशोक शिंदे यांनी मानले.



## लायन किंग बुध्दिबळ स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

इचलकरंजी,ता.१५-

.....................

**लायन्स क्लब ऑफ इचलकरंजी आणि इचलकरंजी चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने लायन किंग या बुद्धिबळ स्पर्धा बाळासाहेब दाते, लायन्स ब्लड सेंटर, दाते मळा, इचलकरंजी येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये एकूण २१९ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.**

स्पर्धेचे उद्‌घाटन व बक्षीस समारंभ अध्यक्ष रेखा सारडा, श्रद्धा सातपुते, खजिनदार बी.सुनीता अग्रवाल, क्लब ऍडमिनिस्ट्रेटर महेश सारडा, लेडीज विंग कॉर्डिनेटर प्रीती पोद्दार,हेमा डालिया ,कृष्ण अवतार भराडीया, रिजन चेअरमन महेंद्र बालार, झोन चेअरमन रामा बोहरा, विजयकुमार राठी, सचिन येलाजा, अरुण पाटील, उमेश भांगडिया, महेश भांगडिया, फिडे कूल चेस कोच शैलेश होनकट्टी, गॅलेक्सिचे मुख्याध्यापक धनुक्षे मॅडम व सीमा पेरनुले यांच्या हस्ते पार पडला. या स्पर्धा खुला व ७,९,११,१३, १५ वर्षाखालील अशा एकूण आठ गटांमध्ये घेण्यात आल्या. स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व ९३ ट्रॉफी तसेच इतर सहभागी खेळाडूंना मेडल देवून सन्मानित करण्यात आले.स्पर्धेसाठी पंच म्हणून शैलेश होनकट्टी, मोहिनीराज डांगे, शंकर आडम, सम्मेद पाटील, वर्षा होनकट्टी, प्रियंका ठोमके, श्रुती देसाई तसेच सहाय्यक पंच कपिल ठोमके, अजित निर्मळे, ज्योती देसाई, रुपाली निर्मळे, भारती कुरडे, वर्षा काश्मिरे यांनी काम पाहिले.

## कोमनपाच्या बैठकीत विविध निवडी जाहीर

कोल्हापूर,ता.१५(प्रतिनिधी)-

.....................

**कोल्हापूर महापालिकेच्या विशेष बैठकीत आरोग्य, पाणी पुरवठा व प्राथमिक शिक्षण समितीवर निवडी जाहीर केल्या. त्यामध्ये आरोग्य विशेष समिती सभापती पदी सुरेखा ओटवकर यांची तर उपसभापती पदी वैभव माने, पाणी पुरवठा विशेष समिती सभापती पदी संगीता सावंत यांची तर उपसभापतीपदी दिपा काटकर, प्राथमिक शिक्षण समिती सभापती पदी शिला सोनुले यांची तर उपसभापती पदी पुजा पोवार यांची, क्रीडा समिती सभापती पदी विजयसिंह खाडे-पाटील यांची तर उपसभापती पदी रोहित कवाळे यांची निवड करण्यात आली.**

अप्पर जिल्हाधिकारी किरण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत या निवडी जाहीर करण्यात आल्या. नगरसचिव सुनिल बिद्रे यांनी ही सर्व निवडणूक प्रक्रिया पार पाडली तर सहा.आयुक्त डॉ.विजय पाटील, परवाना अधिक्षक अशोक यादव यांनी मतमोजणी अधिकारी म्हणून काम पाहिले. निवडीनंतर अप्पर जिल्हाधिकारी किरण कुलकर्णी, महापौर रुपाराणी निकम, स्थायी समिती सभापती विशाल शिराळे, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ.कौसर बागवान, उपसभापती सौ.दिपा ठाणेकर, सभागृह नेता मुरलीधर जाधव, विरोधी पक्षनेते राजेश लाटकर, गटनेते शारंगधर देशमुख व नगरसेविकांनी नवनिर्वाचित सभापती व उपसभापतींचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# स्मार्ट मीटर विरोधात न्यायालयात याचिका दाखल करणार

### सांगरुळ येथील ग्रामसभेत एकमुखी ठराव मंजूर

सांगरूळ,ता.१५(प्रतिनिधी)-

.....................

**महावितरणच्या मनमानी कारभाराला आणि स्मार्ट मीटर सक्तीला कडाडून विरोध करत, याविरोधात थेट न्यायालयात याचिका दाखल करण्याचा ठराव सांगरूळ येथील विशेष ग्रामसभेत एकमुखाने मंजूर करण्यात आला. स्मार्ट मीटरविरोधात आता जनतेनेच मोठा जनरेटा उभा करण्याची गरज आहे, असे आवाहन गोकुळचे माजी संचालक बाळासाहेब खाडे यांनी यावेळी केले. सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच शितल खाडे होत्या.**

या विशेष ग्रामसभेत महावितरणच्या कारभारावर ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. बाळासाहेब खाडे पुढे म्हणाले की, एक युनिट ही वीज वापरली नसतानाही ग्रामपंचायतच्या बाजारवाडा येथील मीटरचे तब्बल १२ लाखांचे बिल आले आहे तर पाणीपुरवठा विभागाचे १२ लाख असे एकूण २४ लाखांच्या फरकाचे अवाजवी बिल महावितरणने पाठवले आहे. हा अन्याय सहन केला जाणार नाही. ग्रामस्थांनी आपापले तक्रार अर्ज ग्रामपंचायतीत जमा करावेत, ते महावितरणकडे पाठवून जाब विचारला जाईल. तसेच या संपूर्ण प्रकरणाचा सखोल अभ्यास करण्यासाठी एक विशेष कमिटी स्थापन करून महावितरण आणि स्मार्ट मीटरविरोधात कोर्टात धाव घेण्याचा निर्णय घेण्यात आला.



ग्रामस्थ बाजीराव खाडे यांनी आपले केवळ २० युनिट रीडिंग असताना २३८० रुपये बिल आल्याचे सांगत महावितरणच्या लुटीचा पर्दाफाश केला. स्मार्ट मीटर बसवण्यासाठी कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांचा दबाव आहे, त्यामुळे लोकप्रतिनिधींनी यावर पालकमंत्री यांच्यासोबत जिल्हा पातळीवर व्यापक बैठक घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. सभेत स्मार्ट मीटर न बसवण्याचा ठरावही संमत झाला. संभाजी नाळे यांनी स्मार्ट मीटर मध्ये कॅमेरा असून तांत्रिक बाबींवरून महिलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न उपस्थित केला तर सुनील कापडे यांनी महावितरणवर मोर्चा काढण्याचे आवाहन केले. या सभेत आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या अभिनंदनाचा ठरावही करण्यात आला.

बैठकीला उपसरपंच अश्विनी यादव, निवास वातकर, बाजीनाथ खाडे, सदाशिव खाडे, राहुल खाडे, मारुती खाडे, प्रदीप नाळे, विलास आसगावकर, तानाजी वातकर, सचिन नाळे, बदाम खाडे, दिलीप खाडे, रवी खाडे, रेषा आंबी, उज्वला लोंढे, गीतांजली कासोटे, साक्षी म्हेत्तर यांच्यासह अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## शेतकरी कामगार पक्ष घरमालक संघटनेची स्थापना

कोल्हापूर, ता.१५(प्रतिनिधी)-

.....................

**शहर उपनगरामध्ये घरमालक आणि कुळ हे वाद दिवसेंदिवस वाढत आहेत. घर मालकाचे घर खाली करण्यासाठी कुळ अवाजवी पैशाची मागणी या सारखे अनेक प्रश्न घरमालकांचे आहेत.**

या प्रश्नातून घरमालकांची सोडवणूक करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शहरातील घरमालकांची बैठक घेवून कोल्हापूर शहर महापालिका शेतकरी कामगार पक्ष प्रणित घरमालक संघटना स्थापना करण्यात आली.तरी शहर उपनगरातील घरमालकांनी टेंबेरोड येथील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस भाई बाबुराव कदम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# रोटरी मेन प्रोबस क्लबचा पदग्रहण सोहळा उत्साहात

इचलकरंजी,ता.१५-

.....................

**रोटरी मेन प्रोबस क्लबचा सन २०२६-२७ चा नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचा पदग्रहण सोहळा नेमिनाथ कोथळे अध्यक्ष रोटरी मूकबधिर शाळा यांच्या अध्यक्षते खाली प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.**



रोटरी मेन प्रोबस क्लबच्या पदग्रहण सोहळ्याप्रसंगी नेमीनाथ कोथळे,रामभाऊ कुडचे,पुष्पा मोरे व इतर प्रमुख मान्यवर.

सन २०२५ -२६ चे माजी अध्यक्ष रामभाऊ कुडचे व माजी महिला अध्यक्षा श्रीमती पुष्पा मोरे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मोमेंटो पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच २०२६-२७ चे अध्यक्ष जगन्नाथ बजाज व महिला अध्यक्षा श्रीमती इंदुमती कुडचे यांना कॉलर प्रदान करण्यात आली. नूतन पुरुष सेक्रेटरी बबन रसाळ व महिला सेक्रेटरी सौ. शोभा आवटे यांना पीन प्रदान करण्यात आली.प्रमुख पाहुण्यांनी प्रोबस क्लबची सुरुवात व स्थापना कशी झाली याचा इतिहास सांगितला. रवींद्र सौंदत्तीकर यांनी प्रास्ताविक केले. संस्थापक चेअरमन डी.एम. कस्तुरे यांनी प्रोबस क्लब स्थापनेचा रंजक इतिहास सांगितला.पदग्रहण सोहळ्यास महेंद्र मुथा,पंकज कोठारी, अभय यळरूटे, संजय घायतिडक, वैशाली कोठारी,अर्चना दबडे, विठ्ठलराव डाके, सुकुमार चौगुले, मोहनराव सातपुते, रुक्मिणी डाके, विजया स्वामी, सुशीला सातपुते, जुगनू पिरजादा, जया कागवाडे, उज्वला गोंधळी तसेच प्रोबस क्लब सभासद बंधू भगिनी व रोटरी परिवारातील इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रमुख पाहुण्यांची ओळख भिमराव मोरे यांनी करून दिली. सूत्रसंचालन श्रीमती वैशाली नायकवडे व श्रीमती हमीदा गोरवाडे यांनी केले.श्रीमती शशिकला गायकवाड यांनी आभार मानले.

## बोलोलीच्या उपसरपंचपदी वर्षा सुतार

सांगरूळ,ता.१५(प्रतिनिधी)-

.....................



**बोलोली (ता.करवीर) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ. वर्षा विश्वजीत सुतार यांची बिनविरोध निवड झाली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात पार पडलेल्या विशेष सभेत उपसरपंच निवडीची प्रक्रिया शांततेत पार पडली. यावेळी उपस्थित सदस्यांनी वर्षा विश्वजीत सुतार यांच्या नावास एकमताने पाठिंबा दिल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.**

निवडीनंतर वर्षा विश्वजीत सुतार यांचे ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकाभिमुख,पारदर्शक व विकासाभिमुख कामांना प्राधान्य देत सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी सरपंच पौर्णिमा कांबळे, ग्रामसेवक मेंगाणे साहेब, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष चंद्रकांत कारंडे, मावळते उपसरपंच धोंडीराम बाटे, दिलीप पाटील, शिवाजी बाटे, शारदा बाटे, कविता पाटील, गीता दुर्गुळे, बी.आर.पाटील, नाथा दुर्गुळे, संभाजी दुर्गुळे, ज्ञानदेव कांबळे, शैलेश बाटे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## प्रांताधिकारी शिंगटेंनी साधला कडवेतील शेतकऱ्यांशी संवाद

मलकापूर,ता.१५(प्रतिनिधी)

.....................

**शाहूवाडी तालुक्यात पालकमंत्री तथा राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'एक दिवस बळीराजासाठी' या उपक्रमांतर्गत पन्हाळा-शाहूवाडीचे उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे यांनी कडवे येथील शेतकऱ्यांच्या बांधावर भेट देत त्यांच्या अडचणी व शेतीविषयक माहिती जाणून घेतली. यावेळी शाहूवाडी पंचायत समितीचे उपसभापती अमरसिंह खोत प्रमुख उपस्थित होते.**


कडवेतील शेतकऱ्यांशी संवाद साधताना प्रांताधिकारी शिंगटे.

प्रांताधिकारी समीर शिंगटे यांनी भात रोपलागवड सुरू असलेल्या शेतात प्रत्यक्ष उतरून रोपलागवडीचा अनुभव घेतला. भात लागवडीसाठी शेतकऱ्यांना करावे लागणारे कष्ट, शेतातील पाण्याचे व्यवस्थापन, यंत्रसामुग्रीचा वापर तसेच शेतीतील विविध बाबींची त्यांनी सविस्तर माहिती घेतली. उपसभापती अमरसिंह खोत यांनी भात व रताळी पिकांचे उत्पादन,बाजारभाव तसेच शेतकऱ्यांसमोरील विविध समस्या याबाबत प्रांताधिकारी शिंगटे यांना माहिती दिली.

यावेळी आबा कामेरकर पतसंस्थेचे चेअरमन रमेश कामेरकर, माजी उपसरपंच शिवाजी पाटील, मंडळ अधिकारी एस. डी. तांदळे, कृषी सेवक स्वप्नील ओव्हळ तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्ञानसमृद्धीसाठी प्रशिक्षणांची नितांत आवश्यकता-कासोटे

बिद्री,ता.१५(प्रतिनिधी)-

.....................

**दिवसेंदिवस ज्ञानाच्या कक्षा रुंदावत चालल्या असून बदलत्या जमान्यात टिकण्यासाठी शिक्षकांनी स्वत:ला अद्ययावत ठेवावे लागेल. भविष्यातील आव्हाने डोळ्यासमोर ठेवून बनवलेल्या नवीन अभ्यासक्रमाला सामोरे जाण्यासाठी आणि ज्ञान समृद्धीसाठी प्रशिक्षणाची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन कागल तालुक्याच्या विस्तार अधिकारी (शिक्षण) सौ. सारिका कासोटे यांनी केले.**

कागल तालुक्यातील शिक्षकांसाठी इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी व सहावी वर्गांच्या बदललेल्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण वर्गाला मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. सौ.कासोटे पुढे म्हणाल्या, स्पर्धेच्या युगात विद्यार्थी टिकण्यासाठी राज्य मंडळाने सीबीएसईच्या धर्तीवर पाठ्यक्रमांची निर्मिती केली



आहे. यामधून निश्चित केलेली ध्येये, उद्दिष्टे व अध्ययन निष्पत्ती गाठण्यासाठी शिक्षकांनी तळमळीने प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे.

यावेळी बीआरसीचे शहाजी पाटील, प्रज्ञा पाटील, सुलभा पाटील,विकास डांगे,सुनील माजगावकर, युवराज वाईगडे, एस.डी.कांबळे, दीपक सुतार,शशिकांत माळी, सविता पाटील,राजश्री पाटील, मंगल किरुळकर,गायत्री डवरी, रेखा कपले यांच्यासह शिक्षक ,शिक्षिका उपस्थित होत्या.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १०/०७/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
भिगी औरत
सायं. ७ वा.
A हवस की रात प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १० पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
स्ट्रोलिन सेल्स
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी.
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
शुक्रवार ता.10 पासून रोज ४ खेळ
*१२*३*६*९ वा.

धमाल-४
अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
DOLBY DIGITAL PLUS 7.1
मनोरंजनाचा धमाका अनुभवा आपल्या आवडत्या पंचवटी चित्रमंदिरात
ऑनलाईन पेमेंट स्विकारले जाईल G Pay PhonePe
ऑनलाईन बुकिंग साठी bookmyshow

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
शुक्रवार ता. १० पासून
रोज ४ खेळ १२-३-६-९ वा.

DHAMAAL
धमाल-४ (हिंदी)

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत
शुक्रवार ता.१० पासून
रोज ४ खेळ १२ * ३ * ६ * ९
फुल्ल कॉमेडी चित्रपट

DHAMAAL 4
(हिंदीमध्ये)

गुरु
शुक्रवार,ता. १० पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.१५ * ३.३० * ६.३० * ९.३० वा.
सुपरहिट धमाल सेरीजमध्ये लेटेस्ट ४ था भाग

DHAMAAL 4
अॅडव्हान्स बुकींग रोज सकाळी ११ पासून

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
bookmyshow

RELEASING 17th JULY
Advance Booking Now Open
THE ODYSSEY
" द ओडिसी " ( हिंदी )
FROM 17 JULY 2026
11:30 AM, 03:00 PM
06:30 PM, 10:00 PM
" धमाल 4 " ( हिंदी )
10:30 AM, 01:15 PM
04:15 PM, 07:15 PM
10:00 PM
" वेलकम टू द जंगल " ( हिंदी )
11:30 AM, 01:00 PM
10:30 PM
" अल्फा " ( हिंदी )
02:30 PM, 07:45 PM
" मोआना " - हिंदी ( 3D )
05:30 PM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11

धमाल 4 (HIN) (U/A)
11.00am, 12.45, 01.45, 03.30, 04.30, 06.30, 07.30, 10.30pm
ऐल्फा (HIN) (A)
01.00pm
ईव्हिल डेड बर्न (HIN) (A)
11.00am, 10.00pm
गुरुवार धमाका पेप्सी व पॉपकॉर्नवर मिळवा 50% सूट



‘ज्ञान लक्ष्मी’ प्रशिक्षणास रवाना होणाऱ्या महिला शेतकऱ्यांच्या निरोपप्रसंगी संचालक विठ्ठल पाटील,अमरसिंह साळुंखे व इतर.

## ‘राजारामबापू’च्या महिला शेतकरी ‘व्हीएसआय’च्या प्रशिक्षणासाठी रवाना

ईश्वरपूर,ता.१५(प्रतिनीधी)-

**राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या प्रगतशील महिला शेतकरी साखर उद्योगातील शिखर संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्हीएसआय, मांजरी बु: (पुणे) या संस्थेकडून ऊस शेतीचे अद्यावत ज्ञान व प्रशिक्षण घेण्यास रवाना झाल्या.**

राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्या शेती समितीचे अध्यक्ष विठ्ठल पाटील, ऊस विकास समितीचे अध्यक्ष अमरसिंह साळुंखे,संचालक राजकुमार कांबळे यांनी महिला शेतकऱ्यांना निरोप दिला. यावेळी प्रभारी कार्यकारी संचालक विजय मोरे,सचिव डी.एम.पाटील,मुख्य शेती अधिकारी प्रशांत पाटील, कामगार युनियनचे कार्याध्यक्ष तानाजीराव खराडे,वाहन विभाग प्रमुख सुनिल जाधव,ऊस पुरवठा अधिकारी संग्राम पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.'व्हीएसआय'मध्ये राज्यातील प्रगतशील महिला शेतकऱ्यांना ‘ज्ञानलक्ष्मी’ नावाने ४ दिवसांचे ऊस शेतीचे अद्यावत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## श्री मळाईदेवी पतसंस्थेला २.९९ कोटींचा निव्वळ नफा-थोरात

कराड,ता.१५(प्रतिनिधी)-

**श्री मळाईदेवी नागरी सहकारी पतसंस्थेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेने ३१७ कोटी रूपयांच्या व्यवसायाचा टप्पा गाठत २ कोटी ९९ लाख रूपयांचा निव्वळ नफा मिळविला असून, सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अशोकराव थोरात यांनी दिली.**



चेअरमन अजित थोरात यांनी प्रास्ताविकात संस्थेला ५ कोटी २८ लाख रूपयांचा ढोबळ नफा झाल्याची माहिती दिली. संस्थेने एनपीएची शंभर टक्के तरतूद केली असून स्थापनेपासूनच 'अ' वर्ग कायम राखल्याचे त्यांनी सांगितले. माजी चेअरमन अरूणादेवी पाटील यांनी, संस्थेच्या ३९ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेत,२१ शाखा व मुख्य कार्यालयाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना बँकिंग सेवा पुरविल्या जात असल्याचे सांगितले. ता.३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडे ९,१९४ सभासद, १८० कोटी रूपयांच्या ठेवी, १३७ कोटी रूपयांचे कर्जवाटप, ७१ कोटी रूपयांचा मुदत ठेवी, १२.४८ कोटी रूपयांचे भागभांडवल आणि १५.३५ कोटी रूपयांहून अधिक राखीव निधी असल्याची माहिती त्यांनी दिली. सभेत सचिव सर्जेराव शिंदे व अनिल पवार यांनी नोटीस वाचन केले.सूत्रसंचालन शर्मिला श्रीखंडे व गौरी जाधव यांनी, तर संचालक शामराव पवार यांनी आभार मानले.यावेळी ॲड.चंद्रकांत गायकवाड, सुभाष पाटील,शिवाजीराव धुमाळ,प्रभाकर नलवडे, मोहनराव माने, भारत तंत्रे,काकासाहेब कदम,के.एल.सावंत,डॉ.स्वाती थोरात, ॲड.जाधव आणि शारदा वाघ यांनी मनोगते व्यक्त केली.



आष्टा येथे भावई उत्सवात प्रसाद वाटपप्रसंगी संभाजीराव माळी, बाळासाहेब इंगळे, अनिल कुंभार, श्रीकांत सावंत.

## संभाजी माळी युथ फौंडेशनतर्फे भावई उत्सवात प्रसादाचे वाटप

आष्टा,ता.१५(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र व कर्नाटकात प्रसिद्ध असणाऱ्या आष्टा येथील ग्रामदैवत श्री चौंडेश्वरी देवीच्या भावई उत्सवानिमित्त मंदिरात येणाऱ्या भाविकांना संभाजीराव माळी युथ फौंडेशनच्यावतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले. सुमारे सात हजार भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला.**

सव्वालाखी आष्टा शहरात ग्रामदैवत श्री चौंडेश्वरी देवीचा भावई उत्सव १० जुलैपासून सुरु आहे.उत्सवाच्या चौथ्या दिवशी जोगणी उत्सव होता. प्रमुख मार्गावरून जोगण्यांची मिरवणूक सुरू होती. दर्शनासाठी महिलांसह आबालवृद्धांची गर्दी झाली होती. दर्शनानंतर अनेक महिला मंदिरात येत होत्या. जोगणी उत्सवानिमित्त मंदिरात येणाऱ्या सुमारे सात हजार भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी संभाजीराव माळी, माजी नगरसेवक जगन्नाथ बसुगडे, विश्वास मोरे, श्रीकांत सावंत, राजाराम मोहिते, शिरू सावंत, संतोष मगदूम,विजय मगदूम, राहुल सावंत,विश्वास मोरे,जगू बसुगडे, धनाजी सावंत, तानाजी माळी, दीपक पाटील, अनिल बसुगडे, छोटू वठारे आदी उपस्थित होते.

## खाडे संकुलात एनसीसी कॅडेट्सना रायफल फायरिंग प्रशिक्षण

मिरज,ता.१५(प्रतिनिधी)-

**खाडे शैक्षणिक संकुलाच्या एनसीसी विभागातर्फे आणि १६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, सांगली यांच्या सहकार्याने एनसीसी कॅडेट्ससाठी रायफल फायरिंग प्रशिक्षण उत्साहात पार पडले.**

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त,आत्मविश्वास,नेतृत्वगुण आणि राष्ट्रीय सेवाभाव विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित प्रशिक्षणाला कॅडेट्सचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.प्रशिक्षणात सुरक्षित शस्त्र हाताळणीचे नियम, रायफलची रचना व कार्यपद्धती, नेमबाजीची मूलभूत तत्त्वे, योग्य फायरिंग पोझिशन्स,अचूक नेम साधण्याची तंत्रे तसेच सुरक्षा उपाययोजनांची माहिती देण्यात आली.त्यानंतर प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कॅडेट्सनी प्रत्यक्ष रायफल फायरिंगचा सराव केला.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी स्वाती खाडे, मुख्याध्यापिका करुणा माने आणि संगीता पाटील यांनी कॅडेट्सना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचे नियोजन व समन्वय एनसीसी विभागप्रमुख विक्रांत गौंड यांनी केले. प्रशिक्षक आणि एनसीसी विभागाच्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने प्रशिक्षण पार पडले.

# जतमध्ये प्राणी संग्रहालय उभारणीला वेग

## प्रस्तावित जागेची मुख्य वनसंरक्षकांकडून पाहणी

जत,ता.१५(प्रतिनिधी)-

**जत तालुक्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा देणारा आणि राज्याच्या नकाशावर जतची वेगळी ओळख निर्माण करणारा सुमारे १०० एकरांवरील प्रस्तावित प्राणी संग्रहालय (झू) प्रकल्प आता प्रत्यक्षात येण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पुढे पडले आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (आयएफएस) कोल्हापूर श्रीलक्ष्मी अन्नबाथुला यांच्या प्रमुख उपस्थितीत वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रस्तावित जागेची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक बाबींचा आढावा घेतला.**

आमदार गोपीचंद पडळकर यांच्या पुढाकारातून हा प्रकल्प साकार करण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण यांच्या मान्यतेसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबी, भूभागाची उपयुक्तता, पर्यावरणीय निकष, पायाभूत सुविधा तसेच भविष्यातील विकास आराखड्याचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.



जत येथे प्राणी संग्रहालयाच्या प्रस्तावित जागेची पाहणी करताना मुख्य वनसंरक्षक लक्ष्मी अन्नबाथुला, आ.गोपीचंद पडळकर आदी.

स्थळ पाहणीनंतर केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाकडे सादर करण्यासाठी प्रस्ताव तातडीने अंतिम करून नागपूरमार्गे पुढील मंजुरीसाठी पाठविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. या प्रकल्पाची प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून पुढील दोन वर्षांत प्राणी संग्रहालय उभारण्याचा संकल्प आमदार गोपीचंद पडळकर यांनी व्यक्त केला असून,त्यानुसार प्रशासनानेही हालचाली गतिमान केल्या आहेत.

दरम्यान, आमदार पडळकर यांनी प्रस्तावित परिसरात आधुनिक सुविधांनी युक्त प्राणी संग्रहालय कसे विकसित करता येईल, पर्यटकांसाठी कोणत्या सुविधा उपलब्ध करून देता येतील तसेच पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना देण्यासाठी कोणते नियोजन आवश्यक आहे,याबाबत अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. या प्रकल्पामुळे जत तालुक्यात पर्यटन वाढीस चालना मिळण्याबरोबरच स्थानिक युवकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील तसेच परिसरातील आर्थिक व्यवहारांनाही गती मिळेल, असा विश्वास त्यानी व्यक्त केला.

याच बैठकीत तालुक्यातील धार्मिक पर्यटन विकासालाही प्राधान्य देण्यात आले. श्री अंबामाता मंदिर (जत),संगतीर्थ मंदिर (वळसंग), श्री महालक्ष्मी मंदिर (गिरगाव), खंडोबा उर्फ म्हातारबा मंदिर(कुलाळवाडी) आणि मरगुबाई मंदिर (मोटेवाडी) या प्रमुख धार्मिक स्थळांच्या विकास आराखड्यांचा आढावा घेण्यात आला. संबंधित सर्व विकास प्रस्ताव जुलैअखेर तयार करून पुढील मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

या पाहणी दौऱ्यात उपवनसंरक्षक सागर गवते, सहाय्यक वनसंरक्षक कांबळे,तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी निखिल पाटील, सल्लागार आकाश जगताप यांच्यासह वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच प्रस्तावित प्राणी संग्रहालय, धार्मिक स्थळांचा विकास आणि पर्यावरण संवर्धन या तिन्ही बाबींचा समन्वय साधत जत तालुक्याला पर्यटनाच्या नव्या उंचीवर नेण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा सुरू असून,हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही युद्धपातळीवर सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी चरणसेवा पथके सज्ज

सातारा,ता.१५(प्रतिनिधी)-

**आषाढी वारी २०२६ चे औचित्य साधून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि आरोग्य पथकातर्फे पालखी सोहळयादरम्यान वारकऱ्यांसाठी भव्य चरणसेवा व आरोग्य जनजागृती मोहीम राबवण्यात येणार आहे.**

पालखी मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांची वैद्यकीय सेवा आणि पाऊले मोकळी करून देण्यासाठी जिल्ह्यातील नामांकित वैद्यकीय व नर्सिंग महाविद्यालयांचे १ हजार हून अधिक स्वयंसेवक जिल्हाधिकारी संतोष पाटील व मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.रविराज निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तैनात करण्यात येणार आहेत.तरी वारकऱ्यांनी चरणसेवा व आरोग्य सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले आहे.

## शिराळा एसटी आगारात वृक्षारोपण संपन्न

शिराळा,ता.१५(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभर ७८ हजार वृक्षारोपण करण्याच्या संकल्पाचा एक भाग म्हणून शिराळा एसटी आगारात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.**

एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत शिराळा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी नगरसेवक केदार नलावडे, शिराळा एसटी आगाराचे व्यवस्थापक धन्वंतरी ताटे, सागर नलावडे, अक्षय पाटील तसेच एसटी महामंडळाचे चालक, वाहक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उच्चदाब विद्युत वाहक तारा झाडांमध्ये अडकल्या

## अंकलखोप हायस्कूलसमोरील चित्र; विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात

भिलवडी,ता.१५(वार्ताहर)-

**भारती विद्यापीठ संचलित हुतात्मा भगतसिंग हायस्कूल, अंकलखोपच्या प्रवेशद्वाराशेजारी तसेच राज्य मार्ग क्र. १५१ लगत उच्चदाब (एचपी) विद्युत वाहक तारा झाडांच्या फांद्यांमध्ये अडकून धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे. या तारांचा झाडांच्या फांद्यांशी सतत घर्षण होत असल्याने शॉर्टसर्किट होऊन आगीच्या ठिणग्या पडत असल्याचा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू आहे. या गंभीर बाबीकडे महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.**

शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरच हा प्रकार घडत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दररोज शेकडो विद्यार्थी याच मार्गाने ये-जा करतात. पावसाळ्यात जोरदार वारे, पाऊस आणि विजांचा कडकडाट होत असल्याने परिस्थिती अधिक धोकादायक बनली आहे. घर्षणामुळे सतत आवाज येत असून अनेकदा ठिणग्या खाली पडत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. स्थानिकांच्या मते, संबंधित उच्चदाब विद्युत वाहिन्या अत्यंत धोकादायक असून त्यांना मानवी स्पर्श झाल्यास गंभीर दुर्घटना घडू शकते. त्यामुळे झाडांच्या फांद्या तातडीने छाटून विद्युत वाहिन्या सुरक्षित करणे आवश्यक आहे. मात्र, या कामाबाबत महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभाग यांच्याकडून एकमेकांकडे जबाबदारी ढकलली जात असल्याने प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे.



अंकलखोप येथील भगतसिंग हायस्कूलच्या गेटसमोर उच्चदाब विद्युत वाहक तारा झाडांच्या फांद्यांमध्ये अडकून धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे.

ग्रामस्थांनी वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याची खंत व्यक्त केली आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ करणारी ही परिस्थिती तातडीने दूर करण्याची मागणी पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी केली आहे.शैक्षणिक परिसर, राज्य मार्ग आणि सार्वजनिक वर्दळीचे ठिकाण लक्षात घेता या धोकादायक विद्युत वाहिन्यांबाबत तातडीने संयुक्त पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित विभागांनी झाडांच्या फांद्यांची छाटणी करून विद्युत वाहिन्या सुरक्षित कराव्यात, अशी मागणी आहे.

## अतिवृष्टीने नुकसानग्रस्त रस्त्यांची दुरुस्ती करा

### खा.धैर्यशील माने

शिराळा,ता.१५(प्रतिनिधी)-

**वारणा नदीवरील मांगले-सावर्डे येथील कोल्हापूर पद्धतीचा बंधारा अलीकडील अतिवृष्टीमुळे पाण्याखाली गेला असून, बंधाऱ्यालगतचा संपर्क रस्ता पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खा.धैर्यशील माने यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली.**

यावेळी खास.माने यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून नुकसानग्रस्त रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीचे त्वरित पंचनामे करून शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. पाहणीदरम्यान कार्यकारी अभियंता ज्योती देवकर, उपविभागीय अभियंता बी.आर. पाटील तसेच कोडोली पाटबंधारे शाखेच्या अभियंता नेहा देसाई उपस्थित होत्या.



मांगले-सावर्डे बंधाऱ्याच्या नुकसानीची पाहणी करताना खा.धैर्यशील माने यांच्यासमवेत पृथ्वीसिंग नाईक व अन्य मान्यवर.

यावेळी शिराळाचे नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक, वारणा सहकारी साखर कारखान्याचे संचालक विजय पाटील, धनटेक पाणी पुरवठा संस्थेचे चेअरमन सत्यम पाटील, निलेश आवटे,विनायक गायकवाड, सुभाष पाटील, उत्तम गावडे, बाबा पाटील, पैलवान मनोज पाटील, सुमित पाटील,संदीप चरापले, रवींद्र कोकाटे, दत्तात्रय तडाखे, नितीन दिवे, बबलू निकम यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## आष्ट्यात ‘एसआयआर’बाबत जनजागृती

आष्टा,ता.१५(प्रतिनिधी)-

**आष्टा नगरपरिषदेतर्फे आष्टा नगरपरिषद कार्यक्षेत्रातील मतदारांची मतदारयादी एस. आय. आर.बाबत माहिती देत जनजागृती करण्यात आली.**

याबाबत माहिती देताना प्रशासन अधिकारी रघुनाथ मोहिते म्हणाले, एस.आय.आर. म्हणजे स्पेशल इंटेंशन रिविजन हि केंद्रीय निवडणूक आयोगाची मोहीम असून या अंतर्गत मतदार यादीतील दुबार, मयत, शिफ्ट झालेले मतदार काढून टाकून नवीन पात्र लोकांची नावे टाकायची आहेत. नागरिकांनी आपल्या दारी येणाऱ्या बीएलओ यांना सहकार्य करायचे आहे. बीएलओ तीन वेळा आपल्या घरी येईल या कालावधीत तुम्ही भेटला नाही तर दारावर नोटीस चिटकवेल.त्यानंतरही संपर्क न झाल्यास फॉर्म भरण्याची संधी जाईल.

आपले २००२ च्या यादीत नाव असेल तर फक्त मॅपिंग फॉर्म भरून द्यायचा आहे. ता.१ जुलै १९८७ पूर्वी जन्म झालेल्यांचे जर यादीत नाव नसेल तर त्यांनी जन्म तारिख व जन्मस्थळ उल्लेख असलेला ११ कागदपत्रे पैकी म्हणजे जन्म दाखला, पासपोर्ट, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, दहावी वा बारावी प्रमाणपत्र, कुटुंब नोंदवही,सरकारी जमीन अथवा घराचे कागदपत्र, सरकारी ओळखपत्र, पेन्शन आदेश, वन हक्क प्रमाणपत्र, ता.१ जुलै १९८७ पूर्वीचे बँक अथवा पोस्टाचे पासबुक यापैकी एक कागद द्यावा. ता.१ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ नंतर जन्म असलेल्यांनी स्वतःचा, आई, वडील यांचा जन्माचा पुरावा द्यावा.ता.५ ऑगस्ट २०२६ रोजी कच्ची मतदार यादी प्रसिद्ध होईल. या यादीत नाव नसेल तर ता.५ ऑगस्ट ते ता.४ सप्टेंबर या कालावधीत हरकत दाखल करावी. ता.७ ऑक्टोंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. याची नागरिकांनी नोंद घ्यावी.



# कागदोपत्री पुरावे घेऊनच जन्म दाखल्यांमध्ये दुरुस्ती

## आयुक्त संजीता महापात्र यांचे स्पष्टीकरण;पडताळणीनंतर अहवाल पाठवणार

सांगली,ता.१५(प्रतिनिधी)-

**महापालिकेने बोगस जन्म दाखले दिलेले नाहीत. जन्म दाखल्यांत केलेली दुरुस्ती ही शासनाच्या अध्यादेशातील तरतूदीनुसार आणि कागदोपत्री पुरावे घेऊनच केलेली आहे. त्या ३८२७ जन्म दाखल्यांची पडताळणी जिल्हा निबंधकांकडून होईल. त्यानंतर शासनाला अहवाल सादर करण्यात येईल,असे स्पष्टीकरण महापालिकेच्या आयुक्त संजीता महापात्र यांनी पत्रकारांना दिली आहे.**

माजी खास.किरीट सोमय्या यांनी जन्म दाखल्यांबाबत आरोप केले होते. सांगली महापालिकेकडून गेल्या सोळा महिन्यांत ३९ हजार २०६ जन्म दाखले दिले आहेत, त्यापैकी ३ हजार ८२७ दाखले बोगस आहेत, असा आरोप सोमय्या यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर बोलताना आयुक्त महापात्र म्हणाल्या, केंद्र शासनाच्या सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टिम पोर्टलद्वारे जन्म-मृत्यू दाखल्यांचे डिजिटायझेशन २०२४ पासून सुरू झाले आहे.आतापर्यंत सुमारे ६० हजार दाखल्यांची पोर्टलवर नोंदणी करण्यात आली आहे. नागरिकांकडून क्यूआर कोडयुक्त दाखल्यांची मागणी वाढत असल्याने जुन्या नोंदी पोर्टलवर अपलोड करून नव्याने क्यूआर कोड असलेले दाखले दिले जात आहेत. महापालिकेने सुमारे ३९ हजार दाखल्यांपैकी ३८२७ दाखल्यांमध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. या दुरुस्त्यांमध्ये नाव,पत्ता किंवा अन्य तपशीलांतील बदलांचा समावेश आहे. प्रत्येक दुरुस्तीसाठी संबंधित नागरिकांकडून आवश्यक कागदोपत्री पुरावे घेण्यात आले आहेत. केलेली दुरुस्ती कोणत्या पुराव्यांआधारे केली, याची कागदपत्रे यांची तपासणी जन्म नोंदणीचे जिल्हा निबंधक करतील व अहवाल शासनाकडे पाठवतील. दाखले रद्द करण्याचा अधिकार महापालिकेला नसल्याने त्याबाबत स्थानिक प्रशासन कोणतीही कार्यवाही करू शकत नाही. दाखले दुरुस्तीसंदर्भात शासन निर्णयात पुरेसे स्पष्टीकरण नाही. त्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन घेण्यात येईल.महापालिका क्षेत्रात रस्त्याच्या कडेला राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत पेव्हिंग ब्लॉक बसवण्याची कामे हाती घेतली होती. त्यातील ४ कामे रद्द करण्यात आली असल्याचेही आयुक्त महापात्र यांनी सांगितले.

पावसाळी पाणी निचऱ्याचा ५९२ कोटी रुपयांचा हा प्रकल्प अहवाल तयार करताना प्रायमो कंपनीने शास्त्रीय माहिती, आकडेवारीचा आधार घेतला असल्याचे सांगून आयुक्त म्हणाल्या, जमिनीच्या चढ-उताराचे परीक्षण केले आहे. प्रकल्पात काही चूक असेल, तर ती दुरुस्त करता येईल. प्रकल्पाच्या ३० टक्के निधीबाबत मित्रा या शासकीय यंत्रणेशी चर्चा केली आहे. हा निधी शासनाकडून प्राप्त होणार आहे.भूसंपादनाचा खर्च मात्र महापालिकेला करावा लागेल.

वारणाली हॉस्पिटलबाबत महासभेत ठरेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, वारणाली मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलसाठी १०८ पदांची आवश्यकता आहे. त्यापैकी २५ पदांना शासन मंजुरी आहे. मल्टिस्पेशालिटी रुग्णालयासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची गरज असते, उपलब्ध होणाऱ्या २५ मनुष्यबळावर (डॉक्टर व आरोग्य कर्मचारी) केवळ ओपीडी सुरू करता येईल.मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल चालवण्यासाठी मोठी यंत्रणा महत्त्वाची आहे. त्यातूनच हे हॉस्पिटल पीपीपी तत्त्वावर चालविण्याबाबत विषयपत्र आणले आहे. महासभेत जसे ठरेल तसे होईल, असेही महापात्र म्हणाल्या.

कर्जरोख्यांसाठी स्वतंत्र समिती करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करून महापात्र म्हणाल्या, महापालिकेकडून १०० कोटी रुपयांचे कर्जरोखे उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी अधिकाऱ्यांची कार्यकारी समिती आहे. यासंदर्भात आणखी एक समिती नियुक्त केली जाणार आहे. त्यात महापौरांसह महापालिकेतील विविध समित्यांच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश असेल.लवकरच मर्चेंट बँक, सीएची नियुक्ती केली जाईल.कर्जरोख्यापूर्वी दुहेरी लेखा पद्धत तयार करावी लागणार आहे. सारी प्रक्रिया पूर्ण होण्यास सात ते आठ महिन्यांचा कालावधी लोटेल.

महासत्ता



# बंधाऱ्यांना पुरातील झाडा-झुडपांचा विळखा

## बंधाऱ्यांच्या सुरक्षेला धोका;जलसंपदा विभागाने झुडपे काढून घेण्याची मागणी

गारगोटी,ता.१५(प्रतिनिधी)-

गेल्या आठ दिवसांपूर्वी भुदरगड तालुक्यात मुसळधार पाऊस झाला आणि त्यामुळे तालुक्यातून वाहणाऱ्या वेदगंगा नदीला महापूर आला. वेदगंगेच्या या महापुरामुळे तालुक्यात असणाऱ्या अनेक बंधाऱ्यांना नदी काठावरील उन्मळून पडलेली झाडे, झुडपे येऊन लागली आहेत. त्यामुळे बंधाऱ्याला धोका पोहोचण्याची शक्यता आहे. वेदगंगा नदीवरील सर्वच बंधाऱ्यांना मोठी झाडे येऊन लागली आहेत. त्यामुळे वाहतूक होत असलेल्या बंधाऱ्यांना धोका निर्माण झाला आहे.जलसंपदा विभागाने बंधाऱ्यांना लागलेली झुडपे काढून घ्यावीत अशी मागणी तालुक्यातील सर्वच गावातील नागरिकांनी केली आहे.



गारगोटी ते आकुर्डे दरम्यान वेदगंगा नदीवरील बंधाऱ्याची आजची ही अवस्था (फोटो-आनंद चव्हाण)

वेदगंगा नदीवर पाटगाव येथे धरण आहे. या धरणासाठी तालुक्यात ममदापुर, शेळोली, शेणगाव, आकुर्डे, म्हसवे, निळपण, वाघापूर या गावाशेजारी नदीवर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधले आहेत. या बंधाऱ्यावरून वाहतूक चालू असते. पुरामध्ये अनेक झाडे, झूडपे या बंधाऱ्यांना लागली आहेत. या झुडपांमुळे बंधाऱ्याला धोका पोहोचणार आहे. जर बंधाऱ्यांना धोका पोहोचून बंधारा वाहून गेला तर उन्हाळ्यात शेती आणि पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण गावागावातील लोकांची होणार आहे. शिवाय नदीच्या दोन्ही काठावरील गावांचा हा पर्यायी रस्ता बंद होणार आहे. विद्यार्थी तसेच शेतकरी या रस्त्यावरून ये -जा करतात. ही पर्यायी वाहतूक बंद होणार आहे.त्यामुळे जलसंपदा विभागाने वेळीच दखल घेऊन बंधाऱ्याला लागलेली झुडपे काढून बंधारे मोकळे आणि प्रवाहीत करावेत अशी मागणी नागरिक आणि शेतकरी वर्गातून होत आहे.


### बंधाऱ्याची डागडुजी न झालेस आंदोलनाचा इशारा

आकुर्डे बंधाऱ्याला झुडपे, लाकडे लागली आहेत. शिवाय बंधाऱ्यावरील संरक्षक कठडे मोडून पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे पण धोक्याचे झाले आहे. जर पुन्हा महापूर आला आणि महापूरात पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे बंधारा वाहून गेला तर मोठी अडचण आकुर्डे गावाची होणार आहे, त्यामुळे तातडीने ही झुडपे काढून घ्यावीत व बंधाऱ्याची डागडुजी करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा पी.एस.कांबळे यांच्यासह नागरिकांनी दिला आहे.

# बर्की धबधब्यावरील प्रवेशबंदी उठवावी

## स्थानिक व्यावसायिक व पर्यटकांची मागणी

बाजारभोगाव,ता.१५(वार्ताहर)-



शाहुवाडी तालुक्यातील निसर्गरम्य बर्की धबधबा पावसाळ्यात पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरतो. मात्र, महसूल प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव धबधब्यावर पर्यटकांना प्रवेशबंदी लागू केल्याने या पर्यटनस्थळावर अवलंबून असलेल्या स्थानिक नागरिकांच्या रोजगारावर मोठा परिणाम झाला आहे.

धबधब्याच्या परिसरात खाद्यपदार्थ विक्री, चहा-नाश्त्याची दुकाने, हातगाड्या, वाहन पार्किंग, स्थानिक वाहतूक तसेच इतर छोट्या व्यवसायांवर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. बंदीमुळे पर्यटकांची वर्दळ पूर्णपणे थांबली असून या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे.धबधब्यावर कायमस्वरूपी बंदी घालण्याऐवजी आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात. धोकादायक ठिकाणी संरक्षक कठडे,सूचना फलक, बचाव पथक, पोलीस किंवा होमगार्डची नियुक्ती करून नियंत्रित पद्धतीने पर्यटकांना प्रवेश द्यावा. त्यामुळे पर्यटकांची सुरक्षितता राखली जाईल आणि स्थानिकांचा रोजगारही टिकून राहील.प्रशासनाने स्थानिकांच्या उपजीविकेचाही विचार करून बंदीच्या निर्णयाचा पुन्हा एकदा पुनर्विचार करावा आणि योग्य नियोजनासह बर्की धबधबा पर्यटकांसाठी खुला करावा, अशी जोरदार मागणी मा.सरपंच आनंद पाटील यांच्यासह ग्रामस्थ व व्यावसायिकांकडून करण्यात येत आहे.



बोरपाडळे येथे आर.आर.खडके अकॅडमी येथे वृक्षारोपण करताना अविनाश खडके, क्रांती खडके व इतर मान्यवर.

# वृक्षारोपण करणे ही काळाची नितांत गरज-प्राचार्य खडके

बोरपाडळे,ता.१५(प्रतिनिधी)-

वृक्षारोपण ही काळाची नितांत गरज असून प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक वर्षी किमान पाच झाडांचे वृक्षारोपण केले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य अविनाश खडके यांनी केले. ते आर.आर.खडके अकॅडमीच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रमप्रसंगी बोलत होते.

बोरपाडळे येथील खडके अकॅडमी संचलित आई विद्यानिकेतन, शर्विल खडके हायस्कूल,क्रांती जुनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स, पन्हाळा व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज यांच्यावतीने दरवर्षी वृक्षारोपण केले जाते.यामध्ये प्रामुख्याने आंबा, जांभूळ, पेरू, लिंबू, शेवगा, आपटा, हिरडा, बेहडा, उंबर यांचा समावेश आहे. या कार्यक्रमप्रसंगी प्राचार्या क्रांती खडके, उपप्राचार्य अयोध्या पाटील, रश्मी पवार, सर्व शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. ऋषिकेश जगदाळे यांनी आभार मानले.

# पावसाची उघडीप ; शेती कामे ठप्प

शिरगाव,ता.१५ (प्रतिनिधी)-

राधानगरी तालुक्यात जून महिन्यातील तुट पावसाने जुलैच्या प्रारंभी भरून काढली. मुसळधार पावसामुळे मान्सून बाबतची चिंता कमी झाली होती . मात्र गेले चार ते पाच दिवस तालुक्यात पावसाने पुन्हा ओढ दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या भात रोपलागणीची कामे ठप्प झाली आहेत.तर भात पिकांची रोपलागण केलेल्या जमिनी पावसाअभावी भेगाळल्याने सुकून गेल्या आहेत. परिणामी खरीप हंगामावर पुन्हा संकट येण्याची शक्यता निर्माण झाल्याने बळीराजाच्या मनात चिंतेचे ढग दाटून आले आहेत.



पावसाअभावी भात पिकांची केलेली रोपलागण करपण्याची शक्यता असून बळीराजाच्या चिंतेत भर पडली आहे.

तालुक्यात गेले चार ते पाच दिवस पाऊस रुसला असून उन्ह सावल्याचा खेळ सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्येत आणखीन वाढ झाली आहे. जुलैमध्ये प्रारंभी पावसाने दिलासा दिला असला तरी सध्या पावसाने ओढ दिल्याने शेती व्यवसाय पुन्हा अडचणीत आला आहे.जुलै महिन्याच्या प्रारंभी समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी भुईमूगाची टोकणी,नाचणा, तरवा पेरणीची कामे पूर्ण केली. त्यानंतर हा पाऊस भात पिकाच्या रोपलागणीसाठी पोषक ठरला. या काळात शेतकऱ्यांनी बऱ्यापैकी भात रोपलागणीची कामे उरकून घेतली. मात्र हे काम अपूर्ण असताना पावसाने पुन्हा दडी मारल्याने भात रोपलागणीची कामे ठप्प झाली आहेत.त्याचबरोबर भात पिकाची लागण केलेल्या जमिनीत वाफ्यामध्ये भेगा पडू लागल्या असून सुकून गेले आहे. तर माळरानात मांडणी केलेले हळव्या जातीचे भात पिक वाळून चालले आहे. त्यामुळे भात पिकाला पावसाची नितांत गरज आहे. अन्यथा हे पिक वाया जाण्याची भिती शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

### बळीराजाच्या मनात चिंतेचे ढग

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली भात रोप लावणी

कोतोली,ता. १५ (प्रतिनिधी)-

कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी पन्हाळा तालुक्यातील बांदिवडे येथील देवगिरी फार्म कृषी पर्यटन केंद्राला भेट देत 'एक दिवस बळीराजासोबत' या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी त्यांनी स्वतः चिखलात उतरून 'इंद्रायणी' जातीच्या भाताची पारंपरिक पद्धतीने रोप लावणी केली .यावेळी तहसीलदार माधवी शिंदे, गटविकास अधिकारी सोनाली माडकर, नायब तहसीलदार विजय जाधव, तालुका कृषी अधिकारी काव्यश्री घोलप, प्रसाद गिरी, लक्ष्मी भारती, राजगुरू गोसावी, सरपंच हौसाबाई गवळी,सुखदेव गिरी,निलांबरी गिरी यांच्यासह अनेक शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.



# मरीमाई मंदीर परिसरात मलकापूर अर्बन पतसंस्थेकडून वृक्षारोपण

मलकापूर,ता.१५(प्रतिनिधी)-

मलकापूर येथील मरीमाई मंदिर परिसरात मलकापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या (मलकापूर अर्बन पतसंस्था) वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास पतसंस्थेचे संचालक भीमराव सनगर,राजेंद्र कोठावळे, संजय भोपळे आणि प्रसाद वळीवडेकर,जनरल मॅनेजर राजेंद्र जोशी, शाखाधिकारी शैलेश गांधी यांच्यासह संस्थेचे सभासद आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीची वेळेत भरपाई मिळावी

गगनबावडा,ता.१५ (प्रतिनिधी)-

### गगनबावडा मराठा समाज संघटनेची वनविभागाकडे मागणी

गेल्या काही दिवसांपासून वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याच्या तक्रारी वन विभागाकडे झाल्या आहेत. यानुसार मराठा समाज संघटना यांच्यावतीने वनविभाग साळवण यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची भरपाई वेळेत आणि जास्तीत जास्त मिळावी अशी प्रमुख मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून दिलासा मिळण्यासाठी भरपाईची प्रक्रिया सुलभ आणि जलद करावी, असेही संघटनेने नमूद केले.

यावेळी प्रकाश जाधव आनंदा कोटकर,युवराज पाटील तुकाराम धोंडी पाटील, संजय धोंडी पाटील, विजय पाटील यांच्यासह मराठा समाजाचे पदाधिकारी, बांधव आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी निवेदन स्विकारून मागण्यांबाबत वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

# तारदाळ सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी बापू गायकवाड

तारदाळ,ता.१५(वार्ताहर)-

तारदाळ विविध कार्यकारी सेवा सोसायटी न १ च्या चेअरमनपदी बापू गायकवाड व व्हाईस चेअरमनपदी अशोक जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.सदर निवडीचे कामकाज सहकार अधिकारी पी डी हारुगले यांनी पाहीले.



तारदाळ सेवा सोसायटीचे नूतन चेअरमन बापू गायकवाड व व्हाईस चेअरमन अशोक जाधव यांचा सत्कार करताना मान्यवर.

तारदाळ येथील विविध कार्यकारी सोसायटी नं. १ या सोसायटीचे चेअरमन महेश पाटील,व्हा चेअरमन दिपक पोवारयांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी बुधवार १५ रोजी निवड प्रक्रिया पार पडली यावेळी चेअरमन पदासाठी बापू गायकवाड व व्हा चेअरमन पदासाठी अशोक जाधव यांचे एकमेव अर्ज दाखल झाले होते त्यामुळे निवडणूक अधिकारी पी डी हारुगले यांनी नूतन चेअरमन पदी बापू गायकवाड व्हाईस चेअरमनपदी अशोक जाधव यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केलेया निवडी प्रसंगी संचालक कुमार चौगुले,जयप्रकाश भगत, डॉ.संदीप खोत,संजय चोपडे,बाबासो पाटील, शिवाजी टाकळे,आबासो खांडेकर,शांताबाई वास्के,लक्ष्मी चौगुले,सुनिल पोवार,विरेंद्र पाटील, भाऊसो वास्के, वसंत चौगुले, भिमराव बन्ने, चंद्रकांत तांबवे, अशोक चौगुले, बाबासो महाजन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.सदर निवडीनंतर माझी चेअरमन व्हाय चेअरमन व नूतन चेअरमन व्हाय चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला. आभार दीपक पोवार यांनी मानले.

# टोपच्या प्रस्तावित गॅस प्लांटला विरोध

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

टोप,ता.१५(प्रतिनिधी)-

हातकणंगले तालुक्यातील टोप येथील शासकीय गायरान गट क्रमांक १९७ व १४९४ वर प्रस्तावित भारत गॅस प्लांटला विरोध करून सदर जमीन सार्वजनिक उपक्रमांसाठी राखीव ठेवण्याची मागणी सरपंच तानाजी पाटील,पं.स. सदस्य मुकुंद पाटील यांनी जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड यांच्याकडे केली आहे.



जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड यांना निवेदन देताना सरपंच तानाजी पाटील,प.स.सदस्य मुकुंद पाटील

निवेदनात म्हटले आहे की, टोप येथील गट क्रमांक १९७ व १४९४ या जमिनी महसूल अभिलेखात गायरान म्हणून नोंद आहेत. या ठिकाणी भारत गॅस कंपनीचा व्यावसायिक प्रकल्प उभारण्याची प्रशासकीय प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळत असून, या प्रस्तावाला गावातील नागरिक, ग्रामपंचायत आणि लोकप्रतिनिधी म्हणून आपण तीव्र विरोध दर्शवत आहोत. या गट क्रमांक १९७ व १४९४ वरील प्रस्तावित भारत गॅस प्लांटची प्रक्रिया तात्काळ स्थगित करून संबंधित जमीन सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांसाठी सुरक्षित ठेवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी सरपंच तानाजी पाटील व पंचायत समिती सदस्य मुकुंद पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# महागाईच्या विळख्यात बाप्पा; उत्पादन खर्चात लक्षणीय वाढ

## कच्च्या मालासह इंधन, वाहतूक आणि मजुरीचे दर वाढले; गणेशभक्तांच्या खिशालाही बसणार झळ

आजरा,ता.१५(सचिन कळेकर)-

दोन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आजरा शहरासह तालुक्यातील कुंभारवाड्यांमध्ये गणेशमूर्ती घडविण्याची लगबग वाढली आहे. मूर्तींना अंतिम आकार देणे, घासणी, नक्षीकाम, अलंकारांची रचना आणि वाळविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असले, तरी रंगकामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. मात्र यंदा महागाईच्या वाढत्या झळा मूर्तिकारांनाही बसल्या असून गणेशमूर्तींच्या उत्पादन खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे.



कुंभारवाड्यांमध्ये विविध आकारांच्या शाडूच्या गणेशमूर्ती अंतिम टप्प्यात तयार होत असून,सध्या घासणी, नक्षीकाम आणि वाळविण्याचे काम सुरू आहे. रंगकामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. (छायाचित्र : शिवतेज कळेकर,सोहाळे )

शाडू माती, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), रंग, वार्निश, ब्रश, फायबर, पॅकिंग साहित्य तसेच सजावटीच्या वस्तूंचे दर गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढले आहेत. त्यातच डिझेल-पेट्रोलच्या वाढत्या किंमतीमुळे वाहतूक खर्चही वाढल्याने मूर्तिकारांचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडले आहे. अनेक कच्चा माल राजस्थानसह इतर राज्यांतून मागवावा लागत असल्याने त्याचाही अतिरिक्त भार उत्पादन खर्चावर पडत आहे.

आजरा शहरातील कुंभार गल्लीसह साळगाव, भादवण, वाटंगी, शिरसंगी, मडिलगे, सुलगाव, हातीवडे, चांदेवाडी आदी गावांतील कुंभार कुटुंबे सध्या दिवसरात्र कामात गुंतली आहेत. प्रत्येक मूर्ती आकर्षक आणि देखणी बनविण्यासाठी अत्यंत बारकाईने काम सुरू आहे.

सुरुवातीला पावसाळ्यातील दमट वातावरणामुळे मूर्ती वाळविण्याचा कालावधी वाढत असल्याने मूर्तिकारांना अधिक संयम आणि काळजी घ्यावी लागत होती. मात्र अलीकडे पाऊस कमी होऊन ऊन पडल्याने मूर्ती सुकविण्याच्या कामाला चांगले वातावरण तयार झाले आहे.

आजरा तालुक्यातील शाडूच्या मूर्तींना कोकण, कोल्हापूर, बेळगाव, इचलकरंजी तसेच कर्नाटकातून मोठी मागणी असते. त्यामुळे बाहेरगावी पाठविण्यात येणाऱ्या मूर्तींना प्राधान्य देत त्यांची तयारी सुरू आहे. त्यानंतर स्थानिक ग्राहकांसाठीच्या मूर्ती तयार केल्या जाणार आहेत.

महागाईमुळे उत्पादन खर्च वाढला असला तरी मूर्तींच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे मूर्तिकारांनी स्पष्ट केले. मात्र वाढलेल्या खर्चाचा काहीसा परिणाम मूर्तींच्या विक्री दरावर होणार असल्याने यंदा गणेशभक्तांना मूर्ती खरेदीसाठी अधिक खर्च करावा लागण्याची शक्यता आहे.

### महागाईचा फटका नेमका कुठे?

- शाडू माती,पीओपी आणि रंगांच्या किंमतीत मोठी वाढ.
- डिझेल,पेट्रोल दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढला.
- पॅकिंग व सजावटीच्या साहित्याचे दर वाढले
- खर्च वाढल्याने गणेशमूर्तींच्या किंमती वाढण्याची शक्यता.

# मतदार यादी कामांमध्ये रेशन दुकानदारांनी सहकार्य करावे

## उपजिल्हाधिकारी डॉ. संपत खिलारे



जिल्हाधिकारी कार्यालयात रेशन दुकानदारांची बैठक झाली त्याप्रसंगी घेतलेले छायाचित्र.

कोल्हापूर ,ता.१५

..................

**मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेच्या पार्श्वभूमीवर बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांना रेशन दुकानदारांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी डॉ. संपत खिलारे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीस सुमारे दीडशेहून अधिक रेशन दुकानदार उपस्थित होते.**

बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ. खिलारे यांनी सांगितले की, अनेक बीएलओ नव्याने नियुक्त झाले असल्याने त्यांना स्थानिक पातळीवर काम करताना अडचणी येत आहेत. रेशन दुकानदारांचा नागरिकांशी दैनंदिन संपर्क असल्याने आणि धान्य वितरणाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाची माहिती असल्याने त्यांनी बीएलओंना आवश्यक सहकार्य केल्यास मतदार नोंदणीचे काम अधिक वेगाने आणि प्रभावीपणे पूर्ण होण्यास मदत होईल. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ.रवींद्र मोरे म्हणाले, राष्ट्रहिताला प्राधान्य देत रेशन दुकानदारांनी यापूर्वी कोरोना काळात, तसेच विविध आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचा जीव धोक्यात घालून धान्य वितरणाची व्यवस्था सुरळीत ठेवली होती. त्याच सेवाभावाने आता मतदार नोंदणीसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या कामातही सक्रिय सहभाग घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे. या बैठकीत सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा २७६ विधानसभा मतदारसंघाचे तहसीलदार नाथाजी सगट यांनी मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या बैठकीस सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी लक्ष्मण माने, राजेश मंडलिक, गजानन हवालदार, दीपक शिराळे, अरुण शिंदे, अशोक सोलापुरे, सरिता हारुगले, सुरेश पाटील, अनिल शेंगटे, निवृत्ती दिवेकर, सागर मेढे यांच्यासह अनेक पदाधिकारी व रेशन दुकानदार उपस्थित होते.



गणेश करिअर अकॅडमीचे उद्घाटन प्रसंगीचे छायाचित्र

# विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, शिस्तीच्या बळावर यश संपादन करावे

## – उपनिरीक्षक राजकुमार पाटील

कोंडिग्रे,ता.१५

................

**विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम, शिस्त आणि प्रामाणिकपणाच्या बळावर यश संपादन करावे असे प्रतिपादन शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे उप निरीक्षक राजकुमार पाटील यांनी केले. कोंडिग्रे येथे गणेश करिअर अकॅडमी उद्घाटन सोहळ्या प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक पाटील बोलत होते.या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन कल्लाप्पाण्णा गावडे यांची प्रमुख उपस्थित होते.**

यावेळी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि त्यांना विविध स्पर्धात्मक भरती प्रक्रियेत सक्षम बनविण्याच्या उद्देशाने पोलीस भरती, आर्मी भरती, अग्निवीर, , एअर फोर्स तसेच इतर सर्व शासकीय भरतींसाठी आवश्यक असलेल्या अत्याधुनिक शारीरिक प्रशिक्षण मैदानाच्या उभारणीचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी संस्थेच्या मुख्याध्यापिका सौ. शितल खारगे व राहुल भोळे तसेच संस्थेतील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी, पालक आणि गणेश करिअर अकॅडमीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवंगत वारकरी कुटुंबियांच्या मुलीच्या शिक्षणासाठी दरमहा ५ हजारांची वैयक्तिक मदत : पालकमंत्री पाटील

सांगली,ता. १५(प्रतिनिधी)

..........................

**आषाढी वारीदरम्यान जेजुरी येथील दुर्दैवी घटनेत मृत्यू झालेल्या सांगली जिल्ह्यातील तीन महिला वारकऱ्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी त्यांचे सांत्वन केले. शासन नियमानुसार मिळणाऱ्या शासकीय मदतीबरोबरच कसबे डिग्रज येथील दिवंगत राजश्री भोसले यांच्या मुलीच्या शिक्षणासाठी वैयक्तिक स्तरावर दरमहा पाच हजार रुपये देण्याची घोषणा मंत्री पाटील यांनी केली.**

पालकमंत्री पाटील यांनी राजश्री शंकर भोसले (कसबे डिग्रज), नंदा बाबासो पवार (कवलापूर) आणि माधवी राजेंद्र सलगरे (मालगाव) यांच्या घरी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी खासदार विशाल पाटील, उपजिल्हाधिकारी विशाल यादव, मिरज तहसीलदार डॉ. अपर्णा



मोरे-धुमाळ, सांगलीच्या अप्पर तहसीलदार अश्विनी वरूटे, शेखर इनामदार आदी उपस्थित होते.

अपघातात मृत्यू झालेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून विठ्ठल रखुमाई वारकरी योजनेंतर्गत ४ लाख रूपये व मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून १ लाख रूपये असे एकूण ५ लाख रूपये त्वरीत मिळवून देण्यासाठीचे प्रस्ताव प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# ट्रक चालकाला कारची धडक

निपाणी, ता.१५ प्रतिनिधी

**पुणेबंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील आंबा मार्केट वळणावर बुधवारी भरधाव कारची रस्ता ओलांडणाऱ्या ट्रक चालकाला धडक बसून अभिषेक इंचल (वय ३२, रा. गणेशपूर, हिंडलगा, बेळगाव) हा गंभीर जखमी झाला. अपघातात कारचेही नुकसान झाले.**

कार चालक अक्षय कळंत्रे (रा. कोल्हापूर) कुटुंबीयांसह बेळगावकडे जात असताना हा अपघात झाला.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग कार्यशाळाचे उद्घाटन



कोल्हापूर ता. १५ (प्रतिनिधी):

.................................

**अन्नप्रक्रीयामधील उद्यमशीलता शेतीमध्ये शेतकऱ्यांची आर्थिक उत्पन्न वाढवण्यास निश्चित मदत करेल पण उत्पादनाची गुणवत्ता व सुरक्षेचे उद्दिष्ठ अबाधित ठेवून काम करावे, अशी सूचना विभागीय कृषि सहसंचालक जालिंदर पांगरे यांनी केली. संमेलनात मोठ्या खरेदीदार-विक्रेत्यांच्यामध्ये झालेले व्यापारी करार जिल्ह्यातील कृषी उद्योजकतेला नवी दिशा देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयांच्या वतीने आयोजित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत खरेदीदार-विक्रेता जिल्हास्तरीय कार्यशाळा कसबा बावडा येथील गंगा भाग्योदय सांस्कृतिक भवन येथे संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यशाळेला विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी अजय कुलकर्णी, प्रकल्प संचालक आत्मा रक्षा शिंदे, कृषि उपसंचालक नामदेव परिट तसेच सर्व उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्ह्यातील सर्व बँकांचे अधिकारी-प्रतिनिधी तसेच जिल्हा संसाधन व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हापूर जिल्ह्याने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी, जिल्हा संसाधन व्यक्ती व यशस्वी उद्योजकांचा त्यांनी गौरव केला.

यावेळी तांत्रिक सत्रात अभिजीत गाताडे, दिग्विजय झिटे, मंगेश पवार, अमर पाटील यांनी उपस्थित उद्योजकांना सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्राजक्ता पाटील (कृषि अधिकारी) आणि आभार प्रदर्शन श्रीमती अश्विनी कोरे (तंत्र अधिकारी, फलोत्पादन) यांनी केले.



प्रांतकार्यालयातील अधिकाऱ्यांना निवेदन देताना रवि गोंदकर,राजेंद्र निकम,मनोहर जोशी व इतर पदाधिकारी.

# एसआयआर प्रक्रियेतील त्रुटी दूर कराव्यात

## मनसेचे प्रातांना निवेदन

इचलकरंजी,ता.१५

.....................

**महाराष्ट्र नवनिर्माण सेना, यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक नोंदणी अधिकारी दिपक शिंदे यांना मतदार यादी चे विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्याबाबत निवेदन देण्यात आले.**

निवेदनामध्ये बीएलओ यांनी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करावी, प्रलंबित मॅपिंग तातडीने पूर्ण करावे, प्रत्येक भागात (एसआयआर)सहाय्यता केंद्र सुरू करावे, मतदारांना योग्य मार्गदर्शन करावे तसेच सर्व पात्र मतदारांना संधी मिळण्यासाठी प्रक्रियेस मुदतवाढ द्यावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

यावेळी प्रांताधिकारी यांनी निवेदन स्वीकारून त्याची तात्काळ ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सर्व बीएलओ यांना घरपोच पडताळणी, प्रलंबित मॅपिंग पूर्ण करणे आणि (एसआयआर ) प्रक्रिया नियमांनुसार प्रभावीपणे राबविण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी मनसेचे शहर अध्यक्ष रवी गोंदकर, राजेंद्र निकम, प्रताप पाटील, मनोहर जोशी, अनिल झाडबुके, रोहित कोटकर, ऋषिकेश मराठे, संदीप पवार, दिलीप जाधव, नरेंद्र गोंदकर शहर उपाध्यक्ष राजेश माळी तसेच विद्यार्थी सेना पदाधिकारी तन्मय तांबे उपस्थित होते.


॥ अर्थो रक्षति रक्षितः ॥

**श्री आर्य चाणक्य**

नागरी सहकारी पतसंस्था मर्या; इचलकरंजी.

(कार्यक्षेत्र - कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा)

*** ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस ***

**(फक्त सभासदांकरीता)**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेची सन २०२५-२०२६ ची **३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.०९/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. 'लायन्स ब्लड बँक', दाते मळा, इचलकरंजी** येथे बोलविण्यात आलेली आहे. सदर सभेपुढील विषय प्रधान कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावणेत आले आहेत. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे,ही नम्र विनंती.

स्थळ : इचलकरंजी.

दिनांक : १६/०७/२०२६

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

| श्री. अमित पोवार | श्री. पंकज मेहता | श्री. राजेंद्र राशिनकर |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

सूचना : १) गणपूर्ती अभावी सभा तहकूब झालेस ती सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर घेणेत येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही. **सभासद प्रशिक्षण- सभासदांसाठी K.Y.C. या विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळा रविवार दि. ०९/०८/२०२६ इ. रोजी स.९.३० वा. (वार्षिक सभेपूर्वी) सभेच्या ठिकाणी होईल. तरी सर्व सभासदांनी प्रशिक्षणास वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.**


# निपाणी शहरातील नागरी समस्यासाठी मानव अधिकार संघटनेचे धरणे आंदोलन

निपाणी,ता.१५ (प्रतिनिधी)

......................

**शहरातील विविध नागरी समस्या सोडविण्यासंदर्भात येथील ४ जेआर मानवाधिकार संघटनेच्या वतीने तहसिलदार कार्यालयासमोर धरणे, उपोषण आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी खास. प्रियांका जारकीहोळी यांनी आंदोलनस्थळी भेट देवून संघटनेच्या मागण्यासंदर्भात प्रशासनाने जागरूक राहून तात्काल शहराच्या विविध समस्या सोडविण्यासाठी क्रम घेण्याचे आदेश दिले. तर, लवकरात लवकर मागण्या पूर्ण न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा यावेळी आंदोलकांनी प्रशासनाला दिला.**

सकाळी १० वा. तहसिलदार कार्यालयासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून आंदोलनाला सुरवात करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. अच्युत माने, अभय मानवी, प्रा. आर. के. दिवाकर, एन.डी. जत्राटकर, जुबेर बागवान, विठ्ठल वाघमोडे आदींनी विचार व्यक्त करून निपाणी शहर व उपनगरांना भेडसावणाऱ्या समस्या, नगरपालीका आणि इतर शासकीय कार्यालयांतील भ्रष्टाचार या विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. आंदोलनस्थळी प्रांताधिकारी



संपगावी, तहसिलदार सुरेश मुंजी, पालीका आयुक्त गणपती पाटील आदींनी संघटनेचे निवेदन स्विकारून याबाबत आवश्यक ती कारवाई करू अशी ग्वाही दिली.

संघटनेचे अध्यक्ष अशोक खांडके यांनी निपाणीतील सर्व सरकारी कार्यालयात कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी व ये-जा नोंदणी सक्तीची करावी. निपाणी शहर गांजा मुक्त करावे. यासह इतर प्रलंबित स्थानिक समस्या तात्काल मार्गी लावण्यात याव्यात अशी मागणी केली.

यावेळी विविध संस्था, संघटनांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. याप्रसंगी दिलीप पठाडे, दत्ता नाईक, संजय सुर्यवंशी, आनंद संकपाल, झुंजार दवडे, शकील चावलवाले, अशोक खांडके, सचिन पोवार, ज्ञानेश्वर चव्हाण, अविनाश माने, संतोष मावरकर, विशाल कांबले, योगेश कावले, युवराज शेटके, योगेश पोतदार, ए.आय. हलगले, मोहन पाटील, अशोक खांडेकर, संतोष कुर्ले, मोहम्मदशफी कुनथोडे यांच्यासह संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैशाच्या देवाणघेवाणीतून महिलेला विष पाजून मारले

## आरोपीस अटक

संकेश्वर,ता.१५( प्रतिनिधी )

..............................

**सोलापूर हद्दीत आढळलेल्या अनोळखी महिलेचा खून पैशाच्या देवाणघेवाणीतून झाल्याचे उघडकीस आले.याप्रकरणी संशयीत आरोपी हाजी मस्ताना मैनौद्दीन बागवान याला अटक करण्यात आली आहे.**



संशयीत आरोपी हाजी मस्ताना बागवान

सोलापूर तालुका हुक्केरी हद्दीतील पुणे-बेंगळुरु राष्ट्रीय महामार्ग सव्हिर्स रस्ता लगत २६ मे रोजी अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आल्याची नोंद संकेश्वर पोलीसात दाखल करण्यात आली.सोशल मेडियावरील इन्स्टाग्रामवर प्रसारित झालेल्या व्हिडिओ पाहून १ जून २०२६ रोजी श्रीमती शबाना बादशहा मुल्ला रा. गोसावी गल्ली रेठरे हरणाक्ष ता. वाळवा जि. सांगली यांनी संकेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेतली.त्यांनी सोलापूर हद्दीत आढळलेल्या अनोळखी महिला म्हणजे आपली आई बेबी बादशहा शेख (वय ५९ ) रा. इंद्रजित नगर उचगांव सध्या रा. शाहु कॉलनी टेंबलाईवाडी ता. करवीर असल्याचे सांगून ओळख पटवून दिली.

माझ्या आईकडून आरोपी हाजीमस्ताना मैनोद्दीन बागवान वय ( ४२ ) राहणार विक्रम नगर ,जोशी गल्ली कोल्हापूर याने कर्ज घेतले होते.पैशाच्या देवाणघेवाणीतून हाजीमस्ताना याने माझ्या आईचा खून केल्याची फिर्याद संकेश्वर पोलीस ठाण्यात दाखल केली.बेळगांव जिल्हा पोलीस प्रमुख के रामराजन, सहाय्यक पोलीस प्रमुख आर. बी. बसर्गी गोकाक डीएसपी रवि डी .नायक यांच्या मार्गदर्शनाखाली संकेश्वर पोलीस निरीक्षक गणपती कोगनोळी यांच्या नेतृत्वाखाली पीएसआय विठ्ठल नाईक पोलीस कर्मचारी एस एल गळतगी व्ही. जी. कुड्डगोळ यांनी लागलीच कोल्हापूर गाठून हाजीमस्ताना बागवान याला घरातून ताब्यात घेतले.पोलीस चौकशीत आरोपींनी आपण बेबी शेख यांचेकडून दिड लाख रुपये कर्ज घेतले होते.कर्जाची परतफेड करण्यास बेबी शेख यांनी तगादा लावला होता.त्यामुळे आपण बेबी शेखला संपविण्याचा निर्णय घेतला.२५मे२०२६ रोजी बेबी शेख यांनी आपणाला फोन लावला.लोकापूर येथील इसमाकडून पैसे आणावयाचे आहेत.ताबडतोब कारगाडी घेऊन ये.संधी चालून आल्याने आपण लागलीच कारगाडीची व्यवस्था केली. बेबी शेखला घेऊन लोकापूरकडे जाताना आपण पिण्याच्या पाण्यात विष घालून ते पाणी बेबी शेखला पिण्यास दिले.बेबी शेख मरण पावल्याची खात्री करून घेऊन तिच्या मृतदेहाची कर्नाटकातील सोलापूर फाट्यावर विल्हेवाट लावली.असे आरोपी हाजीमस्ताना मैनोद्दीन बागवान याने पोलीसांसमोर कबूल केले.



# डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजच्या एमबीबीएस प्रवेश क्षमतेत ५० जागांची वाढ

## –कुलपती डॉ.पाटील

कोल्हापूर ता.१५(प्रतिनिधी)

.............................

**डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजच्या एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत नॅशनल मेडिकल कमिशनने (एनएमसी)ने ५० जागांनी वाढ केली आहे. त्यामुळे महाविद्यालयाची प्रवेश क्षमता १५० वरून २०० इतकी झाली आहे. यामुळे अधिक गुणवंत विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी दिली.**

महाविद्यालयात आयोजित विशेष समारंभात डॉ. पाटील यांनी ही घोषणा केली. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. शर्मा, कृषी व तंत्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ ए. के. गुप्ता, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. राजेश ख्यालप्पा आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. पाटील यांच्या हस्ते केक कापून हा आनंद साजरा करण्यात आला.

विश्वस्त ऋतुराज पाटील म्हणाले, महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमतेत झालेली वाढ ही संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा आहे.

विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. शर्मा, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. राजेश ख्यालप्पा यांनीही मनोगते व्यक्त केली.उपअधिष्ठाता डॉ. पद्मजा देसाई यांनी आभार मानले.यावेळी श्रीलेखा साटम, डॉ. शिंपा शर्मा, डॉ. वैशाली गायकवाड, उप कुलसचिव संजय जाधव, अजित पाटील यांच्यासह संस्थांचे प्रमुख, प्राचार्य, विभाग प्रमुख प्राध्यापक उपस्थित होते.



# क्रांतीकडून वारकऱ्यांसाठी पाण्याचा टँकर रवाना

पलूस ,ता.१५(प्रतिनिधी)

श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आळंदी ते पंढरपूर पायी वारी करणाऱ्या दिंडी क्र. १ व ७ मधील हजारो वारकऱ्यांसाठी क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना, कुंडल यांच्यावतीने यंदाही प्रतिवर्षीप्रमाणे पिण्याच्या शुद्ध पाण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेसाठी सज्ज करण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे पूजन कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी परिसरातील वारकरी मंडळी तसेच क्रांतीचे संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**कोल्हापूर भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (महाराष्ट्र सुधारणा अधिनियम, २०१८) अन्वये ११ (१) खालील**

# अधिसूचना

क्रमांक भूसंपादन/एस.आर.-०५/२०२६. - ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-११/२०१४/प्रक्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला आहे. सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची- दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचीत करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची- तीनमध्ये दिलेली आहेत (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची- पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल, तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्याकालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम ३ द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पन्हाळा उपविभाग, पन्हाळा यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची- एक**

**संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन, जिल्हा कोल्हापूर, तालुका शाहूवाडी, गाव तनाळी**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादित करावयाचे क्षेत्र (हे. आरमध्ये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | १०/क | २.०२०० |
| २. | १८/अ | २.१९०० |
| ३. | १८/ब | २.८३०० |
| ४. | १८/क | २.८१००, पो.ख. ०.०३०० |
| ५. | १८/ड | २.८१००, पो.ख. ०.०४०० |
| ६. | २८/क | ०.८१०० |
| ७. | २८/ड | २.८३०० |
| | एकूण | १६.३०.०० हे.आर., पो.ख. ०.०७०० |

**अनुसूची- दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नांव :-** वारणा / चांदोली प्रकल्प, मौजे तनाळी, तालुका शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर.

**प्रकल्प कार्याचे वर्णन :-** चांदोली अभयारण्य व भूकंपामुळे बाधित झालेल्या उर्वरित क्षेत्राचे भूसंपादन करणेसाठी मौजे तनाळी, तालुका शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर येथील जमिनीचे भूमी संपादन. (क्षेत्र १६.३०.०० हे.आर., पो.ख. ०.०७.०० हे.आर.)

**समाजाला मिळणारे लाभ :-** सिंचनाखालील क्षेत्र वाढेल व लोकांचा आर्थिक व सामाजिकस्तर विकसित होणार आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक राहणीमान सुधारल्यामुळे ते सर्व लोक नागरी सुविधा मिळण्याबाबत सक्षम होणार आहेत.

**अनुसूची- तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

**प्रस्तावित संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही –** निरंक.

**अनुसूची- चार**

**( सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश**

वारणा व चांदोली हा एकच प्रकल्प असून सदरचा प्रकल्पाचा नियत दिनांक २ नोव्हेंबर १९७८ हा आहे. सदर प्रकल्पास भारत सरकार पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांचेवतीने पर्यावरण विषयक मान्यता पत्र क्रमांक १२/१४/८१/ईएन-५, दिनांक ३० मे १९८५ अन्वये प्राप्त झाली आहे. संपादना खालील जमीन ही चांदोली अभयारण्य व भूकंपामुळे बाधित झालेल्या उर्वरित क्षेत्राचे भूसंपादन करणेची आहे. सबब नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम ४ ते ६ नुसार सुधारित सामाजिक परिणाम निर्धारण करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची – पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :-** निरंक

**ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :-** प्रश्न उद्धवत नाही.

**क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील :-** प्रश्न उद्भवत नाही.

**टीप :-** उक्त जमिनींच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, पन्हाळा उपविभाग, पन्हाळा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

कोल्हापूर, २ एप्रिल २०२६

**अमोल येडगे (भा.प्र.से.)**
जिल्हाधिकारी, कोल्हापूर

**उपविभागीय अधिकारी यांजकडून**

**शुद्धिपत्रक**

क्रमांक भूसंपादन/निवाडा/एस.आर.-०३,०४,०५/दुरुस्ती/२०२४.-ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांजकडील चांदोली अभयारण्य व भूकंपामुळे बाधित झालेल्या उर्वरित क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत मौजे ढाकाळे, मौजे सोनार्ली पैकी धनगरवाडा व मौजे तनाळी, तालुका शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर येथील जमीन संपादनाकामी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ च्या अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, एप्रिल ३० ते मे ६, २०२६ मध्ये पृष्ठे ४ ते १० वर प्रसिद्ध झाल्या आहेत. तथापि, सदर अधिसूचनेमध्ये एस. आर. क्रमांकामध्ये सन २०२४ ऐवजी सन २०२६ असे साल नमूद झाले आहे. त्याऐवजी अनुक्रमे क्रमांक भूसंपादन/एस.आर.-०३/२०२४, क्रमांक भूसंपादन/एस.आर.-०४/२०२४ व एस. आर. - ०५/२०२४ असे वाचावे.

पन्हाळा, ५ जून २०२६.

**समीर शिंगटे,**
पन्हाळा उपविभाग, पन्हाळा.

जिमाका/कोल्हापूर/जाहि/का-४/३६/२०२६-२०२७

दैनिक महासत्ता
गुरुवार, ता.१६ जुलै २०२६





# एमबाप्पेने फ्रान्सच्या उपांत्य फेरीतील पराभवाची जबाबदारी स्वीकारली

टेक्सास (अमेरिका), ता.१५–

**फिफा विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत स्पेनकडून २–० असा पराभव पत्करावा लागल्यानंतर, फ्रान्सचा कर्णधार किलियन एम्बाप्पेने कबूल केले की त्यांचा संघ नियोजित रणनीतीची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरला. त्याने मान्य केले की, फ्रान्सने प्रतिस्पर्ध्यांना सामन्यावर वर्चस्व ठेवण्याची संधी दिली.**

स्पर्धेतून फ्रान्स बाहेर पडल्यानंतर एम्बाप्पे म्हणाला की, संघाची रणनीती स्पेनवर आक्रमक दबाव टाकण्याची आणि त्यांना मिडफील्डवर वर्चस्व गाजवू न देण्याची होती. पण ते या उद्दिष्ट या सामन्यात साध्य झाले नाही. ''आमच्यासाठी हे कठीण होते. रणनीतिकदृष्ट्या, आमची योजना त्यांच्यावर दबाव टाकण्याची, वन–टू–वन खेळण्याची आणि त्यांना सामन्याची गती ठरवू न देता त्यांच्या पसंतीनुसार खेळू न देण्याची होती. त्यांना सामन्यावर आणि चेंडूवर नियंत्रण ठेवायचे असते, असे एम्बाप्पेने सांगितले.

एम्बाप्पेने पराभवाची जबाबदारी स्वीकारली आणि म्हटले की, कर्णधारपदासोबतच टीकाही सहन करावी लागते. विजय मिळवल्यावर जसा सर्व मान–सन्मान आपला असतो, तसाच विजय न मिळाल्यास त्याची जबाबदारीही आपल्यालाच घ्यावी लागते. हा माझ्या खेळाचा आणि आयुष्याचा एक भाग आहे. कर्णधार म्हणून मला सर्व जबाबदारी स्वीकारावीच लागेल. आम्हाला अंतिम फेरीत पोहोचायचे होते, पण ते शक्य झाले नाही; त्यामुळे आता फुटबॉल चाहते जे काही म्हणतील ते आम्हाला स्वीकारलेच पाहिजे,असे तो म्हणाला.

# भारतीय संघाचे नेतृत्व करण्यास सज्ज : स्मृती मानधना

नवी दिल्ली,ता.१५–

**इंग्लंडमध्ये नुकत्याच झालेल्या आयसीसी महिला टी–२० विश्वचषकात भारताचे आव्हान साखळी फेरीतच संपुष्टात आले. या पार्श्वभूमीवर, अनुभवी फलंदाज स्मृती मानधना हिने आपण अधिक मोठी जबाबदारी स्वीकारण्यास तयार असल्याचे मान्य केले आहे. एका मुलाखतीत मानधनाला भारतीय महिला संघाच्या कर्णधारपद हस्तांतरणाबाबत चर्चा सुरू आहे. विचारणा झाल्यास भारताचे नेतृत्व करण्यास तुम्ही तयार आहात का? यावर ती म्हणाली, ''हो, नक्कीच. मी तयार आहे.''**



महिला टी–२० विश्वचषक स्पर्धेतून लवकर बाहेर पडण्याबाबत मानधना पुढे म्हणाली, आत्मपरीक्षण करणे आणि चुकांमधून शिकणे महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने, आपण आपल्या मागील चुकांमधून पुरेसा बोध घेतलेला नाही आणि त्या चुकांची पुनरावृत्ती करत राहिलो आहोत. आता पुढे पाहताना, २०२८ च्या टी–२० विश्वचषकापर्यंत या फॉरमॅटकडे कशा प्रकारे पाहायचे आणि एक संघ म्हणून आपल्याला काय करायचे आहे, याचा एक स्पष्ट रोडमॅप असणे आवश्यक आहे.

# आयसीसी एकदिवसीय अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत अक्षर पटेल टॉप टेनमध्ये

नवी दिल्ली, ता.१५–

**बर्मिंगहॅम येथे इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यातील प्रभावी कामगिरीबद्दल भारतीय अष्टपैलू क्रिकेटपटू अक्षर पटेलला ताज्या आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत पुरस्कार मिळाला आहे. शुभमन गिलदेखील फलंदाजीच्या क्रमवारीत अव्वल स्थानाच्या जवळ पोहोचला आहे.**

अक्षर पटेलने आयसीसी एकदिवसीय अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत तीन स्थानांची झेप घेत नववे स्थान पटकावले आहे. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याने चार बळी घेतले आणि ५२ चेंडूंमध्ये ५७ धावा केल्या, ज्यामुळे भारताला सहा गडी राखून विजय मिळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या कामगिरीमुळे अक्षर पटेल फलंदाजीच्या क्रमवारीत १८ स्थानांनी सुधारणा करत ७३ व्या स्थानावर पोहोचला आहे. गोलंदाजीच्या क्रमवारीतही त्याने दोन स्थानांची सुधारणा करत ४२ वे स्थान मिळवले आहे.



इंग्लंडविरुद्ध २५९ धावांचे लक्ष्य गाठताना, शुभमन गिलने ७५ चेंडूंमध्ये ११ चौकार आणि एका षटकारासह ८० धावा केल्या आणि त्यानंतर तो दुखापतग्रस्त होऊन निवृत्त झाला. या खेळीनंतर गिलचे रेटिंग १२ गुणांनी वाढले असून, तो आता एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या डॅरिल मिचेलपेक्षा केवळ ११ रेटिंग गुणांनी मागे आहे.

आपल्या पुनरागमनाच्या सामन्यात एक बळी घेणारा जसप्रीत बुमराह गोलंदाजी क्रमवारीत २४ व्या स्थानावर पोहोचला आहे. नाबाद ५२ धावा करणारा वॉशिंग्टन सुंदर फलंदाजी क्रमवारीत २४ स्थानांनी झेप घेऊन १७७ व्या स्थानावर पोहोचला आहे. तसेच, अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीतही त्याने १६ स्थानांची सुधारणा करत ५५ वे स्थान पटकावले आहे.

**विराट कोहली आणि रोहित शर्माचा टॉप ५ मध्ये दबदबा**

एकीकडे शुभमन गिल अव्वल स्थानाकडे कूच करत असताना, दुसरीकडे भारताचे दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनीही अव्वल ५ मध्ये आपले स्थान टिकवून ठेवले आहे. ताज्या क्रमवारीत विराट कोहली ७५७ रेटिंग गुणांसह तिसऱ्या स्थानावर, तर रोहित शर्मा ७४४ गुणांसह चौथ्या स्थानावर कायम आहे.

## २०२७ च्या वर्ल्ड कपमध्ये मोठा ट्विस्ट

# आयसीसीने एकदिवसीय विश्वचषकाचे स्वरूप बदलले

मुंबई,ता.१५–

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद म्हणजेच आयसीसीने २०२७ मध्ये दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया यांच्या संयुक्त यजमानपदे होणाऱ्या पुरुष वनडे वर्ल्ड कपच्या फॉरमॅटमध्ये अत्यंत धक्कादायक बदल केला आहे. एडिनबर्ग येथे पार पडलेल्या आयसीसीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या नव्या नियमांची अधिकृत घोषणा करण्यात आली.**

टूर्नामेंटच्या सुरुवातीपासूनच सामन्यांमधील थरार आणि चुरस वाढवणे, हा या बदलामागील मुख्य उद्देश आहे. या नव्या नियमांमुळे आता कोणत्याही बलाढ्य संघाला स्पर्धेची सुरुवात हलक्यात घेता येणार नाही.

**सर्वात खाली असलेल्या ३ टीम्समध्ये काटे की टक्कर**

या मेगा इव्हेंटमध्ये एकूण १४ देश सहभागी होणार आहेत. मात्र, मुख्य ग्रुप स्टेज सुरू होण्यापूर्वीच एक मोठा ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. आयसीसी यावेळी सुपर सीरीज हा नवा राऊंड घेऊन येत आहे. यामध्ये सर्वात खालच्या रँकिंगवर असलेल्या तीन संघांमध्ये सामने खेळवले जातील. राऊंड–रॉबिन फॉरमॅटनुसार हे तीन संघ एकमेकांविरुद्ध भिडतील. विशेष म्हणजे, या तीनपैकी केवळ एकच संघ मुख्य ग्रुप स्टेजमध्ये जाईल, तर इतर दोन संघांचे वर्ल्ड कपचे स्वप्न इथेच धुळीस मिळेल आणि ते थेट स्पर्धेतून बाहेर पडतील.

**६–६ संघांच्या दोन ग्रुपमध्ये रंगणार ३० सामने**

सुपर सीरीज संपल्यानंतर स्पर्धेत एकूण १२ संघ शिल्लक राहतील. या १२ संघांना प्रत्येकी ६ अशा दोन वेगवेगळ्या ग्रुपमध्ये विभागले जाईल. या राऊंड २ मध्ये एकूण ३० सामने खेळवले जातील. प्रत्येक संघ आपल्या ग्रुपमधील इतर सर्व संघांसोबत एक–एक मॅच खेळेल. खरा संघर्ष याच टप्प्यात पाहायला मिळेल, कारण इथून पुढे जाण्यासाठी प्रत्येक संघाला आपली संपूर्ण ताकद पणाला लावावी लागणार आहे.



**सुपर ७ राऊंड ठरणार मुख्य आकर्षण**

ग्रुप स्टेजच्या समाप्तीनंतर टूर्नामेंट सुपर ७ या नव्या आणि अत्यंत रंजक राऊंडमध्ये प्रवेश करेल. दोन्ही ग्रुपमधील टॉप ३–३ संघ (एकूण ६ संघ) थेट या राऊंडमध्ये पोहोचतील. पण, ७ व्या स्थानासाठी एक खास ट्विस्ट असेल. दोन्ही ग्रुपमध्ये मागे राहिलेल्या इतर संघांपैकी ज्या संघाची कामगिरी सर्वात उत्कृष्ट असेल, अशा एका सर्वोत्कृष्ट संघाला सातवे स्थान देऊन या राऊंडमध्ये एन्ट्री दिली जाईल. या सुपर ७ राऊंडमध्ये सर्व ७ संघ एकमेकांविरुद्ध प्रत्येकी एक सामना खेळतील आणि येथे एकूण २१ हायव्होल्टेज लढती पाहायला मिळतील.

**असा ठरणार सेमीफायनलचा मार्ग; सेमीफायनलचे थेट समीकरण**

सुपर ७ राऊंडच्या समाप्तीनंतर तयार होणाऱ्या पॉइंट्स टेबलमधील टॉप ४ संघ थेट सेमीफायनलचे तिकीट बुक करतील. सेमीफायनलचे वेळापत्रकही अगदी सरळ आणि रोमांचक असणार आहे. पॉइंट्स टेबलमध्ये पहिल्या क्रमांकावर असणारा संघ चौथ्या क्रमांकाच्या संघाशी भिडेल, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाचे संघ दुसऱ्या सेमीफायनलमध्ये एकमेकांसमोर उभे ठाकतील. या संपूर्ण नव्या फॉरमॅटमुळे २०२७ चा वर्ल्ड कप आतापर्यंतचा सर्वात थरारक आणि अनपेक्षित वर्ल्ड कप ठरण्याची शक्यता आहे.

# भारत-इंग्लंड दुसऱ्या वनडे सामन्याची वेळ बदलली

कार्डिफ,ता.१५–

**भारताच्या इंग्लंडविरूद्ध टी–२० मालिकेतील लाजिरवाण्या पराभवानंतर संघाने वनडे मालिकेची विजयाने सुरूवात केली आहे. बर्मिंगहॅममध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडचा सहा गडी राखून दणदणीत पराभव करत, शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने तीन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे.**

आता गुरुवारी कार्डिफ येथे होणाऱ्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात विजय मिळवून मालिकेत २–० अशी निर्णायक आघाडी घेण्याकडे भारतीय संघाचे लक्ष आहे. मात्र, या दुसऱ्या सामन्याची वेळ मात्र बदलली आहे.

पहिल्या वनडे सामन्यात शुबमन गिलने भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. गिलने ८० धावांची उत्कृष्ट खेळी साकारली होती, पण खेळीदरम्यान त्याच्या उजव्या पायांमध्ये क्रॅम्प्स आल्याने त्याला रिटायर्ड होत मैदानाबाहेर जावे लागले होते यानंतर अक्षर पटेल व वॉशिंग्टन सुंदरच्या जोडीने शतकी भागीदारी रचत भारताला विजय मिळवून दिला. तर या सामन्यात ४ विकेट्स व अर्धशतकी खेळी करणाऱ्या अक्षर पटेलला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.



शुबमन गिल भारताच्या विजयानंतर पोस्ट मॅच प्रझेंटेशनसाठी मैदानावर आला होता. दरम्यान त्याची दुखापत ठीक असल्याची माहितीही सूत्रांनी दिली होती. पण शुबमन गिल दुसऱ्या सामन्यात खेळणार की नाही, याबाबत सामन्याच्या वेळेस अधिकृत माहिती मिळेल. तर शुबमन गिल न खेळल्यास इशान किशनला संधी मिळू शकते. पहिल्या सामन्यात भारताचे वरिष्ठ खेळाडू रोहित शर्मा, विराट कोहली स्वस्तात बाद होत माघारी परतले होते. त्यामुळे दुसऱ्या सामन्यात या दोघांच्या पुनरागमनाची चाहत्यांना अपेक्षा असणार आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा वनडे सामना कार्डिफमध्ये खेळवला जाणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ५.३० वाजता सुरू होईल. तर ५ वाजता सामन्याची नाणेफेक होईल.

# लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टीचे पहिल्याच फेरीतच आव्हान संपुष्टात

टोकियो, ता.१५–

**जपान ओपन २०२६ बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी हे दोघेही आपापल्या पहिल्या फेरीतील सामन्यांत पराभूत झाले. आणि भारताचे पुरुष एकेरीतील आव्हान पहिल्या फेरीतच संपुष्टात आले. पुरुष एकेरीच्या जागतिक क्रमवारीत १४ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्य सेनला, जपानच्या १७ व्या क्रमांकावरील कोकी वातानाबेकडून २१–१६, २१–१४ अशा फरकाने पराभव स्वीकारावा लागला. त्याला आपला सूर गवसण्यासाठी संघर्ष करावा लागला.**

दोन्ही गेम्सच्या मध्यांतराच्या वेळी तो अनुक्रमे ११–६ आणि ११–५ असा पिछाडीवर होता. त्याला सामन्यात पुनरागमन करता आले नाही आणि अवघ्या ३८ मिनिटांत सरळ गेम्समध्ये त्याला पराभव पत्करावा लागला. जपानी खेळाडूविरुद्धच्या सात सामन्यांमधील लक्ष्य सेनचा हा तिसरा पराभव होता.

आयुष शेट्टीने स्पर्धेतील आपल्या पहिल्या सामन्यात अधिक कडवी झुंज दिली. पण अखेरीस लक्ष्य सेनप्रमाणेच त्यालाही स्पर्धेतून लवकर बाहेर पडावे लागले. थायलंडच्या आणि जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या कुनलावुत विटिडसर्नविरुद्ध खेळताना, पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमधील रौप्यपदक विजेत्या या खेळाडूकडून आयुष शेट्टीला १९–२१, २५–२३, १५–२१ असा संघर्षपूर्ण पराभव स्वीकारावा लागला.



पहिला गेम अत्यंत चुरशीचा झाला. माजी विश्वविजेता आणि ऑलिम्पिक पदक विजेता कुनलावुत विटिडसर्न मध्यांतराच्या वेळी ११–९ अशी निसटती आघाडी घेऊन होता. आयुष शेट्टीने जोरदार पुनरागमन करत गुणसंख्या १९–१९ अशी बरोबरीवर आणली, परंतु अखेरच्या क्षणी केलेल्या या मुसंडीनंतरही कुनलावुत विटिडसर्नने पहिला गेम जिंकण्यात यश मिळवले. दुसऱ्या गेममध्ये मध्यांतराच्या वेळी आयुष शेट्टी ११–१० असा आघाडीवर होता, मात्र त्यानंतर थाई खेळाडूने चार मॅच पॉइंट्स मिळवले. तरीही, आयुष शेट्टीने ते चारही मॅच पॉइंट्स वाचवले आणि टाय–ब्रेकमध्ये संयम राखत सामना निर्णायक गेमपर्यंत नेला. मात्र, निर्णायक गेममध्ये आयुष शेट्टीला आपला लय कायम राखता आली नाही. आणि कुनलावुत विटिडसर्नने सामना जिंकला.

## महाराष्ट्र ओपन राज्य तायक्कांदो स्पर्धा

# इचलकरंजीच्या श्रीजा खारगेची सुवर्णपदकाला गवसणी

इचलकरंजी,ता.१५–

**इचलकरंजी येथील मँचेस्टर तायक्कांदो क्लबची खेळाडू कु. श्रीजा खारगे हिने अहिल्यानगर येथे दि.३ ते ५ जुलै २०२६ दरम्यान आयोजित महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्कांदो चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेतील (२०) गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले.**

स्पर्धेदरम्यान श्रीजाने आत्मविश्वासपूर्ण आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. अंतिम सामन्यातही उत्कृष्ट कामगिरी करत तिने प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे इचलकरंजी शहरासह मँचेस्टर तायक्कांदो क्लबच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.श्रीजाला प्रमुख प्रशिक्षक सुरज साळुंखे, प्रशिक्षक विश्वा यम्मी तसेच इर्शाद शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

श्रीजाच्या या यशामागे तिची आई प्रमिला कोडुलकर, आजी कोयना कोडुलकर आणि मामा प्रशांत कोडुलकर यांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन व मोलाची साथ लाभली. त्यांच्या पाठबळामुळेच श्रीजाने राज्यस्तरीय स्पर्धेत हे यश संपादन केले.




श्रीजाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल तिचे पालक, कुटुंबीय, प्रशिक्षक, मँचेस्टर तायक्कांदो क्लबचे पदाधिकारी तसेच इचलकरंजीतील क्रीडाप्रेमींनी तिचे अभिनंदन करून भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# रिंगणच्या ७० सायकलपटूंची इचलकरंजी-पंढरपूर वारी

इचलकरंजी,ता.१५–

**''वसुंधरेचे रक्षण.. हेच खरे विठ्ठलाचे दर्शन'' हा जीवनमंत्र घेवून निसर्गाचे संरक्षण करणेसाठी येथील रिंगण फिटनेस फौडेंशनच्या ७० सायकलपटूंनी '' पंढरपूर सायकल रिंगण सोहळ्यात'' सहभाग घेतला. इचलकरंजी ते पंढरपूर हे १६५ कि.मीचे अंतर पार करताना शारिरीक क्षमतेबरोबरच पर्यावरणाचे संवर्धन आणि वारकरी परंपरेचा प्रेरणादायी संगमच त्यांनी घडवून आणला.**

शिवतीर्थ येथून पहाटे साडेपाच वाजता सायकल वारीची सुरूवात झाली. रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीचे अध्यक्ष पंकज कोठारी, माजी अध्यक्ष प्रकाश रावळ, इचलकरंजी महानगरपलिकेचे क्रीडा अधिकारी सुर्यकांत शेटे, शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे पोलिस हेड कॉन्स्टेबल वसंत घुगे यांच्या प्रमुख उपस्थित आणि फौंडेशनचे अध्यक्ष सचिन खोंद्रे यांचे मार्गदर्शनाखाली वारीची सुरूवात झाली.



इचलकरंजी–मिरज–सांगोला–पंढरपूर असे १६५ कि.मी.चे अंतर या सायकलपटूंनी पार केले. कडक उन्हाचा तडाखा, अधून–मधुन वेगाने वाहणारे वारे यामुळे सायकलपटूंची चांगलीच कसरत होत होती. मात्र, विठू माऊलीच्या दर्शनाची ओढ आणि पर्यावरण संवर्धनाचा घेतलेला वसा यामुळे ऊन वाऱ्याची पर्वा न करता सर्वच सायकलपटूंनी पंढरपूर सायकल वारी यशस्वीपणे पूर्ण केली.

वाढते प्रदूषण, बेसुमार वृक्ष तोड, प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणात होणारा वापर यामुळे पर्यावरणासमोर गंभीर आव्हाने उभी आहेत. अशा गंभीर परिस्थितीत प्रत्येकाने एक झाड लावणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, पाणी वाचवणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे हीच खरी विठ्ठल सेवा आहे. निसर्गाचे संरक्षण केले तरच भावी पिढीला निरोगी, सुंदर आणि समृध्द पृथ्वीचा वारसा देता येईल हाच खऱ्या अर्थाने विठ्ठल भक्तीचा संदेश या वारीच्या माध्यमातून देण्यात आला.

या वारीत जेष्ठ सायकलपटू कृष्णात गोंदुकुप्पे, शेखर पवार, नारायण जाधव, संतोष पाटील, ॲड. जिया शेख, शितल दुधाणे, वैशाली माळी, स्वप्निल मद्यामघोळ, किसन अक्कतंगेरहाळ यांच्यासह ७० सायकलपटूंनी सहभाग घेतला होता.

# स्ट्रक्चरल इंजिनिअर्सना शुल्क निश्चितीसह, व्यावसायीक सुरक्षा महत्त्वाची

## महाबळेश्वर येथील बैठकीत निर्णय

सांगली,ता.१५–

**महाबळेश्वर येथे स्ट्रक्चरल इंजिनिअर्सची बैठक संपन्न झाली. या बैठकीत बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांचे प्रश्न, फी संरचना आणि कायदेशीर सुरक्षेवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीचे नियोजन इंजि. प्रशांत हडकर, इंजि. नंदकुमार बने, इंजि. नारायण कोचक, इंजि. मंदार आंबेकर, इंजि. रणजीत जाधव, इंजि. स्मितेश शहा, इंजि. अमन मोमिन यांनी केले.**

या बैठकीत प्रामुख्याने सांगली, कोल्हापूर, बेळगावी, कराड, सातारा, पुणे, मुंबई, चाळीसगाव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, जयसिंगपूर, इचलकरंजी, ईश्वरपूर, बारामती, आटपाडी अशा अनेक शहरांतील स्ट्रक्चरल इंजिनिअर्सनी सहभाग नोंदवला.स्ट्रक्चरल डिझायनर म्हणजे कोण?



ज्याप्रमाणे इमारतीचे नियोजन व सौंदर्य आर्किटेक्ट करतो, त्याचप्रमाणे इमारतीची मजबुती, टिकाऊपणा आणि सुरक्षितता याची जबाबदारी स्ट्रक्चरल इंजिनिअरची असते. इमारतीचा पाया कसा असावा, किती सळी वापरावी, कॉलम–बीमचे माप काय असावे याचे शास्त्रीय डिझाईन स्ट्रक्चरल इंजिनिअर करतो.

इमारतीची उंची वाढत असताना वारा आणि भूकंपाचा धोका वाढतो. त्यामुळे भूकंपात जीवितहानी कमीत कमी व्हावी आणि लोकांना बाहेर पडण्यासाठी वेळ मिळावा, अशा दृष्टीने डिझाईन करणे हे स्ट्रक्चरल इंजिनिअरचे महत्त्वाचे काम आहे.याबाबत चर्चा करण्यात आली.

**बैठकीत झालेले प्रमुख ठराव**

सांगली कोल्हापूरसारख्या शहरात किमान रु. १० प्रति चौरस फूट आणि पुणे–मुंबईसारख्या शहरात किमान रू.२० प्रति चौरस फूट फी असावी.व्यावसायिक सुरक्षेची मागणी, इमारतीची दुर्घटना झाल्यास कोणतीही तांत्रिक चौकशी न करता स्ट्रक्चरल इंजिनिअरला थेट गुन्हेगाराप्रमाणे जबाबदार धरले जाते. डॉक्टरांच्या बाबतीत जसे स्वतंत्र वैद्यकीय समिती चौकशी करते, तसेच स्ट्रक्चरल इंजिनिअर्ससाठीही स्वतंत्र तांत्रिक समितीमार्फत चौकशी होऊन दोष सिद्ध झाल्याशिवाय गुन्हा दाखल होऊ नये, अशी मागणी करण्यात आली.